CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित

सोलापूर | शनिवार, १९ ऑक्टोबर २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ४० वे अंक ३४९ | पाने १२ | किंमत रु. ६/-


| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
हीआमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही

dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## महत्त्वाचे

### बाजारात आठवड्याचा शेवट तेजीने

**मुंबई :** शेअर बाजाराने आठवड्याचा शेवट हिरव्या रंगात केला आहे. निर्देशांक जवळपास २१८ अंकांच्या वाढीसह बंद झाला. तसेच निफ्टी १०४ अंकांनी वाढून २४,८५४ वर बंद झाला. बाजारातील ही वाढ बँक शेअर्समुळे दिसून आली. याशिवाय ऑटो, फार्मा, धातू, रिअल इस्टेट, मीडिया, ऊर्जा, ग्राहकी वस्तू, आरोग्य क्षेत्रातील शेअर्सही फायद्यातच होते. दिवसभरातील कारभारात आयटी शेअर्समध्ये मात्र घसरण नोंदविण्यात आली. बाजारातील एकूणच स्थितीसाठी जागतिक तणाव हे कारण असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. आजच्या सत्राची सुरुवात ६०० पेक्षा जास्त अंकांच्या घसरणीने झाली होती. त्यानंतर मात्र बाजारात काही कंपन्यांच्या शेअर्सला चांगला भाव मिळाल्याने बाजार तेजीत आला होता.



### भारताचे माजी रॉ अधिकारी एफबीआयच्या वाँटेड यादीत

**नवी दिल्ली :** खलिस्तानी दहशतवादी गुरपतवंतसिंग पन्नूच्या हत्येचा कट रचल्याप्रकरणी एका भारतीय नागरिकावर अमेरिकेतील एफबीआयकडून आरोप निश्चित करण्यात आले. विकास यादव असे या भारतीयाचे नाव असून, यापूर्वी दाखल मूळ आरोपपत्रात त्यांचा सीसी १ असा उल्लेख होता. एफबीआयने विकास यादव यांना वाँटेट लिस्टमध्ये टाकले आहे. गुरपतवंतसिंग पन्नूला भारताने दहशतवादी घोषित केले. त्याच्याकडे सध्या अमेरिकन नागरिकत्व आहे. यूएस ॲटर्नी जनरल मेरिक बी गारलँड म्हणाले, आजचे आरोप हे दाखवून देते की, न्याय विभाग अमेरिकन नागरिकांना लक्ष्य करण्याचा, धोक्यात आणण्याचा आणि प्रत्येक अमेरिकन नागरिकाला ज्या अधिकारांचा हक्क आहे, ते कमी करण्याचा प्रयत्न सहन करणार नाही. विकास यादववर 'पैसे घेऊन हत्येचा कट रचणे, मनी लॉण्ड्रींग' असा ठपका ठेवण्यात आला आहे. खलिस्तान समर्थक शीख फुटीरतावादी नेता पन्नूच्या फसलेल्या हत्येच्या कटात विकास यादव सहभागी होता, असा आरोप करीत विकास यादवला अमेरिकी गुप्तचर यंत्रणेने सीसी-वन दर्जाचा गुन्हेगार असल्याचे म्हटले आहे.

### बाबा सिद्दिकी हत्येप्रकरणी आणखी पाच आरोपींना अटक

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बाबा सिद्दिकी यांच्या हत्येप्रकरणी पोलिसांनी आणखी पाच आरोपींना अटक केली. याप्रकरणी आतापर्यंत एकूण नऊ जणांना अटक करण्यात आली आहे. नवी मुंबई, कर्जत आणि पनवेल परिसरातून पाच आरोपींना अटक करण्यात आली. याआधी अटक करण्यात आलेले चार आरोपी २१ ऑक्टोबरपर्यंत पोलिस कोठडीत आहेत. मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेची विविध पथके देशाच्या विविध भागात पाठवण्यात आली होती. ते आरोपींचा शोध घेत आहेत. याच दरम्यान शुक्रवारी त्यांना मोठे यश मिळाले. बाबा सिद्दिकी यांचा मुलगा झिशान सिद्दिकी यांनी शुक्रवारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. यावेळी अजित पवार, प्रफुल्ल पटेल यांच्यासह वरिष्ठ पोलिस अधिकारी उपस्थित होते.

### तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता

**मुंबई, १८ ऑक्टोबर**

संपूर्ण देशातून मान्सूनने माघार घेतली असली तरी, महाराष्ट्रातील काही भागांमध्ये आगामी तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. नांदेड, लातूर, परभणी, धाराशिव, बीड, अहल्यानगर, सातारा, सांगली, कोल्हापूर, कोकण, पश्चिम महाराष्ट्र, नाशिक, संभाजीनगर, जालना या भागात पाऊस पडण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. ऑक्टोबर हिटचा तडाखा बसत असताना, काही भागांत मुसळधार पाऊस कोसळत आहे. यामुळे नागरिकांमधे आरोग्याच्या समस्या निर्माण होत आहेत. हवामान खात्याने अनेक जिल्ह्यांमध्ये विजांसह हलक्या आणि मध्यम सरीचा पाऊस पडणार असल्याचे सांगितले आहे. २२ ऑक्टोबरला उत्तर महाराष्ट्रातून मान्सून जाणार आहे. त्यानंतर २३ ऑक्टोबरला मराठवाड्यातून मान्सून माघारी परतणार आहे. २४ ऑक्टोबरपर्यंत संपूर्ण महाराष्ट्रातून मान्सून माघारी जाणार असल्याचा दावा हवामान तज्ज्ञ करीत आहेत. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली या जिल्ह्यांत वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# जागा वाटपावरून आघाडीत बिघाडी

## नाना पटोले असल्यास चर्चेला येणार नाही ● उबाठा गटाचा सर्वांत मोठा हल्ला

**मुंबई, १८ ऑक्टोबर**

महाविकास आघाडीच्या जागा वाटपात काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले अडसर ठरत असल्याने यापुढे मविआच्या बैठकीत नाना पटोले असतील, तर आम्ही चर्चेसाठी बैठकीला येणार नाही, अशा कठोर शब्दांत उबाठा गटाचे खासदार संजय राऊत यांनी शुक्रवारी इशारा दिला.

महाराष्ट्रातील काँग्रेसचे नेते निर्णय घेण्यास सक्षम नसल्याची टीका संजय राऊत यांनी केली. त्यामुळे आम्ही जागावाटपाबाबत काँग्रेसचे महासचिव के. सी. वेणुगोपाल आणि मुकुल वासनिक तसेच महाराष्ट्र काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला अशा वरिष्ठ लोकांशी चर्चा करतो, असे म्हणत उबाठा गटाने नाना पटोलेंना चिमटा काढला.



संजय राऊतांच्या या वक्तव्यानंतर पटोले आणि ठाकरे गटातील तणाव चांगलाच वाढला आहे. राज्यात विधानसभा निवडणुकांची घोषणा झाली आहे. राज्यातील सर्व २८८ जागांवर २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी अर्ज भरण्याची मुदत २९ ऑक्टोबरपर्यंत आहे. पण, त्यानंततरही महाविकास आघाडीतील जागावाटपाचा तिढा सुटलेला नाही. विदर्भातील काही जागांवर घटक पक्षांमधील संबंध ताणले गेले आहेत.

विदर्भातील या जागांसाठी काँग्रेस आणि ठाकरे गट आग्रही आहे. महाविकास आघाडीच्या गुरुवारी झालेल्या बैठकीत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्यात खटके उडाले. यावेळी नाना पटोले विदर्भातील तिढा असलेल्या जागांवर अडून बसल्याने ठाकरे गटाची गोची झाली आणि मग राऊतांनी पटोलेंविरोधात आगापखड करायला सुरुवात केली.

विधानसभा निवडणुकीला काही दिवस शिल्लक आहेत. या जागांवर लवकरात लवकर निर्णय व्हावा, असा प्रयत्न महाविकास आघाडी करीत आहे. त्यावेळी नाना पटोले यांची भूमिका जागावाटप पूर्ण करण्यात अडचण निर्माण करीत आहे, असा ठाकरे गटाच्या नेत्यांचा दावा आहे. त्यांनी याबाबतची तक्रार काँग्रेस हायकमांडकडे केल्याची माहिती आता पुढे येत आहे.

(तभा वृत्तसेवा)

### तुटेपर्यंत ताणू नये : उद्धव ठाकरे

एकापेक्षा जास्त पक्ष एकत्र येऊन निवडणूक लढवतात, तेव्हा नाही म्हटले तरी जागांच्या बाबतीत थोडी खेचाखेची होते. पण, ती तुटेपर्यंत ताणायचे नसते, हे सर्व पक्षांनी लक्षात ठेवायला हवे. सध्या तरी जागावाटपाबाबत काही मोठे झाले आहे, असे माझ्या कानावर आले नाही. माझ्या कानावर ज्यावेळी येईल, तेव्हा बघू, असे मत उबाठा गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी संजय राऊत-नाना पटोले वादावर व्यक्त केले.

### राऊत ठाकरेंपेक्षा मोठे असतील : पटोले बरसले

संजय राऊतांनी केलेल्या विधानाला उत्तर देताना नाना पटोले म्हणाले, मी माझी भूमिका मांडली. त्यामुळे मला कोणी अडवू शकत नाही. माझी भूमिका आघाडीच्या हिताचीच असेल. संजय राऊत उद्धव ठाकरेंपेक्षा मोठे असतील. त्यांना उद्धव ठाकरेंसोबत बोलावेच लागत नाही. त्यांनी केलेला निर्णय अंतिम असेल तर ती मोठी माणसे आहेत, असा टोला नाना पटोले यांनी हाणला.

# जयपूरमध्ये चाकूहल्ल्यात १० स्वयंसेवक जखमी

## 'शरद पौर्णिमा' कार्यक्रमादरम्यानची घटना

**जयपूर, १८ ऑक्टोबर**

येथील एका मंदिरात गुरुवारी रात्री शरद पौर्णिमा कार्यक्रमादरम्यान लोकांच्या एका गटाने केलेल्या चाकूहल्ल्यात १० स्वयंसेवक जखमी झाले. या प्रकरणी शुक्रवारी आरोपी पिता-पुत्राला अटक करण्यात आली असल्याचे पोलिसांनी सांगितले.

जयपूरच्या करणी विहार येथील मंदिरात गुरुवारी 'जागरण' कार्यक्रम सुरू होता. स्थानिक रहिवाशांनी रात्री उशिरा सुरू असलेला आवाज आणि गर्दीवर आक्षेप घेतला. त्यानंतर हल्ल्याची घटना घडली.

करणी विहार पोलिस स्टेशनच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, स्वयंसेवकाना दूध वाटले जात असताना दोन जण घटनास्थळी आले. त्यांच्यात वाद झाल्यानंतर त्यांनी त्यांच्या गटातील आणखी काही लोकांना तेथे बोलावले आणि रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांवर हल्ला केला. त्यात दहा स्वयंसेवक जखमी झाले.

शंकर बागडा, मुरारीलाल, राम पारीक, लखन सिंग जादौन, पुष्पेंद्र आणि दिनेश शर्मा या सहा जणांना सवाई मानसिंग रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. घटनेनंतर निदर्शने आणि रास्ता रोको करण्यात आला. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी करणी विहारमध्ये मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

राजस्थानचे कॅबिनेट मंत्री राज्यवर्धन सिंह राठोड यांनी एसएमएस हॉस्पिटलमध्ये जखमींची भेट घेतली आणि दोषींवर कठोर कारवाई केली जाईल असे सांगितले.

भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि माजी आमदार अरुण चतुर्वेदी म्हणाले की, चाकू आणि इतर शत्रे घेऊन आलेल्या हल्लेखोरांनी कार्यक्रमात घुसून उपस्थितांवर हल्ला केला. आरोपींना गंभीर परिणाम भोगावे लागतील.

आरोपी नसीब चौधरी आणि त्याच्या मुलाला ताब्यात घेण्यात आले असून, हल्ल्यात सहभागी असलेल्या इतरांना पकडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. पुढील तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. (वृत्तसंस्था)

# दीपकआबांच्या हातात निष्ठा, परिवर्तनाची मशाल : उद्धव ठाकरे

### माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांचा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि. १८ ऑक्टोबर-**

शिवसेना पक्षाविषयी काही राजकीय नेत्यांनी घेतलेली वेगळी भूमिका महाराष्ट्राला अजिबात आवडली नाही. महाराष्ट्रात आणि प्रामुख्याने सोलापूर जिल्ह्यातील अंधःकार जाळण्यासाठी मी आज दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या हातात सांगोला विधानसभेची उमेदवारी जाहीर करून शिवसेनेची धगधगती मशाल देत आहे. दीपकआबा जिल्ह्यातील अंधःकार दूर करून विकासाचा नवीन दीपक घेऊन जिल्ह्याच्या राजकारणात नक्कीच उदयाला येतील, असा विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.



राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देऊन माजी आ. दीपकआबा साळुंखे-पाटील यांनी शुक्रवारी शिवसेना ठाकरे गटात आपल्या हजारो समर्थकांसह जाहीर प्रवेश केला, यावेळी ते बोलत होते. यावेळी शिवसेना नेते खा. संजय राऊत, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, खा. अनिल देसाई, संपर्क प्रमुख अनिल कोकीळ, माजी खा. विनायक राऊत, आ. मिलिंद नार्वेकर, जिल्हाप्रमुख संभाजी शिंदे, उपजिल्हाप्रमुख सूर्यकांत घाडगे, तालुका प्रमुख अरविंद पाटील, विधानसभा प्रमुख कमरुद्दिन खतीब, शहर प्रमुख तुषार इंगळे, भारत गवळी उपस्थित होते. दरम्यान यावेळी दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या समवेत तानाजी पाटील, शिवाजी बनकर, मधुकर बनसोडे, विजय राऊत, विजय येलपले, विजय पवार, चंद्रकांत चौगुले, अनिल खटकाळे, नंदकुमार दिघे, सतीश काशीद, नाथा जाधव, सतीश सावंत, अनिल साळुंखे, शहाजी हातेकर, अशोक माने, बाबुराव नागणे, विजयसिंह खबाले, शिवाजी जावीर, चंद्रकांत कारंडे, संतोष पाटील, योगेश खटकाळे, अनिकेत सुरवसे, अमोल सुरवसे, सुरेश गावंदे, गिरीश पाटील, अजित गोडसे, विनायक मिसाळ यांच्यासह हजारो कार्यकर्त्यांनी ठाकरे पक्षात जाहीर प्रवेश केला.

### लवकरच सांगोलकरांना भेटायला येणार...!

शिवसेना हा केवळ राजकीय पक्ष नसून तो महाराष्ट्रव्यापी परिवार आहे. या परिवारात नव्याने दाखल झालेले महाविकास आघाडीचे उमेदवार दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या प्रचारार्थ आपण लवकरच सांगोला तालुक्यातील जनतेशी संवाद साधण्यासाठी येत आहोत, असे सूचक विधानही यावेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केले.

### तुम्ही आबांना आमदार करा, आम्ही मंत्री करतो

दीपकआबा साळुंखे-पाटील यांच्या रूपाने सोलापूर जिल्ह्यात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला एक मजबूत शिलेदार मिळाला आहे. सांगोलकरांनी दीपकआबा साळुंखे-पाटील यांना आमदार करावे, आम्ही नक्कीच येणाऱ्या मंत्रिमंडळात त्यांना मंत्री करू, असा शब्द खा. संजय राऊत यांनी दिला.

# बालविवाह हा सामाजिक गुन्हाच

### सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निर्वाळा

**नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर**

बालविवाहामुळे मुले आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि आयुष्यातील चांगल्या संधींपासून दुरावत असतात, असा निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. बालविवाह हा सामाजिक गुन्हाच आहे, असे निरीक्षण नोंदविताना न्यायालयाने काही मार्गदर्शक तत्त्वे केंद्र, राज्ये, जिल्हा प्रशासन, पंचायत आणि न्यायव्यवस्थांसाठी जारी केली.

बालविवाहाबाबत सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी मोठी टिप्पणी केली आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. जे. बी. पार्डीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या न्यायासनाने सांगितले की, १० जुलै रोजी झालेल्या सुनावणीनंतर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. सोसायटी फॉर एनलाईटमेंट ॲण्ड व्हॉलंटरी ॲक्शनने २०१७४ मध्ये ही याचिका दाखल केली होती. बालविवाह प्रतिबंधक कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत नसल्याचा आरोप एनजीओने केला आहे. मागील सुनावणीत सुप्रीम कोर्टाने जनजागृती मोहिमा आणि प्रशिक्षण यासारख्या विशिष्ट कार्यक्रमांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले होते. ते म्हणाले की, हे कार्यक्रम आणि व्याख्याने तळागाळातील गोष्टी बदलत नाहीत. आम्ही कोणावरही टीका करीत नाही. हा सामाजिक प्रश्न आहे. यावर सरकार काय करत आहे?

न्यायालयाला सद्य:स्थिती स्पष्ट करताना अतिरिक्त सॉलिसिटर जनरल म्हणाले की, आंध्रप्रदेश, तेलंगणा, महाराष्ट्र आणि आसाम या राज्यांमध्ये बालविवाहाची अधिक प्रकरणे आढळून आली आहेत.

(वृत्तसंस्था)

# प्रत्यक्ष कर संकलनात महाराष्ट्र अव्वल

### १० वर्षांत १८२ टक्क्यांची वाढ

**नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर**

प्रत्यक्ष कर संकलनात महाराष्ट्र आघाडीवर असून, राज्याने सर्वाधिक कराचा भरणार केला आहे. मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कार्यकाळात प्रत्यक्ष कर संकलनात तब्बल १८२ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने (सीबीडीटी) जारी केलेल्या कर संकलनाच्या आकडेवारीनुसार, उत्तरप्रदेशने आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये एकूण प्रत्यक्ष कर संकलनात केवळ ४८,३३३.४४ कोटी रुपयांचे योगदान दिले. लोकसंख्येच्या बाबतीत देशातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असलेल्या बिहारचे एकूण प्रत्यक्ष कर संकलन २०२३-२४ या आर्थिक वर्षात ६६९२.७३ कोटी रुपये आहे. सीबीडीटीने प्रत्यक्ष कर संकलनासंदर्भात डेटा जारी केला आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधून १९.६२ लाख कोटी रुपये प्रत्यक्ष कर जमा झाला आहे. यात महाराष्ट्राचे योगदान सर्वांत जास्त आहे. महाराष्ट्राने या आर्थिक वर्षात ७,६१,७१६.३० कोटी रुपये (७.६२ लाख कोटी) कर दिला आहे. म्हणजेच एकूण प्रत्यक्ष कर संकलनात महाराष्ट्राचा वाटा ३९ टक्के आहे.


प्रत्यक्ष कर भरण्याबाबत कर्नाटक दुसऱ्या क्रमांकावर आहे. कर्नाटकने २०२३-२४ या आर्थिक वर्षात २.३५ लाख कोटी रुपयांचा कर भरला आहे. तिसऱ्या क्रमांकावर दिल्ली आहे. दिल्लीने थेट कर म्हणून तिजोरीत २.०३ लाख कोटी रुपयांचे योगदान दिले आहे.

(वृत्तसंस्था)

# संस्कृतचे गाढे अभ्यासक वसंत गाडगीळ यांचे निधन

**पुणे, १८ ऑक्टोबर**

येथील शारदा ज्ञानपीठम्चे संस्थापक, संस्कृतचे गाढे अभ्यासक वसंत अनंत गाडगीळ यांचे वृद्धापकाळाने पुण्यात निधन झाले. ते ९५ वर्षांचे होते.



त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा श्रीवर्धन, सून आणि मोठा आप्त-मित्रपरिवार आहे.गाडगीळ हे झपाटलेले व्यक्तिमत्त्व होते. टिळक महाराष्ट्र विद्यापीठातून संस्कृत विषयात पदवीपर्यंतचे अध्ययन, शारदा ज्ञानपीठम्ची स्थापना, संस्कृत भाषेच्या प्रचारासाठी आणि प्रसारासाठी केलेला प्रयास आणि त्यासाठी अमेरिका, आफ्रिकेमध्ये अनेक वेळा त्यांनी प्रवास केला होता. ते संस्कृत भाषेविषयी नेहमी आग्रही असत. भाषण संस्कृतमध्येच करीत असत. प्राचीन ग्रंथ, वेद, उपनिषदे यांचा त्यांचा गाढा अभ्यास होता.

# रालोआ नेत्यांची वर्षातून दोनदा बैठक झाली पाहिजे

### ● पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा प्रस्ताव

**नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर**

चंदीगडमध्ये गुरुवारी रालोआ नेत्यांची बैठक झाली. या बैठकीचे वर्णन करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी, १९७५ नंतर गैरकाँग्रेसी पक्षांची ही सर्वांत मोठी बैठक असल्याचे म्हटले आहे आणि अशी बैठक वर्षातून दोनदा आयोजित करण्याचे आवाहन केले, असे भाजपाच्या निवेदनात म्हटले आहे.

पूर्वीच्या काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संपुआ सरकारच्या तुलनेत त्यांच्या सरकारचा लोकांशी किती जवळचा संबंध आहे, याविषयी सांगताना पंतप्रधान म्हणाले की, गेल्या १० वर्षांत त्यांना ४.५ कोटी पत्रे मिळाली आहेत. त्या तुलनेत त्यांच्या पूर्वीच्या पंतप्रधानांना केवळ ५ लाख पत्र मिळाली आहेत. डॉ. मनमोहनसिंग यांनी २००४-१४ दरम्यान संपुआ सरकारचे नेतृत्व केले. यावरून लोकांचा आमच्या सरकारवरील अढळ विश्वास दिसून येतो, असे ते म्हणाले.

संवेदनशील प्रशासन, जलद निर्णयक्षमता आणि कारभारातील पारदर्शकता यामुळे रालोआ शासित राज्यांमध्ये गुंतवणूकदार आणि गुंतवणूक आकर्षित करण्यात मदत झाली आहे, असे मोदींनी भाजपा आणि त्यांच्या अनेक मित्रपक्षांचे १७ मुख्यमंत्री आणि १८ उपमुख्यमंत्री उपस्थित केलेल्या संमेलनात सांगितले.

# आरटीओमध्ये न जाता टुरिस्ट कॅब, हलक्या वाहनांची नोंदणी

### परिपत्रकाचे डीलर्सनी केले स्वागत

**मुंबई, १८ ऑक्टोबर**

संपूर्ण महाराष्ट्रातील ऑटोमोबाईल डीलर्स आता प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) न जाता पर्यटन टॅक्सी, माल वाहतूक करणाऱ्या ऑटोरिक्षा, पिकअप आणि टेम्पो यासारख्या व्यावसायिक वाहनांची नोंदणी करू शकतात.

राज्य सरकारने या महिन्याच्या सुरुवातीला ७,५०० किलोपेक्षा कमी वजन असलेल्या वाहनांसह पूर्णपणे निर्मित व्यावसायिक वाहनांची डीलर्सकडे नोंदणी सुलभ करण्यासाठी एक परिपत्रक जारी केले होते, असे अधिकाऱ्यांनी निदर्शनास आणून दिले.

एकीकडे वाहतूकदारांनी या निर्णयाचे स्वागत करताना, त्यांचा वेळ आणि पैसा वाचेल आणि त्यांना आरटीओमध्ये येणाऱ्या त्रासांपासून दिलासा मिळेल, असे सांगितले. तिथेच दुसरीकडे, डीलर्स वाहन सुरक्षा नियमांचे प्रामाणिकपणे पालन करतील का, अशी शंका परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. आतापर्यंत राज्यातील डीलर्सना फक्त खाजगी गाड्या आणि दुचाकीसारख्या गैर-वाहतूक वाहनांची नोंदणी करण्याचा अधिकार होता, ज्यात पांढऱ्या नंबर प्लेट असणारी वाहने आहेत.

नवीन नियमातील तरतुदींनुसार, पर्यटन टॅक्सी (मीटर असलेल्या टॅक्सी वगळता), तीनचाकी पूर्णपणे निर्मित मालवाहू वाहने आणि ७,५०० किलोपेक्षा कमी वजनाची चारचाकी मालवाहू वाहनांचा समावेश आहे. मीटर टॅक्सींचा परिपत्रकात समावेश नाही, याचा अर्थ आरटीओ त्यांच्या नोंदणीमध्ये भूमिका बजावत राहतील.

डीलर नोंदणीसाठी नॅशनल इन्फॉर्मेटिक्स सेंटरने (एनआयसी) वाहन ४.० प्रणालीचा भाग म्हणून एक ऑनलाईन ॲप विकसित केले आहे, जे देशभरातील वाहनांचा नोंदणी तपशील संग्रहित करतो. राज्यातील डीलर्स त्यांच्या स्तरावर हलक्या व्यावसायिक वाहनांची नोंदणी करण्यासाठी या प्रणालीचा वापर करतील. महाराष्ट्रातील आरटीओमध्ये दरवर्षी २ लाखांहून अधिक व्यावसायिक वाहनांची नोंदणी केली जाते. २०२३ मध्ये राज्यभरात २३.६३ लाखांहून अधिक वाहनांची नोंदणी झाली होती, त्यापैकी २.४५ लाख व्यावसायिक वाहने होती, ज्यात टॅक्सी, ऑटोरिक्षा, बस आणि अवजड ट्रक यांचा समावेश होता.

(वृत्तसंस्था)

# सत्येंद्र जैन यांना जामीन मंजूर

**नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर**

माजी आरोग्यमंत्री सत्येंद्र जैन यांना अखेर जामिन मिळाला आहे. ५0 हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर दिल्ली उच्च न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला. जामीन मिळाल्यानंतरही त्यांना परदेशात जाता येणार नाही. मनी लाँड्रिंग प्रकरणात जैन यांना मे २०२२ मध्ये अटक झाली होती. जवळपास दीड वर्ष तुरुंगात घालवल्यानंतर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला.

आपच्या नेत्यांमध्ये पहिले राज्यसभा सदस्य संजयसिंह यांना जामीन मिळाला होता. त्यानंतर माजी उपमुख्यमंत्री सिसोदिया यांना जामीन देण्यात आला. केजरीवाल यांनाही महिनाभरापूर्वी न्यायालयाने जामीन मंजूर केला होता. ईडीने विरोध केला, पण न्यायालयाने तो युक्तिवाद फेटाळून लावला. जैन यांना जामीन मंजूर करताना न्यायालयाने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालातील काही संदर्भ दिले.



**सकाळच्या कोवळ्या उन्हात दिल्लीतील फुलाच्या झाडावर बसून, फुलातील परागकणावर ताव मारण्याचा मोह या मैनेला कदाचित आवरता आला नाही.**

# मुलासमोर लैंगिक संबंध, नग्न होणे लैंगिक छळच

**कोची, १८ ऑक्टोबर-**

एखाद्या मुलासमोर लैंगिक संबंध ठेवणे किंवा नग्न होणे हे त्याच्यावर लैंगिक अत्याचार केल्यासारखे आहे. हा लैंगिक गुन्ह्यांपासून मुलांचे रक्षण (पोक्सो) कायद्यानुसार गुन्हा असल्याचे केरळ हायकोर्टाने म्हटले आहे. न्या. ए. बद्रुद्दीन यांनी पोक्सो कायदा आणि बाल न्याय कायद्यांतर्गत गुन्ह्यांसाठी दाखल केलेला खटला रद्द करण्याची विनंती करणाऱ्या याचिकेवर निकाल दिला.

खोलीचा दरवाजा बंद न करता लॉजमध्ये एका अल्पवयीन मुलीच्या आईसोबत लैंगिक संबंध ठेवल्याचा आणि नंतर या कृत्याचा साक्षीदार असलेल्या मुलाला मारहाण केल्याचा आरोप एका व्यक्तीवर होता. आरोपीने त्याच्यावर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याचे याचिकेत म्हटले होते. न्यायालयाने म्हटले, एखादी व्यक्ती मुलाला त्याचे नग्न शरीर दाखवते, तेव्हा ते मुलावर अत्याचाराच्या उद्देशाने केलेले कृत्य असते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त

### आमदार सतीश चव्हाण यांचे ६ वर्षांसाठी निलंबन; सुनिल तटकरे

**मुंबई दि. १८ ऑक्टोबर -**

जाणीवपूर्वक पक्षविरोधी भूमिका घेतल्यामुळे आणि पक्षशिस्त मोडल्याबद्दल आमदार सतीश चव्हाण यांना पक्षातून सहा वर्षांसाठी निलंबित करण्यात आले आहे , अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी शुक्रवारी दिली. १५ ऑक्टोबर रोजी राष्ट्रवादी काँग्रेस आणि महायुती सरकारच्या विरोधात प्रतिमा मलिन करण्याच्या हेतूने जाणीवपूर्वक पक्षविरोधी भूमिका छत्रपती संभाजीनगरचे आमदार सतीश चव्हाण यांनी घेतली होती. वास्तविक सर्व समाजघटकांना न्याय देण्याची भूमिका महायुती सरकारच्या कार्यकाळात घेतलेली आहे. असे असताना आमदार सतीश चव्हाण यांनी जाणीवपूर्वक शिस्तभंग केलेला असल्याने राष्ट्रवादी काँग्रेसकडून ही निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे., असे तटकरे यांनी सांगितले

### पुण्यातील दोन रूपालींचा वाद दादांच्या कोर्टात!

**मुंबई, दि.१८ ऑक्टोबर-**

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटातील दोन रूपाली ताईंचा वाद आता दस्तर खुद्द पक्षप्रमुख व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर मांडण्यात आला आहे पक्षाच्या महिला अध्यक्ष व राज्य महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर व पुण्यातील नेत्या ॲड. रूपाली ठोंबरे यांच्यातील वादामुळे फाईन विधानसभा निवडणुकीवेळी पक्षात दोन गट पडल्याचे चव्हाट्यावर झाले आहे. त्यामुळे दोन्ही रूपालींनी आज स्वतंत्रपणे मुंबईत अजित पवार यांची भेट घेऊन आपली गाऱ्हाणी मांडली. त्याचबरोबर पुण्यातील शहराध्यक्ष दीपक मानकर यांनीही आज पवार यांची भेट घेऊन आपली नाराजी बोलून दाखवली. त्यामुळे अंतर्गत वादाबाबत अजित पवार आता काय निर्णय घेतात व नाराज नेत्यांची कशी समजूत काढतात याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. रूपाली चाकणकर यांची नुकतीच पुन्हा एकदा महिला आयोगाच्या अध्यक्षपदी फेर निवड करण्यात आली त्याबाबत रूपाली ठोंबरे या नाराज असून त्यांनी एकाच व्यक्तीला किती पदे देणार पक्षात अन्य लाडक्या बहिणीही आहेत अशी नाराजी बोलून दाखवली होती त्यावर चाकणकर यांनी बाहेरून आलेल्यांनी जास्त सांगण्याची गरज नाही असा प्रतिउत्तर दिले होते त्यांच्यातील वाद चांगलाच रंगला असताना अजित पवार यांनी आज दोघींना मुंबईत बोलवून घेतले त्यांच्याशी स्वतंत्रपणे चर्चा करून म्हणणे ऐकून घेतले , रूपाली ठोंबरे यांनी सुमारे दीड तास त्यांच्याशी चर्चा केली त्यानंतर चाकणकर ही स्वतंत्रपणे जाऊ आपले मत मांडले .दोघींना अजित पवार यांनी आपण कोणावरही अन्याय करणार नाही, मात्र थोडे सांभाळून घ्या, निवडणुका होईपर्यंत संयम बाळगा,असा त्यांना सल्ला दिला असल्याचे समजते. मात्र त्यांच्यातील वाद कितपत मिटतो? हे आता थोड्या दिवसातच समजून येणार आहे.

### आचारसंहितेमुळे योजनादूतांमार्फत प्रचार-प्रसिद्धीचे काम नाही

**मुंबई, दि. १८ ऑक्टोबर-**

भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निवडणुकीच्या आदर्श आचारसंहिता कालावधीत कोणत्याही शासकीय योजनांची प्रचार प्रसिद्धी करता येत नाही., त्यामुळे आचारसंहिता सुरू असेपर्यंत योजनादूतांमार्फत कोणत्याही प्रकारचे प्रचार प्रसिद्धीचे काम करण्यात येणार नाही. ,असे स्पष्टीकरण राज्याच्या माहिती व जनसंपर्क महासंचालयाकडून शुक्रवारी करण्यात आले. विरोधी महाविकास आघाडीने याबाबत आजच मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची भेट घेऊन निवेदन दिले होते. त्यानंतर विभागाकडून हे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. महायुती सरकारने राज्य सरकारने केलेल्या विविध कामाची माहिती नागरीकापर्यंत पोहोचवण्यासाठी योजना दूत बनवली आहे. त्याअंतर्गत प्रत्येक जिल्ह्यात सुशिक्षित बेरोजगार युवकांना यामध्ये काम देऊन मानधन तत्वावर सरकारी योजनाची प्रसिद्धी करण्याचे काम दिले जाणार आहे. मात्र निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे त्यांच्यावरही जबाबदारी सध्या सोपीता येणार नाही, सद्यस्थितीत योजनादूतांमार्फत प्रचार प्रसिद्धीचे कोणतेही काम नसल्याने त्यांना कोणत्याही प्रकारचा आर्थिक मोबदला दिला जाणार नाही. यासंदर्भात जिल्हास्तरीय अंमलबजावणी यंत्रणांनाही सूचना देण्यात आल्या आहे.असे विभागाने कळविले आहे

### बिहारमध्ये विषारी दारूकांडाचे आणखी १० बळी

**पाटणा, १८ ऑक्टोबर-**

बिहारमधील सिवान आणि सारण जिल्ह्यांमध्ये विषारी दारू प्राशनामुळे आणखी १० जणांचा मृत्यू झाला. यामुळे या घटनेतील मृतांची संख्या ३५ झाली. सिवानमध्ये २८ जणांचा मृत्यू झाला, तर सारणमधून ७ मृत्यूची नोंद झाली आहे. सिवान जिल्ह्यातील मगर आणि औरिया पंचायतींमध्ये आतापर्यंत २८ जणांचा मृत्यू झाला आहे. सारण जिल्ह्यातील मशरख पोलिस ठाण्याच्या हद्दीतील इब्राहिमपूर भागातही सात जणांचा मृत्यू झाला, असे सारण परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक नीलेश कुमार यांनी शुक्रवारी सांगितले. विषारी मद्य प्राशनाच्या दुर्घटनेमुळे विरोधी पक्षांनी आठ वर्षांपूर्वी नितीश कुमार सरकारने लादलेल्या दारू विक्री व वापरावरील बंदीच्या परिणाम कारकतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. सत्ताधारी व विरोधी पक्षांदरम्यान आरोप-प्रत्यारोपांचा खेळ सुरू झाला आहे. विषारी मद्य सेवन केल्यामुळे लोकांना आपला जीव गमवावा लागला, असा दावा दोन्ही जिल्ह्यांतील स्थानिकांनी दावा केला आहे.

# विदर्भातील जागा देण्यास पटोलेचे ठाकरे गटाला ना ना!

### काँग्रेस हायकमांडशी चर्चा करणार

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१८ ऑक्टोबर-**

विधानसभा निवडणुकीसाठी मतदानासाठी अवघे ३१ दिवसाचा अवघी शिल्लक असताना महाविकास आघाडीतील प्रमुख दोन घटक पक्षांमध्ये वाद उफाळून आला आहे. काँग्रेस व शिवसेना उद्धव ठाकरे गटांच्या नेत्यांमध्ये विदर्भातील जागावाटपावरून वाद निर्माण झाला आहे. ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या समवेत बैठकीत सहभागी होण्यास बहिष्कार घालण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे आज मुंबईत वाय. बी .चव्हाण सेंटर येथे होणारी महाविकास आघाडीची नेत्यांची बैठक रद्द करण्यात आली. ठाकरे गटाचे नेते खा. संजय राऊत यांनी थेट काँग्रेस हायकमांडशी चर्चा केली असून त्यांच्या आक्रमक पवित्र्यामुळे काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेनिथला मुंबईत आले आहेत .उद्या दिवसभर मुंबईत थांबून ते चर्चा करणार आहेत.

राज्यात २० नोव्हेंबरला २८८ विधानसभेच्या जागावर व नांदेड लोकसभा मतदारसंघाची पोटनिवडणूक होत आहे. त्यासाठी महाविकास आघाडीमध्ये जागा वाटपाचा फॉर्मुला अद्याप निश्चित झालेला नाही. मुंबई व कोकणात उद्धव ठाकरे गट तर पश्चिम महाराष्ट्र शरद पवार गटाला आणि विदर्भ व मराठवाडा विभागात काँग्रेसला सर्वाधिक जागा लढविण्याबाबत ठाम आहे. लोकसभा निवडणुकीत या आघाडीतील घटक पक्ष असलेल्या काँग्रेसला सर्वाधिक १३ जागा मिळाल्या व त्यांचा एक बंडखोर खासदारही विजयी झाला होता. त्यामुळे काँग्रेसने सर्वाधिक जागा लढवण्यावर ठाम असून विदर्भात लोकसभेत मिळालेल्या यशामुळे बहुतांशी जागा आपल्याकडे ठेवण्यासाठी आग्रही आहे त्याचबरोबर गुरुवारी रात्री विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत खास संजय राऊत व काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्यात वादावादी झाली.

आघाडीमध्ये २८८ पैकी जवळपास २१५ जागाबाबत एकमत झाले असून उर्वरित जागा व तिने पक्षाने जावा सांगितला आहेठाकरे गट विदर्भात नऊ ठिकाणी लढण्यासाठी इच्छुक आहे. मात्र काँग्रेसने त्यांना जास्तीत जास्त चार जागा सोडण्याची तयारी दर्शविली आहे त्यावरून एक होत नसल्याने कालची बैठक अर्धवट सोडण्यात आली .नाना पटोले हे आक्रमक भूमिका घेत असल्याने त्यांच्या उपस्थितीत जागावाटपाबाबत चर्चा न करण्याचा निर्णय ठाकरे गटाच्या नेत्यांनी घेतला आहे त्याबाबत शुक्रवारी संजय राऊत यांनी उघडपणे नाराजी दर्शविली पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की राज्यातील नेतृत्व निर्णय घेण्यास असमर्थ ठरत आहे. त्यांना वारंवार दिल्लीला यादी पाठवावी लागते. त्यामुळे आपण काँग्रेसचे महाराष्ट्राचे प्रभारी रमेश चेन्नई मुकुल वासनिक यांच्याशी चर्चा केली आहे. त्याचप्रमाणे राहुल गांधी यांच्याशीही बोलणार आहे जेणेकरून जागा वाटपाचा प्रश्न लवकरात लवकर निकालात निघावा,काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी मात्र ठाकरे गटाबरोबर वादा बाबत फारसे बोलण्याचे टाळले.

#### निर्णय घेण्यास राज्यातील नेते असमर्थ

जागा वाटपाबाबत समाधानकारक तोडगा निघणे महाविकास आघाडीसाठी आवश्यक आहे मात्र राज्यातील नेते निर्णय घेण्यास असमर्थ ठरत आहेत त्यामुळे आपण काँग्रेसच्या दिल्लीतील श्रेष्ठींशी चर्चा करत आहोत

**- खा. संजय राऊत (ठाकरे गटाचे नेते)**

#### राऊत काय बोलले समजले नाही

आघाडीतील तिन्ही पक्षाच्या नेत्यांना अंतिम निर्णय घेण्यासाठी आपापल्या सर्वोच्च नेत्यांची चर्चा करावी लागते. आमचे सर्वोच्च नेते दिल्लीत असल्यामुळे त्यांना सांगणे अपरिहार्य आहे. त्यामुळे संजय राऊत हे काय बोलत आहेत ते समजू शकत नाही.

**- नाना पटोले (काँग्रेस प्रदेशाध्यक्ष)**

#### तुटेपर्यंत ताणवू नका : उद्धव ठाकरे

प्रत्येकाला आपला पक्ष वाढवण्याचा आपल्या उमेदवारांना संधी देण्याचा अधिकार असतो त्यामुळे जागा वाटपात थोडी वादविवाद असू शकतात मात्र कोणीही तुटेपर्यंत जाणवू नये असा इशारा माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी दिला. काँग्रेस बरोबर जागा वाटपात झालेल्या वादाबाबत पत्रकारांनी विचारले असता ते म्हणाले,' माझ्याशी याबाबत संजय राऊत व अनिल देसाई बोलले आहेत काही जागा बाबत वाद आहे. पण माझ्यापर्यंत तो विषय आलेला नाही. तो आल्यानंतर सोडविला जाईल, अशी अपेक्षा आहे हे त्या दोन दिवसात सर्व जागावाटप जाहीर केले जाईल.

ते म्हणाले ,राष्ट्रवादी गटाचे नेते अंतिम निर्णय घेण्यापूर्वी शरद पवारांशी बोलतात ठाकरे गटाचे नेते उद्धव ठाकरेंची बोलतात त्याचप्रमाणे आम्हालाही आमच्या वरिष्ठ नेत्यांना बोलावे लागणार आहे त्यामुळे आम्ही तातडीने निर्णय घेऊ शकत नाही मात्र महाविकास आघाडीतील काही जागेचा तिढा लवकरच संपुष्टात येईल

# तरुणांच्या संकल्पना जाणून घेण्यासाठी भाजपचे अनोखे अभियान

### आ. विक्रांत पाटील यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१८ ऑक्टोबर-**

मोदी सरकार विकसित भारत २०४७ या ध्येयाकडे वाटचाल करत असताना तरुणांच्या कल्पना, आकांक्षा जाणून घेण्यासाठी भारतीय जनता युवा मोर्चातर्फे राज्यातील तरुणांशी थेट संपर्क साधण्याचे अनोखे अभियान सुरू करण्यात आले आहे. त्यासाठी पुढील २५ दिवसात जिल्हा स्तरावर ५० हजारांहून अधिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती भाजपा प्रदेश सरचिटणीस व युवा मोर्चाचे प्रभारी आ. विक्रांत पाटील यांनी शुक्रवारी पत्रकारांना दिली.

भाजपा प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे, भाजयुमोचे महामंत्री योगेश मैंद, बादल कुलकर्णी, निखिल चौहान उपस्थित होते. विकसित भारत २०४७ चे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुंबईत आयडियाज फॉर विकसित महाराष्ट्र या अभियानाचा प्रारंभ केला. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट राज्यातील तरुणांच्या सूचना एकत्रित करणे आणि विकसित महाराष्ट्रासाठी त्यांच्या कल्पना आणि दृष्टीकोन संकलित करणे हे आहे. आयडियाज फॉर विकसित महाराष्ट्र अभियानातून मिळालेल्या कल्पना आणि सूचनांमुळे विकसित भारत २०४७ च्या राष्ट्रीय उद्दिष्टाच्या अनुषंगाने विकसित महाराष्ट्राचा पाया तयार होईल. हे अभियान युवकांच्या विकासासाठी भाजपाची दीर्घकालीन बांधिलकी दर्शवते. उज्ज्वल भविष्यासाठी, युवा सक्षमीकरण, सशक्त, शाश्वत आणि यशस्वी महाराष्ट्र घडवण्यासाठी तरुणांच्या कल्पना, दूरदृष्टी आणि सूचना यांची अंमलबजावणी करणे महत्वाचे आहे, असे आ. विक्रांत पाटील यांनी सांगितले.

या मोहिमेद्वारे संपूर्ण प्रचार कार्यकाळात १.५ कोटी सूचना गोळा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे, तसेच तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आणि महाराष्ट्रातील प्रत्येक बूथपर्यंत मोहीम पोहोचवण्यासाठी एक लाखाहून अधिक बैठका आयोजित करण्यात येणार आहेत. महाराष्ट्रातील तरुण अनेक व्यासपीठांवर त्यांच्या सूचना देऊ शकतात आणि त्यांच्या सूचना, कल्पना मांडू शकतात. या मोहिमेचे स्वयंसेवक बनून विकसित महाराष्ट्र घडविण्यासाठी आपला सहभाग नोंदवता येईल, अशी माहिती भाजयुमोचे प्रदेशाध्यक्ष अनुप मोरे यांनी दिली.

तरुण पुढील मार्गाने सूचना देऊ शकतात : आयडियाज फॉर विकसित महाराष्ट्र वेबसाइट. (http://www.viksitmaharashtra.co.in) टोल फ्री क्रमांक ७६१-७६१-२०२४ या नंबरवर मिस्ड कॉल द्या आणि आपल्याला ड्चड द्वारे लिंक प्राप्त होइल त्यावर क्लिक करुन विकसित महाराष्ट्र घडवण्यासाठी आपले मत नोंदवा.

# चिखली मतदारसंघातील गैरप्रकाराची चौकशी, आचारसंहितेतील जीआर, नियुक्त्या निविदा रद्द करा

### महाविकास आघाडीची मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१८ ऑक्टोबर-**

विधानसभा निवडणूक जिंकण्यासाठी भाजपाचा रडीचा डाव सुरू आहे. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली या विधानसभा मतदार संघात भाजप विरोधी मतदारांची नावं काढून टाकण्याचा एक कलमी कार्यक्रम सुरू असून असून निवडणूक नोंदणी अधिकाऱ्याकडे अज्ञात व्यक्तींनी २,६०० पेक्षा जास्तअर्ज दाखल केले आहेत. हेराफेरी करून निवडणूक जिंकण्यासाठी भाजपाचा हा रडीचा डाव सुरू झाला आहे. त्यामुळे राज्यात चिखली पॅटर्न सुरू असल्याचा जोरदार हल्लाबोल महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केला आहे.

विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या शासकीय निवासस्थानी पत्रकार परिषदेत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी चिखली या मतदार संघातील गैरप्रकार समोर आणला.



त्यानंतर शिष्टमंडळाने राज्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी एस.चोक्कलिंगम यांना निवेदन दिले.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले म्हणाले, भाजपा रडीचा डाव करण्याचे पाप करत आहे. मतदार यादी तपासून या षडयंत्रात सहभागी झालेल्यांची नावे तपासली पाहिजेत. महाराष्ट्रात योजना दूत नावाने नेमणूक केल्या आहेत हे सगळे भाजपचे लोक आहेत. त्यामुळे योजना दूतांच्या नियुक्त्या रद्द करावी. फॉर्म ७ माध्यमातून नाव वगळण्यात येत आहे. चिखली मतदारसंघात गेल्या दहा दिवसात २६००पेक्षा जास्त फॉर्म ७ दाखल केले आहेत. मतदार यादीतून नाव काढले जात आहे. यामध्ये फडणवीस आणि शिंदे सामील असल्याचा आरोप पटोले यांनी केला.

विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले, लोकसभेत महाविकास आघाडीची अधिकची मतं आहेत. तिथे चिखली पॅटर्न सुरू आहे. जिथे आघाडीला लीड मिळाले तिथे अडीच ते दहा हजार मत कशी कमी करता येईल याचे नियोजन फडणवीस आणि शिंदे करत आहेत. फॉर्म ७ घेणे बंद करावे. अंबादास दानवे म्हणाले, मागच्या तारखेने सरकारने आदेश काढले आहेत. दुपारी साडे तीन नंतर जे काही केलं ते रद्द केले पाहिजे.

राष्ट्रवादीचे नेते जितेंद्र आव्हाड म्हणाले, फॉर्म ७ ऑनलाईन भरण्याची प्रक्रिया संशयास्पद आहे. सत्ताधारी पक्षाच्या दबावाखाली निवडणूक अधिकारी काम करत आहेत.

# महायुतीच्या जागा वाटपावर शिक्कामोर्तब करण्यासाठी मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्री दिल्लीत

**तभा वृत्तसेवा । विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १८ ऑक्टोबर-**

महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर झाल्यानंतर आता महायुतीमध्ये जागा वाटपाचं काम युद्धपातळीवर सुरू आहे. मात्र काही जागांचा तिढा कायम असल्याने आता हा प्रश्न थेट दिल्ली दरबारी गेला आहे. त्यामुळे महायुतीतील राज्यातील तिन्ही पक्षाचे सर्वोच्च नेते अर्थात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे शुक्रवारी दिल्लीला रवाना होत आहे.

रात्री वरिष्ठ नेत्यांसोबत या तिन्ही नेत्यांची बैठक होणार असून त्यात मोठा निर्णय होण्याची शक्यता आहे.



महायुतीने गेल्या काही दिवसांपासून जागा वाटपाच्या चर्चा सुरू केल्या आहेत. काही जागांवर तिन्ही पक्षांचं एकमत झालं आहे. मात्र, अजूनही काही जागांचा तिढा कायम असल्याचं सांगितलं जात आहे. त्यामुळेच महायुतीचे नेते आज दिल्लीत जाऊन हा तिढा सोडवणार असल्याचं सूत्रांनी सांगितलं. मुख्यमंत्री शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे दिल्लीला रवाना झाले.रात्री या तिन्ही नेत्यांची भाजपचे ज्येष्ठ नेते अमित शाह यांच्याशी चर्चा होणार आहे. या बैठकीत जागा वाटपाचा फॉर्म्युल्यावर शिक्कामोर्तब होणार आहे. तसेच ज्या जागांचा तिढा आहे, त्यावरही आजच तोडगा काढला जाणार असल्याचं सूत्रांनी सांगितले.

निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्यानंतर राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. अनेक नेते, आमदार, माजी आमदार तिकीट मिळण्याची वाट पाहत आहेत. काही इच्छुकांनी तर तिकीट मिळत नसल्याचा अंदाज घेऊन महाविकास आघाडीमध्ये प्रवेश करण्यास सुरुवात केली आहे. तसेच जेवढ्या उशिरापर्यंत उमेदवारी घोषित होईल तेवढा कमी वेळ उमेदवारांना मिळणार आहे.

# आचारसंहितेत घेतलेले निर्णय, महामंडळांवरील नियुक्तांची चौकशी करा

### दानवेंचे निवडणूक आयोगाच्या आयुक्तांना पत्र

**तभा वृत्तसेवा,**
**मुंबई, दि.१८ ऑक्टोबर-**

विधानसभा निवडणुकीसाठी आचारसंहिता लागल्यानंतरही सरकारने महाराष्ट्र शासनाच्या संकेतस्थळावर एका दिवसात २५९ शासन निर्णय प्रसिद्ध केले. तसेच २७ महामंडळांवर अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या आहेत. यामुळे आचारसंहितेचा भंग झाल्याचा आरोप विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला आहे. या प्रकरणांची चौकशी करण्यात यावी, असे पत्र दानवे यांनी केंद्रीय निवडणूक आयोगाचे आयुक्त व राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना लिहिले आहे.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता १५ ऑक्टोबरला जाहीर करण्यात आली. मात्र सरकारने शासनाच्या संकेतस्थळावर एका दिवसाततब्बल २५९ शासन निर्णय प्रसिद्ध केले आहेत. त्यामध्ये अनेक वित्तीय आणि धोरणात्मक निर्णयांचा समावेश असून सत्ताधारी पक्षाला निवडणूक प्रक्रियेत अप्रत्यक्ष फायदा मिळणार आहे. त्यानंतर १६ ऑक्टोबरला आणखी ३० ते ४० शासन निर्णय संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले. निवडणूक आयोगाने याबाबत तातडीने कारवाई करण्याचे संकेत दिल्यानंतर, मध्यान्हानंतर शासन निर्णय संकेतस्थळावरून



हटविण्यात आले आहेत. हे प्रकरण अत्यंत गंभीर असून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ते संशयास्पद असल्याची टीका अंबादास दानवे यांनी केली आहे. आचारसंहिता लागू झाल्यानंतर २७ महामंडळांवर अध्यक्ष आणि उपाध्यक्षांच्या नियुक्त्या केल्या आल्या आहेत. निवडणूकीत या राजकीय बंडखोरी रोखण्याच्या दृष्टीने त्या करण्यात आल्या.त्यामुळे याप्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करुन आचारसंहितेनंतर घेतलेले सर्व निर्णय रद्द करुन बेकायदेशीररित्या निर्णय घेणाऱ्या दोषी व्यक्तींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी पत्रात केली आहे.

# ध्येयविरहित शिक्षण प्रणाली राष्ट्रासाठी घातक : डॉ. मनमोहन वैद्य

### 'अरुण रंग' पुस्तकाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**पुणे, १८ ऑक्टोबर**

भौतिक प्रगतीसाठी उत्पन्नाचे साधन चांगले असायलाच हवे. मात्र, ते जीवनाचे ध्येय होऊ शकत नाही. समाज परिवर्तन हे आयुष्याचे ध्येय असायला हवे. दुर्दैवाने आजची शिक्षण प्रणाली ध्येयविरहित झाली असून, ती राष्ट्रासाठी घातक आहे, असे मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय कार्यकारिणी सदस्य डॉ. मनमोहन वैद्य यांनी व्यक्त केले.

टिळक रस्ता येथील श्रीगणेश सभागृहात विवेकानंद केंद्र, कन्याकुमारीच्या महाराष्ट्र प्रांताच्या वतीने आयोजित 'अमृत मिलन' सोहळ्यात डॉ. वैद्य बोलत होते. जीवनातील ध्येय आणि साध्य यात अंतर असल्याचे डॉ. वैद्य यांनी सांगितले. ते म्हणाले, डॉक्टर




किंवा अभियंता बनविणे हे शिक्षणाचे साध्य असू शकते, पण ध्येय नाही. समाज परिवर्तन हेच शिक्षणाचे ध्येय असायला हवे. एक व्यक्ती म्हणून आपले जीवन यशस्वी होण्यापेक्षा सार्थकी होणे आवश्यक आहे. समाजाचे सामाजिक भांडवल वाढवित राहणे, म्हणजे जीवन सार्थकी लागेल.कार्यक्रमात केंद्राचे जीवनव्रती विश्वास लपालकर यांच्या अनुभवांवर आधारित 'अरुण रंग' पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी सुनील कुलकर्णी आणि कांचन जोशी यांनी विश्वास लपालकर यांच्याशी संवाद साधला. कार्यक्रमाला रा. स्व. संघाचे अखिल भारतीय सह-प्रचार प्रमुख प्रदीप जोशी, विवेकानंद केंद्राचे महासचिव भानुदासजी, विवेकानंद केंद्र मराठी प्रकाशन विभागाचे सचिव सुधीर जोगळेकर, केंद्राचे महाराष्ट्र प्रांताचे प्रमुख अभय बापट उपस्थित होते. 'अरुण रंग' या पुस्तकाचे शब्दांकन दिलीप महाजन यांनी केले. लपालकर व भानुदासजी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

#### पूर्वांचलबाबत खोटा नॅरेटिव्ह

आदिवासी समाज हा आपल्यापेक्षा जास्त संघटित आणि सुसंस्कृत असल्याचे मत प्रदीप जोशी यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, देशाच्या पूर्वांचल भागाबद्दल स्थानिकांपेक्षा बाहेरील नागरिकांनीच जास्त अपप्रचार करत खोटा नॅरेटिव्ह उभा केला. स्वतःचे कायदे, संस्कृती, नवतंत्रज्ञान आणि भाषा समृद्धीचा विचार असलेला आदिवासी समाज हा अधिक समृद्ध आहे. त्यांच्यातील सकारात्मक आणि सृजनात्मक गोष्टी उर्वरित भारतीयांपर्यंत पोहोचायला हव्यात.

# हरयाणाप्रमाणेच महाराष्ट्रात लागणार निकाल

**मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा विश्वास**



◆ **पुणे, १८ ऑक्टोबर**

सर्व पोलपंडितांचे अंदाज आणि दावे खोटे ठरवून भाजपाने हरयाणात स्पष्ट बहुमत मिळविले. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतही भाजपाच्या नेतृत्वाखालील महायुती सर्वांना आश्चर्याचा धक्का देणार आहे. राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार स्पष्ट बहुमतासह येणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केला.

हरयाणाच्या पंचकुला येथे गुरुवारी नायबसिंह सैनी यांच्या नेतृत्वाखालील भाजपा मंत्रिमंडळाचा शपथविधी सोहळा मोठ्या थाटात पार पडला. या सोहळ्याला उपस्थित राहून मुख्यमंत्री शिंदे गुरुवारी रात्री पुणे विमानतळावर दाखल झाले. यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते.

आमच्या महायुती सरकारने राज्यात फक्त विकास कामांवर आणि महिलांच्या सक्षमीकरणावर भर दिला आहे. केवळ आम्हीच नाही, तर भाजपाशासित सर्वच राज्यांमध्ये विकास हाच एकमेव अजेंडा राबविण्यात येत आहे. रालोआतील सर्व मित्रपक्षांच्या नेत्यांनी वर्षातून किमान दोनवेळा एकत्र यावे आणि विकासाबाबतच्या आपल्या कल्पना सादर कराव्या, यावर सैनी सरकारच्या शपथविधीनंतर रालोआ नेत्यांच्या बैठकीत एकमत झाले, असे शिंदे यांनी सांगितले.

हरयाणात भाजपा सत्तेतून हद्दपार होणार आणि काँग्रेसची सत्ता येणार, असे भाकीत सर्वच जनमत चाचण्यांनी वर्तविले होते. मात्र, मतदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा आपला विश्वास दाखविला. हरयाणातील निवडणूक निकालांचे प्रतिबिंब महाराष्ट्रातही पडणार आहेत. महायुती स्पष्ट बहुमताने पुन्हा एकदा सत्तेत येणार आहे, असा दावा मुख्यमंत्री शिंदे यांनी केला. ◂(वृत्तसंस्था)

# वडील आजारी, आता मुलाच्या हाती सूत्रे



◆ **मुंबई, १८ ऑक्टोबर**

ठाकरे गटाच्या विद्यमान आमदारांची शुक्रवारी मातोश्री निवासस्थानी बैठक पार पडली. माजी मंत्री आदित्य ठाकरे यांनी या बैठकीत विद्यमान आमदारांना निवडणुकीच्या प्रचारासाठी कामाला लागण्याच्या सूचना दिल्या.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्यावर नुकतीच ॲन्जिओप्लास्टी करण्यात आली. त्यांना रुग्णालयातून सुटी देण्यात आली आहे. उद्धव ठाकरे विश्रांती घेत असल्यामुळे आदित्य ठाकरेंनी आमदारांना मार्गदर्शन केले तसेच आमदारांना उमेदवारीचा शब्द देखील देण्यात आला आहे. यादी जाहीर होण्याची वाट बघू नका, तुमच्याबाबत ती औपचारिकता आहे, असे पक्षाकडून सांगण्यात आले. विद्यमान आमदारांसोबत इतरही काही जणांना मातोश्रीवर बोलावण्यात आले होते. त्याचप्रमाणे जे उमेदवारीसाठी इच्छुक होते, त्यांचीदेखील उमेदवारी निश्चित मानली जात आहे. ◂(वृत्तसंस्था)

### झिशान सिद्दिकींविरोधात वरुण सरदेसाई



ठाकरे गटाकडून म्हणजे महाविकास आघाडीकडून वांद्रे पूर्व मतदारसंघातून युवासेना सचिव वरुण सरदेसाई विधानसभा निवडणूक लढणार असल्याचे ठाकरे गटाचे नेते अनिल परब यांनी जाहीर केले. डबल ग्रॅज्युएट आणि लोकांच्या संपर्कात राहणारा, असे म्हणत वरुण सरदेसाई यांनी प्रचार सुरू केला आहे. त्यामुळे मातोश्रीच्या वरुण सरदेसाई विरुद्ध स्थानिक आमदार झिशान सिद्दिकी यांच्यात लढत होणार असल्याचे जवळपास निश्चित झाले आहे. ■

# झारखंडमध्ये २४ वर्षांत एकदाही झाला नाही काँग्रेसचा मुख्यमंत्री

**नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर**

२००० मध्ये वेगळे राज्य म्हणून अस्तित्वात आलेल्या झारखंडमध्ये आतापर्यंत म्हणजे २४ वर्षांत एकदाही काँग्रेसचा मुख्यमंत्री झाला नाही. राज्यात काँग्रेस नेहमीच लहान भावाच्या भूमिकेत राहिली.

आदिवासीबहुल झारखंडमध्ये झारखंड मुक्ती मोर्चा या प्रादेशिक पक्षाचा प्रभाव नेहमीच राहिला. झामुमो हा काँग्रेसचा मित्र पक्ष होता, त्यामुळे राज्यात झामुमोच्या प्रभावासमोर काँग्रेसचा कधी टिकाव लागला नाही.

गेल्या २४ वर्षांत झारखंडमध्ये एकूण सात जणांनी मुख्यमंत्रिपद सांभाळले. यात बाबुलाल मरांडी, अर्जुन मुंडा, शिबू सोरेन, मधु कोडा, रघुवरदास, हेमंत सोरेन आणि चम्पई सोरेन या सात जणांचा समावेश होता. यात शिबू सोरेन आणि हेमंत सोरेन या पितापुत्राचाही समावेश आहे. अपक्ष मधु कोडाही एकदा मुख्यमंत्री झाले, पण काँग्रेसला कधीही मुख्यमंत्रिपद मिळाले नाही. अर्जुन मुंडा, शिबू सोरेन आणि हेमंत सोरेन यांनी प्रत्येकी तीन वेळा मुख्यमंत्रिपद सांभाळले, पण एकदाही ते पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही. अर्जुन मुंडा आणि हेमंत सोरेन तीन कार्यकाळ मिळून पाच वर्षांपेक्षा जास्त काळ मुख्यमंत्री होते. पण, शिबू सोरेन तीन कार्यकाळ मिळून वर्षभरही मुख्यमंत्री नव्हते. बाबुलाल मरांडी, रघुवरदास, मधू कोडा आणि चम्पई सोरेन यांना एकदाच मुख्यमंत्रिपद सांभाळता आले. भाजपाचे बाबुलाल मरांडी हे राज्याचे पहिले मुख्यमंत्री होते. १५ नोव्हेंबर २००० ते १८ मार्च २००३ या काळात मरांडी मुख्यमंत्री होते.




महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीची घोषणा नुकतीच करण्यात आली. त्यानंतर आता विविध राजकीय पक्षांचे झेंडे विकणारी दुकाने सजू लागली आहेत

# तिसरी आघाडी १५० जागा लढणार

## शिंदे-फडणवीसांविरुद्ध बच्चू कडू भिडणार

◆ **पुणे, १८ ऑक्टोबर**

महायुती आणि महाविकास आघाडीतील असंतुष्ट पक्षांची तिसरी आघाडी परिवर्तन महाशक्ती नावाने प्रथमच राज्यात उभी ठाकली असून, ही आघाडी १५० जागा लढविणार असल्याचे वृत्त आहे.

पुण्यात गुरुवारी परिवर्तन महाशक्तीची बैठक पार पडली. या बैठकीला छत्रपती संभाजीराजे, बच्चू कडू आणि राजू शेट्टी उपस्थित होते. या बैठकीत १५० जागाबाबतचा निर्णय घेण्यात आला. लवकरच इतर जागांवरचा निर्णय होईल. बरेच लोक आमच्याकडे येण्यास इच्छुक असल्याची माहिती परिवर्तन महाशक्तीच्या नेत्यांनी दिली. एकनाथ शिंदे असो की देवेंद्र फडणणीस यांच्या विरोधात उमेदवार देणार असल्याचे या नेत्यांनी सांगितले.

**परिवर्तनाची भाषा करण्याचा अधिकार**




सामान्य माणसाला आपले वाटेल, असे सरकार आम्ही स्थापन करण्याचा प्रयत्न करू, असे बच्चू कडू म्हणाले. आम्ही चांगले उमेदवार देणार आहोत. शरद पवार म्हणतात, परिवर्तन आणू, तुम्ही कसले परिवर्तन आणणार? तुम्ही इतके दिवस सत्तेत होते, मग आता कसे काय परिवर्तन करणार, असा सवाल कडू यांनी उपस्थित केला. परिवर्तनाचा अधिकार युतीला आणि आघाडीला नाही. परिवर्तनाची भाषा करण्याचा अधिकार आम्हाला असल्याचे ते म्हणाले. ◂(वृत्तसंस्था)

# निर्बुद्ध आदित्य ठाकरे शहरी नक्षलवाद्यांचे प्रवक्ते

### आ. आशिष शेलार यांचे गंभीर आरोप



◆ **मुंबई, १८ आक्टोबर**

ज्या पद्धतीने मुंबईतील अनेक भूखंड उबाठा सेनेने बळकावले तसेच धारावीमध्ये असणारा नेचर पार्कचा ३७ एकरचा भूखंड दुसऱ्या मुलाचे निसर्ग व प्राणी प्रेम दाखवून घराजवळची ही जागा बळकावयाची आहे म्हणूनच धारावीकरांची माथी भडकवली जात आहेत. निर्बुद्ध आदित्य ठाकरे हे शहर नक्षलवाद्यांचे प्रवक्ते झाले आहेत, असे गंभीर आरोप मुंबई भाजपा अध्यक्ष आमदार आशिष शेलार यांनी पत्रपरिषदेत केले.

धारावी पुनर्विकासाला विरोध करीत उबाठा नेते आदित्य ठाकरे यांनी घेतलेल्या पत्रपरिषदेला प्रत्युत्तर देताना आशिष शेलार यांनी आदित्य ठाकरे हे निर्बुद्धासारखे अभ्यास न करता बोलत आहेत, असे सांगत त्यांनी केल्या आरोपांचा खरपूस समाचार घेतला. धारावीमध्ये ७० टक्के दलित, मुस्लिम आणि मराठी माणसे आहेत. त्यांना त्यांच्या हक्काची घरे मिळणार आहेत, मुंबई महापालिकेला १५ हजार कोटी रुपये मिळणार आहेत तसेच मुंबईकरांना ४३० एकरमधील ३७ टक्के जागेत खेळाचे मैदान, मनोरंजन मैदान यारखी मोकळी जागा मिळणार आहे. एक वाहतूक हबही याच परिसरात उभा राहणार आहे, मग धारावीकर, मुंबईकर, मुंबई महापालिका आणि शासन यांचा फायदा होणार असताना आदित्य ठाकरे यांचा विरोध का? असा थेट सवाल आशिष शेलार यांनी केला. लोकांमध्ये एक वेगळ्या प्रकारची भावना निर्माण करून, धारावीकरांना हे सरकार तुमच्या विरोधी आहे, असे वातावरण निर्माण करणे, हा उबाठा आणि आदित्य ठाकरे यांचा नॅरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न आहे. हा एक आंतराष्ट्रीय कट असून, शहरी नक्षलवाद्यांचे आदित्य ठाकरे हे प्रवक्ते झाले आहेत, असा आरोप शेलार यांनी केला. ◂(तभा वृत्तसेवा)

# विशिष्ट कंपन्यांना निविदा देऊन प्रचाराचा खर्च काढला जातोय्

### महायुती सरकारवर काँग्रेसचा आरोप

◆ **नवी दिल्ली, १८ ऑक्टोबर**

महाराष्ट्रात महायुती सरकार काही विशिष्ट कंपन्यांना इन्फ्रास्ट्रक्चर क्षेत्रातील निविदा देत आहे आणि त्या मोबदल्यात निवडणूक प्रचारासाठी आर्थिक देणग्या स्वीकारत आहे, असा आरोप काँग्रेसने शुक्रवारी केला. यामुळे करदात्यांना १०,९०३ कोटी रुपयांचा फटका बसला असल्याचे पक्षाने म्हटले आहे.

आमच्या या गंभीर आरोपावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, अर्थमंत्री निर्मला सीतारामन् आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उत्तर देतील का, असा सवाल काँग्रेसचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी पत्रपरिषदेत केला.

महायुती सरकारचा हा 'प्री-पेड चंदा आणि पोस्ट-पेड धंदा' बनला आहे, असा आरोप रमेश यांनी केला. यावेळी उपस्थित असलेले काँग्रेसचे प्रसार आणि प्रसिद्धी विभागाचे प्रमुख पवन खेडा यांनीही महायुती सरकारवर टीकास्त्र सोडले. भाजपाने निवडणूक रोखे योजना कशासाठी आणली होती, या योजनेच्या माध्यमातून भाजपाने किती देणग्या मिळविल्या, याची माहिती सर्वांनाच आहे.□

ज्या मोठमोठ्या कंपन्यांनी भाजपाला बेकायदेशीरपणे मोठमोठ्या देणग्या दिल्या, त्यांना इन्फ्रा क्षेत्रातील निविदा देण्यात आल्या होत्या. या निविदांच्या मोबदल्यात या कंपन्यांनी निवडणूक रोखे खरेदी केले. चंदा मिळविण्याच्या या धंद्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे, असा आरोप पवन खेडा यांनी केला. ◂(वृत्तसंस्था)

# मतांसाठी राष्ट्रीय सुरक्षेसोबतही तडजोड करतील

## वक्फ कायद्यातील सुधारणांबाबत विरोधक गप्प का?

### खा. सुधांशू त्रिवेदी यांचा हल्लाबोल

◆ **मुंबई, १८ ऑक्टोबर**

ऑल इंडिया युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंटचे बद्रुद्दीन अजमल यांनी दिल्ली विमानतळच नव्हे तर, भारतीय संसदेची जागाही वक्फच्या मालकीची असल्याचा दावा केला आहे. मात्र, एकाही विरोधी पक्षाने अजमल यांच्या विरोधात बोलण्याची हिम्मत दाखवली नाही. मतांसाठी राष्ट्रीय सुरक्षेसह कोणत्याही मुद्यावर तडजोड करण्याची विरोधकांची तयारी आहे, असा घणाघाती हल्ला भाजपाचे राष्ट्रीय प्रवक्ते खा. सुधांशू त्रिवेदी यांनी चढविला.



खा. त्रिवेदी यांनी मुंबईत पत्रकारांशी संवाद साधला. विधानसभा निवडणुकीत विरोधी पक्षांकडून मोठ्या प्रमाणावर व्होट जिहादचे प्रकार करण्याची तयारी सुरू असल्याने मतदारांनी हे षडयंत्र समजून घेत ते हाणून पाडले पाहिजे, असे आवाहनही त्रिवेदी यांनी केले. खा. त्रिवेदी यांनी केंद्र व राज्य सरकारने केलेल्या विकासकामांची माहिती दिली. त्रिवेदी म्हणाले की, या निवडणुकीत भाजपा-महायुती समृद्धी, सुरक्षा, समरसता आणि स्वाभिमान हे चार मुख्य मुद्दे घेऊन मतदारांपुढे जात आहे. आमचे सरकार सत्तेवर येण्यापूर्वी महाविकास आघाडी सरकारच्या काळात महाराष्ट्र गुंतवणुकीत पिछाडीवर गेला. कर्नाटक, गुजरात आघाडीवर गेले होते. आमच्या काळात २०२३-२४ मध्ये महाराष्ट्रात १ लाख २५ हजार कोटी रुपयांची तर कर्नाटकमध्ये फक्त ५४ हजार कोटींची गुंतवणूक झाली. यावरून भाजपा-महायुतीचे सरकार विश्वासार्ह आहे, हे लक्षात येते.

महायुती सरकारने महाराष्ट्रात विकासाची नवी उंची गाठली आहे. इलेक्ट्रिक वाहने, सौर ऊर्जा, रोप वे अशी विकास कामे करताना महिलांच्या सशक्तीकरणासाठी माझी लाडकी बहीण अशा योजना महायुती सरकारने सुरू केल्या. सामाजिक समरसतेसाठी दलित चेंबर ऑफ कॉमर्स, बार्टी सेंटरमध्ये कौशल्य विकास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित ठिकाणी पंचतीर्थांचे निर्माण, डॉ. आंबेडकरांनी वास्तव्य केलेल्या लंडन येथील निवासस्थानाचे स्मारक करण्यात आले आहे. महायुती सरकारच्या विकास कामांची दखल घेत मतदार महायुतीला भरघोस प्रतिसाद देतील, असा आशावाद त्यांनी व्यक्त केला. ◂(तभा वृत्तसेवा)

### सरकारच्या विकास कामांची पावती मतदार देणार

छत्रपती शिवाजी महाराजांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून केंद्रात आणि राज्यात भारतीय जनता पार्टी काम करीत आहे. भाजपा सरकारने देशात-राज्यात विकासाचा मोठा टप्पा पार केल्याने भारत जगातील पाचवी मोठी अर्थव्यवस्था असलेला देश झाला आहे. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेने ५०० बिलियन डॉलर्सचा टप्पा गाठला आहे. राज्यात महायुती सरकारने केलेल्या विकास कामांची पावती मतदार आगामी निवडणुकीत देतील, असा विश्वास खा. त्रिवेदी यांनी व्यक्त केला. ■

# नवाब मलिक, सना मलिक यांचे ठरले!

### पिता-पुत्री राकाँकडून निवडणूक लढवणार

◆ **मुंबई, १८ ऑक्टोबर**

नबाब मलिक आणि त्यांची कन्या सना मलिक हे दोघेही विधानसभा निवडणूक लढवणार आहेत. नवाब मलिक हे शिवाजीनगर-मानखुर्दमधून निवडणूक लढवण्याची शक्यता आहे. तर नगरमधून सना मलिक या निवडणूक लढवणार आहेत. सना आणि नवाब मलिक हे दोघेही अजित पवार यांच्या पक्षाकडून निवडणूक लढवणार आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, येत्या २८ ऑक्टोबर रोजी नवाब मलिक आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्यांची कन्या सना २३ ऑक्टोबर रोजी आपला उमेदवारी अर्ज दाखल करतील.

**लेकीसाठी सोडणार मतदारसंघ**

नवाब मलिक यांनी २०१९ साली अणुशक्तिनगर या मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. त्यांनी या जागेवरून शिवसेनेचे (संयुक्त) उमेदवार तुकाराम काटे यांना पराभूत केले होते. मलिक यांना ६५,२१७ तर काटे यांना ५२,४६६ मते मिळाली होती. या दोघांनाही मिळालेल्या मतांची टक्केवारी अनुक्रमे ४६.८ आणि ३७.७ टक्के होती. २००९ मध्येही नवाब मलिक यांनी याच जागेवरून निवडणूक लढवत विजय संपादन केला होता. आता कन्येसाठी ते हा मतदारसंघ सोडण्याची शक्यता आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भाजपा नेते राजन तेली ठाकरे गटात जाणार

◆ **मुंबई, १८ ऑक्टोबर**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील भाजपाचे नेते राजन तेली यांनी भाजपाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असून, ते लवकरच उद्धव बाळासाहेब ठाकरे गटात प्रवेश करणार आहेत.

सावंतवाडी मतदार संघाचे प्रभारीपद भाजपाने राजन तेली यांच्याकडे सोपविले होते. मागील दहा वर्षांपासून मी भाजपासाठी कठोर परिश्रम घेत आहे. मात्र, नारायण राणे आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी भाजपात प्रवेश केल्यानंतर मला प्रचंड त्रास दिला जात आहे, असा आरोप राजन तेली यांनी केला. राज्यातील विधानसभा निवडणूक लढण्यासाठी नारायण राणे यांचे पुत्र निलेश राणे शिवसेनेत जाणार असल्याच्या वृत्ताबाबत विचारले असता, तेली म्हणाले की, एकाच कुटुंबातील दोन किंवा त्यापेक्षा जास्त सदस्यांना लोकसभा आणि विधानसभेचे तिकीट देण्यास माझा विरोध आहे. ◂(वृत्तसंस्था)

# गुजरातहून परतणाऱ्या कैलास पाटलांना ठाकरेंकडून गिफ्ट

### थेट धाराशिवची उमेदवारी

◆ **धाराशीव, १८ ऑक्टोबर**

राज्यातील प्रमुख पक्ष आपापल्या सक्षम उमेदवारांची घोषणा करीत आहेत. उमेदवार जाहीर करण्याच्या स्पर्धेत उद्धव ठाकरे यांचा पक्षदेखील मागे राहिला नाही. या पक्षाने धाराशीव मतदारसंघासाठी आपला उमेदवार निश्चित केला आहे. शिवसेना पक्षफुटीवेळी एकनाथ शिंदेंची साथ सोडून मुंबईकडे परतणारे आमदार कैलास पाटील यांना धाराशीवची उमेदवारी जवळपास निश्चित झाली आहे. तसे संकेत आमदार उद्धव ठाकरे यांनी दिले आहेत.

कैलास पाटील उस्मानाबाद विधानसभा मतदारसंघाचे आमदार आहेत. एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर गुजरातच्या रस्त्यावरून ते परत आले होते. एकनिष्ठ शिवसैनिक अशी त्यांची ओळख आहे. तिकीट नक्की झाल्यानंतर कैलास पाटील मुंबईहून मतदारसंघाकडे रवाना झाले आहेत. तिकीट मिळाल्याचे निश्चित झाल्यानंतर कैलास पाटील यांच्या कार्यकर्त्यांकडून 'कैलास पर्व' असे सोशल मीडियावर कॅम्पेनिंग केले जात आहे. उद्धव ठाकरे यांच्याकडून ग्रीन सिग्नल मिळाल्यानंतर कैलास पाटील आता जोमाने प्रचारात उतरले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# २.८७ लाख नोकऱ्या, पाच लाख तरुणांना स्वयंरोजगार

### चम्पई सोरेन यांनी पत्रातून घातली तरुणाईला साद

◆ **रांची, १८ ऑक्टोबर**

झारखंडमध्ये भाजपाची सत्ता आल्यास युवकांना २.८७ लाख नोकऱ्या दिल्या जातील तसेच पाच लाख लोकांना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध केल्या जातील, असे आश्वासन माजी मुख्यमंत्री चम्पई सोरेन यांनी युवकांना उद्देशून लिहिलेल्या खुल्या पत्रात दिले आहे.

भविष्य हे युवकांच्या बळकट खांद्यावर आहे. केवळ २४ वर्षांच्या या राज्याची स्वप्ने, अपेक्षा, आकांक्षा जोपासल्या गेल्या पाहिजे, असे त्यांनी या पत्रात म्हटले आहे. ज्या लोकांना यापूर्वी रोजगाराची संधी मिळाली नाही, त्यातील पाच लाख लोकांना स्वयंरोजगाराची संधी दिली जाईल, या माध्यमातून ते विकासाच्या मुख्य प्रवाहात येतील, असे चम्पई सोरेन यांनी म्हटले आहे.



तुमच्यापैकी कित्येक जण प्रथमच मतदान करणार आहेत. त्या तरुण मित्रांना खास विनंती आहे की, झारखंडमध्ये भाजपाला मतदान करून तुम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करा. माझ्या साडेचार दशकांच्या राजकीय प्रवासात मी नेहमीच समाजातील सर्वच घटकांच्या विकासासाठी काम केले आहे. तुमच्यापैकी अनेकांना स्वतःच्या कुटुंबासाठी, समाजासाठी, राज्य आणि देशासाठी खूप काही करायचे आहे, पण व्यवस्थेमुळे विवश आहात. आम्ही तुमच्या समस्यांचे जवळून निरीक्षण केले आहे आणि त्या समस्या आणि मुद्दे समजून घेतले आहेत, असे सोरेन यांनी म्हटले. ◂(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत

https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# स्वयंसेवकांवरील हल्ल्यामुळे समाजमन अस्वस्थ

राजस्थानमध्ये रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांवर झालेल्या चाकूहल्ल्यात आठ जण जखमी झाल्याची बातमी चिंताजनक म्हणावी लागेल. या घटनेचा करावा तेवढा निषेध कमी आहे. देशाची वाटचाल कोणत्या दिशेने सुरू आहे, त्याची ही घटना द्योतक म्हणावी लागेल. रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षाला यावर्षीच्या विजयादशमीपासून प्रारंभ झाला आहे. शतकमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या आणि आपले संपूर्ण आयुष्य भारतमातेच्या सेवेकरिता समर्पित केलेल्या संघाच्या स्वयंसेवकांवर राजस्थानसारख्या भाजपाशासित राज्यात, त्यातही राजधानी जयपूरमध्ये चाकूहल्ला व्हावा, ही बाब देशावर प्रेम करणाऱ्यांना अस्वस्थ करणारी तर आहे; पण देशात सर्वकाही ठीक नाही, याचा संकेत देणारीही आहे. जयपूरच्या करणीविहार परिसरातील दसरा मैदानावर ही दुर्दैवी घटना घडली आहे. या मैदानाच्या बाजूला असलेल्या शिव मंदिरातील कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर संघाचे स्वयंसेवक या मैदानात शरद पौर्णिमेचा उत्सव साजरा करीत होते. स्वयंसेवकांनी भारतमातेच्या जयजयकाराच्या तसेच जय श्रीरामच्याच घोषणा दिल्या असतील. या घोषणांवर कोणी आक्षेप घेण्याचे कारण नव्हते; पण एका व्यक्तीने आक्षेप घेतला. त्यामुळे स्वयंसेवकांनी महाबली हनुमानाचे स्मरण करत हनुमान चालीसा सुरू केली. यामुळे काही माथेफिरूंचे डोके फिरले. अशाच माथे फिरलेल्या पितापुत्रांनी मैदानात येऊन आधी संघाच्या स्वयंसेवकांशी वाद घातला तसेच नंतर आपल्या जवळच्या चाकूने भोसकाभोसकी सुरू केली. हा प्रकार काही जात्यंध आणि हिंदुद्वेष्ट्या लोकांनी केला असेल, यात शंका नाही. 'जय श्रीराम' आणि 'भारत माता की जय'च्या घोषणा दिल्यामुळे तसेच हनुमान चालीसा म्हटल्यामुळे ज्यांच्या तळपायाची आग मस्तकात जाते, त्यांना या देशात कुठेही राहण्याचा अधिकार नाही. त्यांची जागा या देशात नाही तर आपल्या शेजारी देशात आहे. त्यांनी खुशाल भारतमातेचा हा देश सोडून शेजारी देशात जावे, ते आपणहून जात नसतील तर त्यांना भारत सरकारने फटके मारत सन्मानपूर्वक शेजारी देशात पोहोचवून दिले पाहिजे.

चित्रपटात होते, त्याप्रमाणे सर्व झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि गुन्हा नोंदवून जखमींना रुग्णालयात दाखल केले. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. नंतर या मैदानावर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. हा प्रकार म्हणजे साप गेल्यावर काठीने भुई धोपटण्यासारखा म्हणावा लागेल. ज्यांना या देशातील बहुसंख्य हिंदू लोकांच्या भावनांचा, श्रद्धास्थानांचा आदर करता येत नाही, त्यांच्यासाठी या देशात जागा नाही. अल्पसंख्यक असूनही बहुजनांच्या भावना दुखावणारे कृत्य करण्याची या लोकांची हिंमतच कशी होते, आपल्या देशातील गुप्तचर संस्था काय करतात, त्यांना आधीच या घटनाक्रमाची माहिती कशी मिळत नाही, असे अनेक प्रश्न यातून उपस्थित झाले आहेत. काँग्रेस शासनाच्या काळात अल्पसंख्यकांचे लांगूलचालन केले जात होते. कारण, अल्पसंख्यकांच्या तुष्टीकरणाच्या आधारावरच देशात काँग्रेसने आताआतापर्यंत म्हणजे २०१४ पर्यंत राज्य केले. त्यानंतर सत्तेवर आलेल्या आणि हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या मोदी सरकारने हिंदुत्वाचे राजकारण करताना अल्पसंख्यकांवरही अन्याय होणार नाही, याची काळजी घेतली. कारण 'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' या धोरणाने या सरकारची वाटचाल सुरू आहे. मात्र, हिंदूंना डिवचण्याशिवाय देशातील काही शक्तींना चैन पडत नाही. त्यामुळे छोट्या-मोठ्या घटनांतून हिंदू बांधवांना चिथावण्याचा या शक्तींचा प्रयत्न आहे. उत्तरप्रदेशातील बहराईचसह देशाच्या काही भागांत दुर्गा विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आली. यामुळे उत्तरप्रदेशसह देशाच्या अनेक भागांत तणावाचे वातावरण निर्माण झाले. बहराईच येथे तर भगवा झेंडा फडकवण्याच्या प्रयत्नात एका हिंदू युवकाचा बळी गेला. त्याच्यावर गोळीबार करण्यात आला. अतिशय निर्घृणपणे हालहाल करून त्याला मारण्यात आले. बहुसंख्यकांच्या या देशात अल्पसंख्यक असणारे दादागिरी करत असतील, हिंदूंच्या देव-देवतांची विटंबना करत असतील तर या देशातील हिंदूंनी बांगड्या भरल्या नाही, हे सगळ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. हिंदू समाज हा भगवान शंकराप्रमाणे आहे. एकदा त्याचे तांडवनृत्य सुरू झाले की, तिन्ही लोकांत प्रलय आल्याशिवाय राहणार नाही. उत्तरप्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारच्या कार्यपद्धतीप्रमाणे या शक्तींना चिरडून टाकले पाहिजे. या देशातील सर्वच अल्पसंख्यक देशविरोधी आहे असे नाही, पण देशविरोधी अल्पसंख्यकांची संख्याही कमी नाही; ती वाढतच चालली आहे. ज्याप्रमाणे सगळे अल्पसंख्यक हे अतिरेकी नाही, पण सगळे अतिरेकी आणि देशद्रोही हे अल्पसंख्यक आहेत, या ऐतिहासिक तथ्याकडे आपल्याला दुर्लक्षही करता येणार नाही.

रा. स्व. संघ ही राष्ट्रवादी संघटना आहे. भारतमातेला परम वैभवाप्रती पोहोचविण्यासाठी गेल्या ९९ वर्षांपासून ही संघटना काम करीत आहे. ही संघटना बहुसंख्यक हिंदूंची असली, तरी ती जात-पात, धर्म-भाषा, प्रांत-लिंग असा कोणताही भेद मानत नाही. या देशात राहणारे मग ते आज कोणत्याही जाती-धर्माचे असो, सर्वच हिंदू आहेत, यावर या संस्थेचा ठाम विश्वास आहे. आज जे लोक स्वत:ला दुसऱ्या धर्माचे म्हणवतात, त्यांचे पूर्वजही कधीकाळी हिंदूच होते, असा संघाचा विश्वास आहे. नुसता विश्वासच नाही तर संघ या भावनेने गेल्या ९९ वर्षांपासून काम करत आहे आणि पुढेही काम करणार आहे. देशात कुठेही नैसर्गिक वा अन्य प्रकारची आपत्ती आली तर जात-पात आणि धर्म न पाहता सगळ्यात प्रथम संघाचे स्वयंसेवक धावून जातात आणि नि:स्वार्थ भावनेने पीडितांना मदत करतात, याचा अनुभव देशाने अनेक वेळा घेतला आहे. अशा या संघाच्या स्वयंसेवकांवर हल्ला होणे हे समजण्याच्या पलीकडे आहे. आतापर्यंत डाव्यांचे प्राबल्य असणाऱ्या केरळमध्ये संघाच्या स्वयंसेवकांवर हल्ले होत होते. त्यात अनेक स्वयंसेवकांना आपल्या प्राणालाही मुकावे लागले. पण तरीही केरळमधील स्वयंसेवक कधी घाबरला नाही आणि त्याने माघारही घेतली नाही. आजही तो केरळमधील डाव्यांच्या दादागिरी आणि गुंडगिरीविरोधात लढत आहे, संघर्ष करत आहे. केरळमधील हे लोण आता राजस्थानपर्यंत आले, ही चिंतेची बाब म्हणावी लागेल. भाजपाशासित राज्यात संघाच्या स्वयंसेवकांवर होणारे हल्ले हे देशभर वेगळा आणि नकारात्मक संदेश देणारे ठरणार आहेत. त्यामुळे भाजपा सरकारवरची जबाबदारी वाढणार आहे. मुळात कोणत्याही राज्यात भाजपाचे सरकार असो की भाजपाविरोधी पक्षांचे, तेथे संघाच्या स्वयंसेवकांवर हल्ले होणार नाही, याची काळजी तेथील सरकारला घ्यावी लागणार आहे. कारण संघाचे स्वयंसेवक स्वत:च्या व्यक्तिगत फायद्यासाठी वा स्वार्थासाठी काही करत नाहीत, तर ते जे करतात, ते व्यापक समाजाच्या आणि देशाच्या हिताचे असते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी देशाला विश्वगुरू बनवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. मोदी देशाला विश्वगुरू बनवतात, ही बाब या देशातील काही लोकांना पचत आणि पटत नसावी. त्यामुळे देशात अशांततेचे तसेच जातीय तणावाचे वातावरण निर्माण करण्याचा काही देशविघातक शक्तींचा प्रयत्न राहू शकतो. देशातील सामाजिक सौहार्दतेची वीण कमकुवत करण्याचा या शक्तीचा हा प्रयत्न आहे, यात शंका नाही. जयपूरमध्ये संघाच्या स्वयंसेवकांवर झालेल्या प्राणघातक हल्ल्याने देशभरातील हिंदूंमध्ये अस्वस्थतेची भावना आहे. पण यामुळे हिंदू समाज रस्त्यावर उतरणार नाही, हिंदू समाजाने रस्त्यावर यावे, अशी इच्छा हा प्रकार घडवून आणणाऱ्यांची नक्कीच असू शकते. पण संघ असे काही करणार नाही आणि संघाचे स्वयंसेवकही असे कधीच करणार नाहीत. आपल्या हाताने आपला देश कमकुवत करण्याचा कोणताही प्रयत्न संघाचे स्वयंसेवक हाणून पाडतील, त्यासाठी वेळप्रसंगी आपल्या प्राणांचे बलिदानही करतील. देशभक्तीने ओतप्रोत स्वयंसेवक हे संघाचे वैशिष्ट्य आहे. संघ समजून घ्यायचा असेल तर तो दुरून समजणार नाही. त्यासाठी दररोज संघात जावे लागेल. तेव्हाच संघाचे स्वयंसेवक कोणत्या मातीचे तयार झाले, ते समजू शकेल. ▌▌

## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# दैवी देणगीचा वापर कसा करावा?

'द कार्स' नावाच्या कार्टुन चित्रपटांची अतिशय सुंदर सीरिज आहे. त्यातील तिसऱ्या भागाची कथा अशी की, लाईटनिंग मॅकविन नावाची कार ही हीरो असते. ही कार अनेक वर्षे रेसिंग स्पर्धा जिंकते. पण अचानक स्टॉर्म नावाची अत्यंत आधुनिक कार स्पर्धेत सहभागी होते आणि मॅकविन कारचा पराभव होतो. मग मॅकविन ट्रेनिंग घेण्यासाठी स्टर्लिंगकडे येतो; जिथे क्रूझ ही नुकतीच वयात आलेली कार त्याला प्रशिक्षण देते. क्रूझला रेसर व्हायचं असतं, पण ते तिला जमत नाही म्हणून ती ट्रेनर होते. मॅकविनला मात्र आधुनिक तंत्र शिकताना खूप अडचणी येतात, तरीदेखील त्यावर मात करत प्रशिक्षण पूर्ण करतो. मॅकविन चॅम्पियन असलेल्या स्टॉर्मला हरवून जिंकते. मॅकविनला कळतं की, आयुष्यभर अपमान सहन करत बसण्यापेक्षा किंवा नव्या पिढीसोबत लढत बसण्यापेक्षा आता निवृत्त होऊन नव्या पिढीला आशीर्वाद दिले पाहिजे आणि त्यांचे मार्गदर्शन केले पाहिजे.

नुकतेच शरद पवार यांनी एक विधान केले आहे. पवार म्हणाले, ८४ असो किंवा ९० असो; हे म्हातारं काही थांबत नाही. हे म्हातारं महाराष्ट्राला योग्य मार्गावर आणल्याशिवाय स्वस्थ बसत नाही. पहिली गोष्ट देवाने कोणाला किती आयुष्य द्यावे, यात आपण ढवळाढवळ करू शकत नाही. कुणी अल्पायुषी ठरतं तर कुणी दीर्घायुषी जगतं. राज ठाकरे म्हणतात त्याप्रमाणे शरद पवारांचा देवावर विश्वास नसला, तरी मी त्यांच्या दीर्घायुष्यासाठी देवाकडे प्रार्थना करतो. शरद पवारांनी शंभरी पार करावी, अशी माझी मनापासून इच्छा आहे. पण हे झालं वैयक्तिक आयुष्य. ही परमेश्वराची देणगी आहे. पण आपण दीर्घायुषी जीवन जगताना काय केलं, हे आपलं कर्तृत्व आहे. दुर्दैवाने छत्रपती शिवाजी महाराजांना दीर्घायुष्य लाभलं नाही, पण त्या अल्पायुषी जीवनातच महाराजांनी मानव जातीला हजारो वर्षे उपयोगी पडेल असं कार्य करून ठेवलं आहे. औरंगजेबाला दीर्घायुष्य लाभलं, पण त्याच्या आयुष्याची माती झाली. मराठी माणसाने त्याची कबर महाराष्ट्रात खोदली. त्याला महाराष्ट्र जिंकता आला नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांना दीर्घायुष्य लाभलं. मात्र राजकारणातून बाजूला होत त्यांनी प्रबोधनाची चळवळ सुरूच ठेवली. नेहरू हे दीर्घायुषी होते. पण ठिकठिकाणी नेहरूंची जयंती किंवा पुण्यतिथी उत्साहाने साजरी होताना दिसत नाही. शासकीय नियम आहे म्हणून करावी लागते. पण छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती व पुण्यतिथी सर्वसामान्य माणूस उत्साहाने साजरी करतो. दीर्घायुष्यापेक्षा जे जीवन आपण कसे जगलो आहोत, त्यात आपण काम काय केलं, हे जास्त महत्त्वाचं.



देशाच्या स्वातंत्र्यासाठी भगतसिंग विशीतच फासावर चढला. ज्ञानेश्वर माउलींनी आपलं कर्तव्य पूर्ण झाल्यावर विशीतच संजीवनी समाधी घेतली. बरं, या संजीवनी समाधीवर शरद पवारांच्या वैचारिक तालमीत तयार झालेले लोक टीका करतात आणि कोणताही पुरावा नसताना ब्राह्मणांनीच त्यांची हत्या केली, तुकोबांची हत्या ब्राह्मणांनी केली, असा प्रचार करून जातिभेद निर्माण करतात. शिवाजी महाराजांच्या सैन्यात ५७ टक्के मुस्लिम होते, असा जावईशोध लावतात. प्रभू राम आणि स्वामी समर्थांवर उघडपणे टीका करणाऱ्याला पवार मूक आशीर्वाद देतात. ब्राह्मणांनी स्त्री शिक्षणाला विरोध केला व फुलेंना तीव्र विरोध केला, असा प्रचार केला जातो. पण ज्या भिडे नावाच्या ब्राह्मणाने फुलेंना स्त्री शिक्षणासाठी वाडा दिला, त्याचं चरित्र का सांगितलं जात नाही? मग जेव्हा आम्ही तरुण मंडळी शरद पवारांविषयी लिहायला बसतो, तेव्हा आम्हाला सुचत नाही की, नेमकं चांगलं काय लिहावं? आमचं ज्ञान कमी पडत असेल तर आम्ही मार्गदर्शन घ्यायला तयार आहोत. आम्हाला त्यात कोणताही कमीपणा वाटत नाही.

शरद पवार इतकी वर्षे राजकारणात आहेत. चार वेळा मुख्यमंत्री होते. देवेंद्र फडणवीस सोडले तर इतर मुख्यमंत्री त्यांच्या मर्जीतले होते. आजही पवार राजकारणात आहेत, सत्ता नसली तरी राजकारणावर त्यांचा प्रभाव आहे. ते भाकरी फिरवू शकतात. हे खरं असलं तरी या सर्व गोष्टींचा जनतेला काय फायदा? शरद पवारांचं राजकारणात प्रस्थ आहे, यापलीकडे पवारांविषयी कुणीच काही बोलत नाही. त्यांचे मर्जीतले लोकही बोलत नाहीत. इतक्या वर्षांत पवारांनी असं कोणतं धोरण राबवलं, ज्यामुळे महाराष्ट्राचा कायापालट झाला? आज पवार विद्यमान सरकारवर टीका करत आहेत, पण प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत व अधिक काळासाठी सत्तेवर असताना असा कोणता चमत्कार पवारांनी करून दाखवला आहे, ज्याचा परिणाम किमान शंभर वर्षे टिकून राहणार आहे? नरेंद्र मोदींनी ३७० कलम हटवल्यानंतर अब्दुल्ला यांना भारतीय संविधानाला समोर ठेवून शपथ घ्यावी लागली, हे मोदींचं कर्तृत्व आहे. हा दीर्घकाळ टिकणारा परिणाम आहे, हे देश एकसंध ठेवणारं कर्तृत्व आहे.

ज्याप्रमाणे मोदी 'मन की बात' हा कार्यक्रम राबवतात, त्याप्रमाणे शरद पवारांचे असे कोणते विचार आहेत, ज्यामुळे जाती-जातीतील भांडणे मिटतील, ज्यामुळे तरुण पिढी घडेल, तरुण पिढीला मार्गदर्शन होईल, महाराष्ट्राचं आनंदवनभुवन होईल? शरद पवारांचे असे कोणतेही विचार, मार्गदर्शक तत्त्वे लेख लिहिताना आपल्याला आठवत नाहीत, हे दुर्दैव आहे.

आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात खासदार उदयनराजे भोसले म्हणाले, पवारांनी आजवर केवळ राजकारण केले. राज्याला विकासापासून कायम दूर ठेवत स्वत:च्या राजकीय फायद्यासाठी राज्यात जाती-जातींमध्ये भांडण लावण्याचे ठोस काम केले. अनेक वर्षे केंद्र आणि राज्यात सत्ता असताना, चार वेळा मुख्यमंत्री असतानाही पवारांच्या कार्यकाळात राज्य मागे पडले. अन्य छोटी छोटी राज्ये महाराष्ट्राच्या पुढे गेली. याला सर्वस्वी पवार जबाबदार आहेत. उदयनराजे काही वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. त्यांनी पवारांचं राजकारण जवळून पाहिलेलं आहे. या वक्तव्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. काही साहित्यिक, राजकीय नेते, कलाकार शरद पवारांना जाणता राजा वगैरे म्हणतात. पण पवारांची स्तुती करणे, पवारांच्या मर्जीत राहणे ही काय पात्रता आहे का? योग्यतेचे हे मापदंड आहेत का? पवार शाहू, फुले, आंबेडकरांचं नाव घेतात. हे तिन्ही महापुरुषच होते. पण पवारांनी यांचं नाव घेत महाराष्ट्र जोडला का? सर्व जातींना एकत्र आणलं का? या तिन्ही महापुरुषांचे तत्त्व महाराष्ट्राच्या भूमीत रुजवले का? की केवळ राजकारणासाठी त्यांचं नाव घेतलं? याची स्पष्टता या पितामहांनी दिली पाहिजे.

प्रिय वाचकहो, वयोवृद्ध असण्याचं महत्त्व काय हे मी तुम्हाला सांगतो. ज्यावेळी तानाजी रणांगणात पडले. तेव्हा वयोवृद्ध शेलार मामांनी नेतृत्व केलं आणि गड जिंकून दिला. आपण 'गड आला पण सिंह गेला' असं म्हणतो. पण वयोवृद्ध शेलार मामा नसते, तर गडही गेला असता ना! एका म्हाताऱ्या माणसाने आपल्याला गड जिंकून दिला, हे इतिहासातलं केवढं तरी मोठं उदाहरण आहे. बरं, गड जिंकल्यानंतर शेलार मामांनी स्वतःचा दबदबा निर्माण केला नाही, स्वतःच्या मर्जीतली माणसे बसवली नाहीत, स्वतःला जाणता राजा म्हणवून घेतलं नाही. याला म्हणतात निष्काम कर्मयोग! दीर्घायुष्य म्हणजे मिळकत नव्हे. ही देवाची देणगी आहे. या देणगीचा वापर आपण कसा करतो, हे आपल्यावर अवलंबून असतं. दीर्घायुष्य शाप ठरावं की वरदान, हे आपल्याच हातात आहे. कै. वामनराव पै म्हणून गेले आहेत ना, तुच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार! ▌▌

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# अन्न हे पूर्णब्रह्म

*जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म ।*
*उदरभरण नोहे जाणीजे यज्ञकर्म ॥*

या श्लोकानुसार भारतीय संस्कृतीत अन्नाला पूर्ण ब्रह्म म्हटले आहे. अन्न हे केवळ पोट भरण्यासाठी नव्हे, तर यज्ञकर्म म्हणून ते सेवन केले पाहिजे. यज्ञकर्म केल्याने पुण्याची प्राप्ती होते, असे म्हणतात. त्याप्रमाणे आपले शरीरदेखील यज्ञकुंड असून त्याचे योग्य पोषण होण्यासाठी भोजन करणे म्हणजे एक प्रकारचे यज्ञकर्मच आहे.

हे सर्व येथे मांडण्याचा उद्देश असा की, १६ ऑक्टोबर हा जागतिक अन्न दिवस म्हणून जगभर साजरा केला गेला. तसे पाहिले तर, 'डे' साजरे करणे ही पाश्चिमात्य संस्कृती आहे. मदरर्स डे, फादरर्स डे, त्याप्रमाणे पाश्चिमात्य देश 'फूड डे' म्हणजे 'अन्न दिन' साजरा करतात. आपण भारतीय अन्नाला देव मानतो. आपण अन्नाचा कधीच अपमान करीत नाही. आपल्या थोर ऋषी-मुनींनी अन्न उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला 'अन्नदाता' म्हटले आहे. त्याला शेती कामात मदत करणाऱ्या 'वृषभ' म्हणजे बैलालादेखील 'नंदी' म्हणून देवत्व बहाल केले आहे. त्यांचा सन्मान करण्याची शिकवण दिली आहे. अनेक श्लोक, ऋचा, मंत्रातून आपल्याला अन्नाची महती कळते. मात्र, आज काळ वेगाने बदलत आहे. पूर्वी लग्न समारंभ अथवा इतर कार्यक्रमात पंक्तीत भोजन देण्याची पद्धत होती. आजही ती कायम असली, तरी फारच कमी ठिकाणी तिचा अवलंब केला जातो. आता लग्न समारंभात बुफेची पद्धत रूढ झाली आहे. पूर्वी घराघरांत माजघरात पाटावर बसून भोजन करण्याची पद्धत होती. आता अनेक ठिकाणी डायनिंग टेबलवर जेवणाची पद्धत आली आहे. त्यासाठी डायनिंग हॉल तयार केला जातो. टेबलवर बसून पायात जोडे, चप्पल घालून भोजन ग्रहण केले जाते. आजही काही लोक भोजनाचे नियम पाळतात. जेवण सुरू करण्यापूर्वी ताटाभोवती पाणी फिरवून देवाला नैवेद्य दाखविला जातो. भाताची काही शितं 'चित्रावती' म्हणून ताटाच्या बाजूला टाकली जातात. देवाचे नामस्मरण, श्लोक म्हटला जातो. मात्र, आता हे करताना फारसे कुणी दिसत नाही. ताट वाढले की, सरळ जेवण सुरू केले जाते. याला घरातील ज्येष्ठ मंडळीदेखील जबाबदार आहेत. त्यांनी ताटाभोवती पाणी न फिरविता भोजन सुरू करणाऱ्या आपल्या कुटुंबातील सदस्याला हटकले पाहिजे. तसे केल्यास अन्नाचा सन्मान राखला जाईल. आपल्याला हवे तेवढेच घ्यायला मुलांना शिकविले पाहिजे. पानात काहीही शिल्लक राहायला नको, असे मुलांना सांगितले पाहिजे. पूर्वी पानात वाढलेले चांगले तूप अगदी निपटून खायला लावत. तूप मोरीत जायला नको, असे बजावले जाई. आमच्या लहानपणी आमचे वडील जो पानात काहीही शिल्लक ठेवणार नाही त्याला बक्षीस मिळेल, असे सांगत. त्यामुळे आम्हाला पानात काहीही न टाकण्याची सवय लागली. आज हे सर्व लुप्त होत असल्याचे दिसून येत आहे. पूर्वीच्या अन्नधान्याचे नियोजन केले जात असे. काटकसरीने त्याचा वापर केला जात होता. त्यामुळे अन्नाची नासाडी होत नव्हती. आज बुफे ज्याला मराठीत 'स्वरुची भोज' म्हणतात. वास्तविक, स्वरूची या नावातच त्या भोजन पद्धतीचा अर्थ आहे. आपल्याला आवडेल ते म्हणजे स्वरूची. पण, आपण काय करतो. पुन्हा त्या रांगेत उभे राहायला नको म्हणून आपल्या प्लेटमध्ये सर्व पदार्थ एकदाच गच्च भरून घेतो. मग, त्यातील मोठ्या प्रमाणात अन्न टाकून दिले जाते आणि □अन्नाची नासाडी होते. आपल्या ताटात तेवढे घ्या की जेणेकरून ते नालीत टाकले जाणार नाही. 'अन्नदाता सुखी भव' 'पाककर्ता सुखी भव' असे जेवण झाल्यावर आपण म्हणतो. कारण तो अन्न पिकविणारा आणि अन्न तयार करणाऱ्याचा सन्मान आहे. आज अन्नाची होत असलेली नासाडी पाहून खंत वाटते. आजही असे अनेक लोक आहेत ज्यांना दोन वेळचे अन्नही मिळत नाही. संतुलित आहार मिळत नसल्याने आदिवासी भागातील मुलं मोठ्या संख्येत कुपोषित आहेत. त्यामुळे दुर्गम भागातील बालकांचे मृत्यू होतात. याची गंभीर दखल घेऊन जागतिक अन्न व कृषी संघटनेने १९८१ पासून जागतिक अन्न दिनाचे आयोजन करणे सुरू केले आहे. श्री गजानन महाराजांनी उष्ट्या पत्रावळीवरील अन्नाचे कण वेचून आपली भूक भागविल्याचे श्री गजानन विजय ग्रंथात नमूद आहे. या कृतीतून त्यांनी अन्नाचे महत्त्व पटवून दिले आहे. नुकत्याच झालेल्या एका सर्वेक्षणात कॉफी, समोसे, चिप्स इत्यादी खाणाऱ्यांची संख्या भारतात खूप मोठी आहे. त्यामुळे भारतात मधुमेहींची संख्या झपाट्याने वाढत आहे. तेव्हा अन्न दिनानिमित्त आपण सर्वांनी यावर गंभीर विचार करणे आवश्यक आहे. काही वर्षांपूर्वी 'तरुण भारत'ने 'अन्न वाचवा' ही मोहीम संपूर्ण विदर्भात राबविली होती. त्याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता, हे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते. तेव्हा आजपासूनच आपण 'इतनाही लो थाली मे, व्यर्थ न जाए नाली मे' अशी काळजी घेण्याचा संकल्प करू या! ▌▌

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# उबाठाचे उद्योग उघडे पडले!

महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवून नेल्याचा डांगोरा सातत्याने पिटणाऱ्या उद्धव ठाकरे गटाचे उद्योग आता उघडे पडल्याचे चित्र आहे. मुळात राज्यातून गेलेले उद्योग तर खऱ्या अर्थाने यांच्या तीन वर्षांच्या जुलमी राजवटीला आणि वसुलीच्या उद्योगांना वैतागून पळाले नव्हे तर त्यांना पळून जाण्यास बाध्य करण्याचा बहुमान तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या नावे आहे. मात्र, आता गंगा उलटी वाहू लागली आहे. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवले जात असल्याचा गैरसमज निर्माण करणाऱ्या विरोधकांना चांगलीच चपराक बसली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे आखलेल्या ऊर्जा धोरणाचा परिणाम आता दिसू लागला आहे. विजेचे दर परवडत नाहीत म्हणून गुजरातच्या सूरत आणि दक्षिण गुजरातमधील अनेक कापड उद्योग महाराष्ट्रातील नवापूर आणि नंदुरबार येथे स्थलांतरित होत आहेत.

कापड उद्योग जगतातील माहितीनुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नवापूर औद्योगिक नगरीमध्ये सूरतमधल्या उद्योगपतींच्या मालकीचे १३० कापड कारखाने आले आहेत. आणखी दोन डझनहून जास्त उद्योजक सूरतपासून अवघ्या १०० किलोमीटर अंतरावर असलेल्या नवापूरला येण्यास उत्सुक आहेत. नवापूरपासून ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या नंदुरबारमधील भालेर एमआयडीसीही अनेकांच्या पसंतीला उतरत आहे.

सुरतमधील कापड उद्योगांना मिळणारी वीज प्रती युनिट साडेआठ रुपये दराने मिळत आहे. याउलट महाराष्ट्र सरकारच्या अनुदानामुळे महाराष्ट्रात हा दर तीन ते साडेपाच रुपये प्रती युनिट आहे. याव्यतिरिक्त सुरतच्या तुलनेत नवापूरमधल्या जमिनी स्वस्त आहेत आणि महाराष्ट्रात करही कमी आहेत. गुजरातचे मागचे वस्त्रोद्योग धोरण गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये संपल्यानंतर गुजरातमधल्या उद्योजकांनी महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योग धोरणावर लक्ष केंद्रित केले. तब्बल १० महिन्यांनंतर गुजरात सरकारने नुकतेच नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले. मात्र अद्याप त्याचा संपूर्ण मसुदा वेबसाईटवर अपलोड केलेला नाही. वेबसाईटवर फक्त माहितीपत्रक प्रकाशित करण्यात आले आहे.

महाविकास आघाडीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले काही उद्योग तेव्हाच्या सरकारच्या निष्क्रियतेमुळे इतर राज्यात गेले. मात्र याचे खापर त्यांनी राज्यातल्या सत्ताधारी महायुती सरकारवर फोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हाच परराज्यातले उद्योग महाराष्ट्रात परत आणण्याचे स्थगित ठेवण्यात आलेले धोरण सरकारने पुन्हा स्वीकारले. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी याकरिता विशेष पुढाकार घेतला. त्याचे फळ आता मिळू लागले आहेत, अशी भावना उद्योग जगतात व्यक्त होत आहे.

देशातल्या परकीय गुंतवणुकीतही महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे. एप्रिल ते जून २०२४ या चालू आर्थिक वर्षातल्या पहिल्या तीन महिन्यांतच जी आकडेवारी समोर आली, त्यामध्ये देशात झालेल्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी तब्बल ५२.४६ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. गेली दोन वर्षे सातत्याने परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर राहिला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत महाराष्ट्रात ६९ हजार ७९५ कोटींची परकीय गुंतवणूक आली. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या कर्नाटकमध्ये १९ हजार ५९ कोटींची परकीय गुंतवणूक आली. तिसऱ्या क्रमांकावरील दिल्लीत १० हजार ७८८ कोटींची गुंतवणूक झाली. चौथ्या क्रमांकावरच्या तेलंगणात ९ हजार २३ कोटींची परकीय गुंतवणूक झाली. पाचव्या क्रमांकावर गुजरात असून त्यांची परकीय गुंतवणूक ८ हजार ५०८ कोटी आहे.

या सर्व राज्यांमध्ये झालेल्या परकीय गुंतवणुकीची बेरीज केली तर त्यापेक्षाही जास्त गुंतवणूक फक्त महाराष्ट्रातच झाली आहे. देशात यावेळी आलेली परकीय गुंतवणूक १ लाख ३४ हजार ९५९ कोटी रुपये असून त्यापैकी ५२ टक्के रक्कम केवळ महाराष्ट्रात गुंतवण्यात आली आहे. २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रात १ लाख १८ हजार ४२२ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक आली होती. ही गुंतवणूक त्यावेळच्या कर्नाटक, दिल्ली आणि गुजरातच्या एकत्रित गुंतवणुकीच्या बेरजेपेक्षाही जास्त होती. २०२३-२४ मध्ये महाराष्ट्रात १ लाख २५ हजार १०१ कोटींची परकीय गुंतवणूक आली; जी गुजरातपेक्षा दुपटीहून अधिक आणि गुजरात तसेच कर्नाटक यांच्या बेरजेहून अधिक आहे.

एखाद्या राज्यात परकीय गुंतवणूक तेव्हाच येते जेव्हा तिथले वातावरण उद्योगाला अनुकूल असते. त्यांना स्वस्तात जमीन, वीज, पाणी उपलब्ध होते की नाही, हे पाहिले जाते. स्वस्त दरात मनुष्यबळ मिळते की नाही, हे बघितले जाते. पायाभूत सुविधा आहेत की नाही ते पाहिले जाते. सामाजिक सलोखा राखला जातोय की नाही, हे बघितले जाते आणि असा माहोल तयार करण्यात हे सरकार यशस्वी झाले आहे. फडणवीस मुख्यमंत्री असतानाच त्यांनी राज्यातल्या पायाभूत सुविधांवर भर दिला. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग उभारण्याचे काम त्याच काळात सुरू झाले. मुंबई-पनवेलपर्यंत जाणारा अटल सेतूची बांधणी तेव्हाच सुरू झाली. या महामार्गांना आसपासचे जिल्हे जोडण्याचे काम हाती घेण्यात आले. रस्त्यांचे, रेल्वेचे जाळे विकसित होत असेल तर दळणवळण सोपे होते, हे गुंतवणूक करणारेही जाणतात. गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी त्यांनी तेव्हाच काही शॉर्टटर्म तर काही लाँगटर्म योजना आखल्या. महाविकास आघाडीच्या काळात या योजनांना ब्रेक लागले. सत्तापालट झाला आणि पुन्हा या योजनांना गती आली व त्याचे परिणाम आता दिसत आहेत.

फडणवीस मुख्यमंत्री असताना २०१४ ते २०१९ या काळात महाराष्ट्रात एकूण ३ लाख ६२ हजार १६१ कोटींची परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली होती. २०२० आणि २०२१ मध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार होते. त्या काळात महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत मागे पडला होता. या काळात गुजरात आणि कर्नाटक महाराष्ट्रापेक्षा पुढे गेले होते. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आल्यानंतर तेव्हाच फडणवीस यांनी जाहीर केले होते की, पाच वर्षांतली गुंतवणूक आम्ही अडीच वर्षांत आणून दाखवू आणि सरकारची पावलेही त्याच दिशेने पडताना दिसत आहेत. दुसऱ्या तिमाहीतल्या परकीय गुंतवणुकीचा आकडा अजून जाहीर व्हायचा आहे. हा आकडा आल्यावर गुंतवणुकीची आकडेवारी आणखीनच वाढलेली दिसेल. पण धृतराष्ट्राच्या भूमिकेत असणाऱ्या उद्धवना दिसणार नाही. कारण धृतराष्ट्राला वस्तुस्थितिदर्शक माहिती देणारा संजय आणि उद्धव ठाकरेंना आभासी माहिती देऊन दिशाभूल करणारा घरगडी संजय यात फार फरक आहे. ▌▌

९२७०३३३८८६

### मतदान सक्तीचे असावे का?

निवडणुकीची तारीख जाहीर झाली. एक म्हणावेसे वाटते की, मतदान सक्तीचे असावे. लोकसभेच्या निवडणुकीची मतदान टक्केवारी काही ठिकाणी खूपच कमी होती. लोकसभेच्या मतदानाला गेलो असताना तिथे एक आजोबा आले होते. थरथरत होते. त्यांनी आपला हक्क बजावला. त्याच दिवशी एका ओळखीच्याचा फोन आला होता. ते म्हणाले, आम्ही गेलोच नाही मतदान करायला. त्यांच्याकडची चार मते होती. शुक्रवारी मतदान. तीन दिवस काही जण बाहेरगावी गेले. मोठ्या शहरात सुशिक्षित लोक मोठ्या प्रमाणात मतदान करीत नाहीत. सुटी दुसरीकडे घालवतात. म्हणून मतदान सक्तीचे केले तर योग्य होईल का? नवीन जे मतदानाकरिता पात्र झाले आहेत, त्यांच्यामध्येसुद्धा उत्साह नाही. आपले नाव सामील करायची इच्छा निर्माण व्हायला हवी. काही करून मतदानांची टक्केवारी वाढायला हवी. जुन्या पिढीतील लोक बरेच उत्साही आहेत. मतदान करतात. तरुणही उत्साही आहेत; पण प्रमाण वाढायला हवे. उदासीनता कमी व्हायला हवी.

**प्रा. अंजली पळणीटकर**/९८२२६९१२८८

### ऑनलाईन टॅक्स भरणा

आजकाल सर्व कार्यालयीन कामकाज, पैशाचे व्यवहार ऑनलाईन केल्यामुळे जनतेला दिलासा मिळाला आहे. मग ते रेल्वे तिकीटचे रिझर्व्हेशनच असो वा बँकेमार्फत होणारा पैशाचा व्यवहार असो. भाजी बाजारात भाजी घेणे असो की फळवाल्यांकडून फळे विकत घेणे असो यूपीआयद्वारा व्यवहार सुलभ झाला आहे. जिल्हास्तरावर नगरपालिकांचेसुद्धा टॅक्स वसुली वा भरणा ऑनलाईन झालेला आहे. तहसील स्तरावर हा टॅक्स व्यवहार ऑनलाईन झालेला ऐकिवात नाही. ज्या शहराची वा गावाची लोकसंख्या ५० हजार वा एक लाखावर आहे आणि जेथे नगरपालिका टॅक्स वसूल करते त्याचा भरणा करण्यासाठी लोकांना एक-दोन किमी असलेल्या नगरपालिकेत जाऊन भरणा करावा लागतो. कारण आजकाल दूर-दूर कॉलनी व नगरे बसलेली आहे त्यामुळे टॅक्स भरण्यासाठी नगरपालिकेत जाऊन टॅक्स भरणे त्रासाचे झाले आहे. म्हाताऱ्यांना व आजारी असणाऱ्या व्यक्तींना जाणे अवघड होते वा ज्यांची घरे नगरपालिका क्षेत्रात आहे, परंतु ते लोक दुसऱ्या गावी राहत आहे, त्यांना टॅक्स भरणे अडचणीचे आहे. त्यामुळे नगरपालिकेने टॅक्सच्या भरणा करण्यासाठी मोबाईलद्वारे ऑनलाईन भरण्याची सुविधा नागरिकांसाठी करावी; जेणेकरून नगरपालिका कर्मचाऱ्यांना टॅक्स वसुलीसाठी घरोघरी जावे लागणार नाही व त्यांच्याही त्रास कमी होईल.

**मधुसूदन भावे**/७६२०६२९७२८

## वाचक पत्रे

### 'एक्झिट पोल' शुद्ध मूर्खपणा

मुख्य निवडणूक आयुक्तांनी एक्झिट पोलसंबंधी तीव्र नाराजी व्यक्ती केली; ती यथार्थ वाटते. एक्झिट पोल हे विशिष्ट पक्षांचा कल दाखविण्याचा मूर्खपणा नक्कीच करतात, हेच अनेकदा सिद्ध झालेले आहे. मग त्या चुकीच्या दर्शविलेल्या भविष्याची जबाबदारी या एक्झिट पोल कंपन्या का स्वीकारीत नाहीत? जनतेने केलेल्या मतदानाचा निकाल दोन-तीन दिवसांत येणारच असतो; मग हा करोडोंचा खर्च कशासाठी? आणि स्टुडिओमध्ये काही नेत्यांना बोलावून जनतेला भांडणे कशाला ऐकविली जातात? जनतेची करमणूक, निराशा, वेळेचा अपव्यय एवढेच होते. हे प्रकरण गंभीर असून 'विश्वास' या शब्दाला काळिमा लागतो. म्हणून त्यावर वेळेतच कडक कायदा आणणे अत्यंत गरजेचे वाटते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

### भारत : तिसरी आर्थिक महासत्ता

आपल्या देशाने २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात आर्थिक विकासाबरोबरच सर्वच क्षेत्रात वेगाने प्रगतीकडे वाटचाल सुरू केल्यासंबंधीचे वृत्त तरुण भारतात वाचले. भारतात जुनी राजकीय पद्धत कसेही करून राजकारणात जम बसवा व माया कमावून आपल्या येणाऱ्या सात पिढ्या आरामात कशा चैन करतील, याची तजवीज करा, या तत्त्वावर आधारित होत्या. देशाचा विकास व प्रगती, याचा विचार त्यांच्या गावीही नव्हता, असे मागील काही काळात झालेल्या महाप्रचंड घोटाळ्यावरून दिसते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सामान्य जनतेसाठी याबद्दल काही वाईट वाटत नव्हते. यामुळे सत्ताधारी माजलेत व भ्रष्टाचार वाढत गेला. तोपर्यंत भारत देश जगाच्या खिजगणतीत नव्हता. पण आता मोदींच्या राष्ट्रीय राजकारणात आगमनानंतर परिस्थिती बदलत गेली व भारत देश आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धेत उतरला. कोरोना काळात जगात आर्थिक मंदी आली. जगातील मोठमोठे देश व उद्योगधंदे डबघाईला आले. भारत मात्र या संकटकाळातून लवकरच बाहेर पडला. एवढेच नव्हे, तर स्वत:ची परिणामकारक लस तयार केली. ही लस भारतीय निर्मात्यांनी इतर विकसनशील व काही पुढारलेल्या देशांनाही पाठविली व भारताची मान जगात उंचावली. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय मतदारांत शिक्षित व तरुण मतदारांची संख्या वाढत गेली. देशाची सर्वंकष प्रगती व विकास देशाला जागतिक स्पर्धेत आवश्यक आहे, हे त्यांना कळते. हा एक प्लस पॉईंट आहे. तरी पण अजूनही काही अज्ञानी व देशविरोधी तत्त्व भारतात आहेत. ते व जुनाट विचारांचे राजकारणी देशाच्या प्रगतीत आडकाठी टाकत असतात. त्यांना नामोहरण करून आपला भारत २०३० पर्यंत जगात आर्थिक क्षेत्रात तिसरा क्रमांक गाठेल, याकरिता आपण सर्व प्रयत्न करू या व ते ध्येय गाठण्यास सरकारला मदत करूया... ▌▌

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

## संक्षिप्त वृत्त



### रेल्वेच्या विशेष तिकीट तपासणी मोहिमेत ३ लाख २१ हजारांचा दंड वसुल

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -**

विनातिकीट प्रवाश्याना आळा बसावा या हेतूने सोलापूर रेल्वे विभागाने राबविलेल्या विशेष मोहिमेत सुमारे १०२१ प्रवाशांवर कारवाई करीत ३ लाख २१ हजार रुपयांचा दंड वसुल करण्यात आला. सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय व्यवस्थापक नीरज कुमार दोहरे यांच्या नेतृत्वाखाली आणि वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवथापक योगेश पाटील व सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक श्रीमती कल्पना बनसोडे यांनी हि विशेष तपासणी मोहीम घेतली.

**विनातिकिट प्रवास करणाऱ्या १०२१ प्रवाशांवर कारवाई**

**१६ ऑक्टोबर या एका दिवसात केलेली कारवाई पुढीलप्रमाणे** :- १६ ऑक्टोबर रोजी घेण्यात आलेल्या विशेष स्पॉट तपासणी मध्ये ३ लाख २१ हजार रुपये इतका दंड वसूल करण्यात आला आहे. स्पॉट तपासणी मध्ये एकूण ७ अनाधिकृत विक्रेत्याकडून दंड वसूल करण्यात आला आहे. स्पॉट तपासणी मध्ये तिकीट नसलेले आणि अनियमित असे ८२३ प्रवासी आढळून आले. स्पॉट तपासणी मध्ये एकूण ५५ हजार ६०० रुपये दंड वसूल करण्यात आला. स्पेशल तपासणी मध्ये तिकीट नसलेले आणि अनियमित असे १५७ प्रवासी आढळून आले. या स्पॉट तपासणी मध्ये २१ तिकीट निरीक्षक सहभागी झाले होते.



### रोटरी क्लब ऑफ मोडनिंबच्या वतीने बचत गटासाठी उपक्रम

**मोडनिंब, दि. १८ ऑक्टोबर-**

रोटरी क्लब ऑफ मोडनिंबच्या वतीने महिला बचत गटासाठी व्यवसाय पूरक वस्तूचे उद्घाटन करण्यात आले. शेवया मशीन तसेच डाळीचे पीठ करायची मशीन यासह विविध प्रकारच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. कार्यक्रमाचे उद्घाटन मोडनिंब रोटरी क्लबचे जेष्ठ सदस्य रो.डॉ. गोळवलकर, उमेदचे अवधूत देशमुख यांच्या हस्ते झाले. याबरोबरच स्मशानभूमी सुशोभिकरणाचे उद्घाटन करण्यात आले. रोटरीचे अध्यक्ष डॉ. संतोष दळवी यांनी बचत गटातील महिलांना स्वयंपूर्ण करण्यासाठी रोटरीने या कार्यक्रमाचे आयोजन करून पुढील काळात याहीपेक्षा चांगले कार्यक्रम राबविण्याचे, तसेच महिलांनी स्वयंस्फूर्तीने पुढे आले पाहिजे, असे आपल्या मनोगतात व्यक्त केले. उमेदचे अवधूत देशमुख यांनी नवनवीन प्रोजेक्ट बद्दल भरपूर माहिती दिली, अशा प्रकारचे प्रोजेक्ट आपल्या गावातही राबवू, असे सांगितले. तसेच रोटरी क्लब ऑफ मोडनिंबचे संस्थापक अध्यक्ष डॉ. प्रशांत कोल्हे यांनी रोटरी बरोबरच नवनवीन प्रोजेक्ट विषयी माहिती दिली. सचिव सुनील रेपाळ यांनी आभार मानले, या कार्यक्रमासाठी निलेश गिड्डे, डॉ.वागज, शेतकी अधिकारी संतोष सुर्वे व भेंड ग्रामस्थ उपस्थित होते.

# रंगभूमी म्हणजे कलेचे अभयारण्य, प्रयोगशाळा : सुव्रत जोशी

**ठकीशी संवाद नाटकातून उदारमतवादावर प्रकाश**

**'प्रिसिजन गप्पा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद**



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि १८ ऑक्टोबर -**

रंगभूमी म्हणजे कलेचे अभयारण्य आहे. कलेची प्रयोगशाळा आहे. नाटक म्हणजे मोठ्या माणसांची भातुकली असते, असे मत अभिनेता सुव्रत जोशी यांनी व्यक्त केले. प्रिसिजन फाउंडेशन तर्फे आयोजित प्रिसिजन गप्पा कार्यक्रमात घेतलेल्या मुलाखतीत ते बोलत होते.

प्रारंभी प्रिसीजन फाउंडेशनतर्फे आयोजित प्रिसीजन गप्पा कार्यक्रमाच्या १६ व्या पर्वाचे उद्घाटन सतीश आळेकर यतिन शहा, डॉ सुहासिनी शहा, रवींद्र जोशी,अनुपम बर्वे, सुव्रत जोशी गिरीजा यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी अतिशय संवाद या नाटकाचा प्रयोग प्रिसिजन फाउंडेशन तर्फे प्रेक्षकांसाठी ठेवण्यात आला होता . प्रेक्षकांनीही या नाटकाला चांगली दाद दिली.

यावेळी सुव्रत जोशी यांनी रंगभूमी व नाटकाबद्दल बोलताना, रसिक नाटक चांगले ऐकत बघत असतात त्यावेळी शब्दांचे नवे अर्थ आम्हालाही समजतात. सतीश सरांची नाटकांविषयी व्याख्या वेगळी आहे. नाटक म्हणजे मोठ्या माणसांची भातुकली असते असे सांगितले. अभिनेत्री गिरिजा ओक यांनी सध्या आयडॉलॉजीपेक्षा जास्त सध्याच्या वातावरणात स्वतःचे मत मांडण्याची अथवा भूमिका घेण्याचा अधिकार राहिलेला नाही. नाटक या माध्यमावर खूप प्रेम आहे. मी आळेकर सरांची नाटके बघत मोठी झाले. त्यांना नाही म्हणणे मूर्खपणाचे ठरले असते म्हणून हे नाटक केल्याचे सांगितले. नाटकाचे लेखक सतीश आळेकर यांनी नाटकाबद्दल बोलताना परिस्थितीतील बदलांना उजाळा दिला. राजकीय संस्कृती १९९० नंतर बदलायला लागली. त्यांनतर आताच्या परिस्थितीकडे वयाच्या ७५ व्या वर्षी नाटक लिहून झाल्याचा आनंद आहे. दिल्ली येथे आयआयसी येथे फिरताना करगोट्याबद्दल विचार आला. करगोट्याबद्दल लिहिताना घरातील वातावरण राजकीय पार्श्वभूमी होती. त्यानंतर सगळं बदलत गेले. राजकारणातील उदार मतवादपणा आधीचा सध्या राहिलेला नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव देशपांडे यांनी केले.

## रक्त दानानंतर नव्याने शुद्ध रक्त तयार होते : डॉ. अरुंधती हरळकर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

माणसाच्या शरीरात रक्त दान केल्या नंतर अवघ्या दोन मि निटानंतर नव्याने शुद्ध रक्त तयार होण्यास सुरुवात होते. एक प्रकारे रक्त दान केल्याने आपलाच अधिक फायदा होते. त्यामुळे

मोठ्यासंख्येने विद्यार्थ्यांनी रक्तदान मोहिमेत सहभागी व्हावे असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेचे क्षय रोग तज्ञ डॉ अरुंधती हराळकर यांनी विद्यार्थ्यांना केले. श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या स्मरणार्थ वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत आणि श्रीमान भाऊसाहेब गांधी प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबीरात डॉ हराळकर बोलत होते. या शिबिरात ४४८ विद्यार्थी उत्स्फूर्तपणे रक्तदानात सहभागी झाले. यावेळी डब्ल्यु.आय.टी. चे प्राचार्य डॉ. विजय आठवले यांच्यासह सर्व विभाग प्रमुख, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येनेउपस्थित होते. डॉ अरुंधती हराळकर यांनी रक्तदान करून रक्तदानाचे महत्व कृतीशीलपणे दाखवून दिले.

आपल्या शैक्षणिक कालावधीत विद्यार्थ्यांनी रक्तदानासाठी पुढे येणे स्वागतार्ह आहेच, त्याही पुढे जाऊन समाजातील खऱ्या गरजू रुग्णासाठी केलेले रक्तदान मोलाचे ठरते, असेही डॉ अरुंधती हरळकर यांनी स्पष्ट केले. प्रारंभी स्वर्गीय श्रीमान भाऊसाहेब गांधी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दिपप्रज्ज्वलनाने कार्यक्रमाला सुरूवात झाली. प्रस्तावना दिया लोढा हिने केले. पाहुण्यांची ओळख वैष्णवी शिंदे हिने करून दिला. संजना सुरपूरकर हिने आभार मानले.



**डब्ल्युआयटीच्या ४४८ विद्यार्थ्यांचा रक्तदानात उत्स्फूर्तपणे सहभाग**

**मध्य रेल्वे**
**सोलापूर मंडळ**

**विविध कामांसाठी उपकरणांची तरतूद**

DRM (ST) कार्यालय, मध्य रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित फर्म/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.Ireps.gov.In वर ऑनलाइन ई-निविदा मागवतात. : कामाचे नाव त्याच्या परिसरासह: मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात रिअल टाइम स्थिती, पुरवठा आणि इनडोअर आणि आउटडोअर सिग्नलिंग उपकरणांची स्थापना करण्यासाठी उपकरणांची तरतूद. कामाची किंमत: 97,35,476.36. निविदा फॉर्मची किंमत: NIl. जमा करावयाचे बयाणा पैसे: 1,94,700/-. काम पूर्ण होण्याचा कालावधी: 12 महिने. www.ireps.gov.in वर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 08/11/2024 15.30 वाजता. तपशील IREPS वेबसाइटवर उपलब्ध आहेत. शुद्धीपत्र/दुरुस्ती जर असेल तर ती फक्त वरील ई-प्रोक्योरमेंट वेबसाइटवर अपलोड केली जाईल. फक्त ऑनलाइन निविदा स्वीकारल्या जातील. मॅन्युअल / पोस्टल / ई-मेल, फॅक्स, हाताने निविदा स्वीकारल्या जाणार नाहीत. बोलीदारांनी कंपनीच्या नावासह वर्ग III चे डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र मिळवावे आणि www.Ireps.gov वर नोंदणी करावी. अर्नेस्ट मनी (EMD) चे पेमेंट फक्त नेट बँकिंग किंवा पेमेंट गेटवेद्वारे स्वीकारले जाईल. अधिक तपशिलांसाठी कृपया www.Ireps.gov.in ला भेट द्या.

**ई-निविदा सूचना (पुन्हा आमंत्रण) क्रमांक: SUR-N-T-2024-25-38 दि. 17/10/2024**

**DRM, ST शाखा,**
**मध्य रेल्वे, सोलापूर**

**रेलवे फाटक को बंद स्थिति में पार करना मना है**

Sai/SUR/24

## पुष्पावती पाटील यांचे निधन

**मोडनिंब, दि. १८ ऑक्टोबर-**



मोडनिंब ग्रामपंचायतीच्या माजी सदस्या पुष्पावती बाबुराव पाटील (वय ७२)यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांचच्या पश्चात पती, तीन मुले, तीन मुली, सुना नातवंडे असा परिवार आहे.

**नावात बदल**

माझे जुने नाव - **चंद्रशेखर अमोघसिध्द बोधले** असे होते ते बदलून मी माझे नवीन नाव - **चंद्रशेखर अमोगसिध्द बोधले**

(पत्ता-बी-७५ शिवगंगा नगर जुळे सोलापूर जि. सोलापूर पिन कोड- ४१३ ००४) असे केले आहे. तरी मला आजपासून माझे नवीन नावाने ओळखावे.

**जाहीर समन्स**

**उपनिबंधक, सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापूर**
**सोलापूर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था, नियमित सोलापूर**
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापूर ४१३००३

**श्री पंचमुखी हनुमान नागरी सहकारी पतसंस्था, मर्यादित, शेळगी, सोलापूर** - **अर्जदार**
**विरुद्ध**
(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) - **जाब देणार**

| अ. क्र. | दावा क्रमांक | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नाव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | १५७/२०२४ | ४१,५७८/- | २ | **२. सौ सरूबाई नारायण फुलमारी** राहणार २२४, शनिवार पेठ, रविंद्र बॅग जवळ, सोलापूर. ४१३००५ मो ८४८५९०४१५० |
| | | | ३ | **३. श्री तुळजाराम दिगंबर हुनकेरी** राहणार २८ तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर. ४१३००५ मो. ८८८८५३७५३६ |
| २ | १५८/२०२४ | ४४,१४४/- | १ | **१. सौ निर्मला मुरलीधर सामल** राहणार रविंद्र बाग समोर, ६/२/२ विवेकानंद शक्ती प्रयोग मंडळ, तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर. ४१३००५ मो.नं. ७४९८४६३६३२ |
| | | | २ | **२. सौ अन्नपूर्णा सिद्राम सुनकेरी** राहणार २३५/१३ तेलंगी पाच्छापेठ, श्रीनिवास टॉकीज, सोलापूर ४१३००५ मो. ८६२३८०१५१४ |
| | | | ३ | **३. श्री नितीन मुरलीधर सामल** राहणार रविंद्र बाग समोर ६/२/२ तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर. ४१३००५ मो नं ७४९८४६३६३२ |
| ३ | १६०/२०२४ | ४७,३५१/- | १ | **१. सौ अंबिका अर्जुन सामल** राहणार रविंद्र बाग समोर ६/२/२ तेलंगी पाच्छापेठ, सोलापूर. ४१३००५ मो नं ८३९०३९४४३३ |
| | | | २ | **२. सौ भारतीबाई तुळजाराम हुनकेरी** राहणार २८ तेलंगी पाच्छापेठ, सोलापूर ४१३००५ मो. ७३३७७८२३४० |
| | | | ३ | **३. श्री नितीन अर्जुन सामल** राहणार रविंद्र बाग समोर ६/२/२ तेलंगी पाच्छापेठ, सोलापूर. ४१३००५ मो नं ९७३०३९४४२२ |
| ४ | १६१/२०२४ | ४०,४६७/- | १ | **१. सौ रेणूका गणेश दहिहंडे** राहणार ५६/५ तेलंगी पाच्छापेठ, सोलापूर ४१३००५ मो ७०८२७५९३२६ |
| | | | २ | **२. सौ. तरन्नूम आसिफ बेद्रेकर** राहणार १८७ तेलंगी पाच्छापेठ, सोलापूर ४१३००५ मो. ८७८८१३७७०४ |
| ५ | १६३/२०२४ | १८,५६१/- | १ | **१. श्री मुजम्मील सादीक नाविंदगी** राहणार ३१ बसेश्वर नगर, शास्त्री नगर, सोलापूर ४१३००३ मो. ८४८३८९३९३८ |
| ६ | १६५/२०२४ | ४४,९१४/- | १ | **१. सौ भारतीबाई तुळजाराम हुनकेरी** राहणार २८ तेलंगी पाच्छा पेठ, सोलापूर ४१३००५ मो. ७३३७७८२३४० |
| | | | २ | **२. सौ अंबिका अर्जुन सामल** राहणार रविंद्र बाग समोर ६/२/२ तेलंगी पाच्छापेठ, सोलापूर. ४१३००५ मो.नं. ८३९०३९४४३३ |
| | | | ३ | **३. श्री तुळजाराम दिगंबर हुनकेरी** राहणार रविंद्र बाग समोर २८ तेलंगी पाच्छापेठ, सोलापूर. ४१३००५ मो.नं. ८८८८५३७५३६ |
| ७ | १६६/२०२४ | १,१९,४१८/- | १ | **१. श्री श्रीबास निताई मोंडल** राहणार ४१६ पूर्व मंगळवार पेठ, वारद बोळ, सोलापूर ४१३००२ मो. ९०२८१९६४४० |
| | | | २ | **२. श्री तपन चंडी पोरिया** राहणार सिध्दार्थ गोल्ड आर्ट ९७ भवानी पेठ, शिवगंगा मंदीरजवळ, सोलापूर ४१३००२ |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्याने / पत्यावर आढळून येत नसल्याने / अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहिर समन्स देण्यात येत आहे.

**प्रतिवादी यांना जाहिर समन्सद्वारे कळविण्यात येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकीलामार्फत दिनांक : ०५/११/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता कागदपत्रासह या कार्यालयात हजर राहावे. प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्यतो निर्णय केला जाईल.**

आज दि. १७/१०/२०२४ रोजी माझी सही कार्यालयाचे मुद्रेसह हे जाहिर समन्स दिले आहे.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : १७/१०/२०२४**

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक**
**सहकारी संस्था सोलापूर शहर, सोलापूर**

**महाराष्ट्र महसूल व वन विभाग**
**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय अक्कलकोट यांच्या न्यायालयात**
**संकलन अभिलेख कक्ष**
दूरध्वनी नं. ०२१८१-२२०२३३ Email- tahakkalot@.gmail.com

जा.क्र. २०२४/अभिलेख/कावि ४७७/२०२४ दि. १९/०९/२०२४

**जाहिर प्रसिध्दीकरण**

प्रति,
**श्री. बापू शरणप्पा कोळी** - **अर्जदार**
रा. भोसगे ता. अक्कलकोट
विरुध्द
**जन्म मृत्यू नोंदणी, कार्यालय ग्रामपंचायत, भोसगे ता अक्कलकोट** - **सामनेवाला**

ज्याअर्थी, यातील बापू शरणप्पा कोळी ता. अक्कलकोट जि. सोलापूर यांनी या कार्यालयाकडे अर्ज करुन त्यांचा जन्म दि. ०१/०७/१९८५ रोजी मौजे भोसगे ता. अक्कलकोट येथील राहत्या घरी झाला आहे. परंतू माझ्या जन्माची नोंद हे सामनेवाला यांच्या दप्तरी आढळून आले नाही. त्यामुळे अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद करुन बापू शरणप्पा कोळी या नावाने जन्म दाखला मिळण्याकामी जन्म मृत्यू नोंदणी (दुरुस्ती) अधिनियम २०२३ चे कलम १३ (२) (३) अन्वये मा. तहसिलदार अक्कलकोट यांच्या न्यायालयात दि.१५/०७/२०२४ रोजी अर्ज दाखल केलेला आहे. त्याअर्थी सदर अर्जाकामी अर्जदार यांनी जन्म दाखला मिळणेकामी कोणाची हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात स्वतः अथवा आपल्या वकिलामार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे मांडावे. मुदतीत कोणचाही काही हरकत अथवा म्हणने न आल्यास कोणाचीही हरकत नाही असे समजून या अर्जाची चौकशी होऊन अर्जदारास संबंधीत दाखला देण्यात येईल.

हे आज दि. १९/०९/२०२४ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**(विनायक मगर)**
**तहसिलदार, अक्कलकोट**

Classifieds

**नोकरीविषयक**

**नर्सरी (शेती) काम करणारे जोडपे, ड्रायव्हर पाहिजेत. राहण्याची उत्तम सोय. पगार 18 - 22,000 महिना जोडीला. 9890143432 अकलूज.**

**जागाविषयक**

**सात रस्ता स्टेट बँकेजवळ भीमपुरे कॉम्प्लेक्स येथे १ल्या मजल्यावरील १००० स्के.फु. जागा ए.सी. ऑफिस फर्निचरसह व्यवसायासाठी भाड्याने देणे आहे. 9890665490**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

**खरेदीपुर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मौजे गोडगांव ता. बार्शी, व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. बार्शी व ता. बार्शी पैकी मौजे गोडगांव ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन मिळकत गट नं. ४१३/५ पैकी उत्तरेकडील बाजुची शेतजमीन क्षेत्र ०० हे ६९ आर आकार ०० रु. ६४ पैसे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - चव्हाण यांचे क्षेत्र, दक्षिणेस - जहाँगीर शेख यांचे क्षेत्र, पश्चिमेस - नरसुडे यांचे क्षेत्र, उत्तरेस - पाटील यांचे क्षेत्र येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक शेतजमीन आतील तदंगभुत वस्तूंसह व मालकी वहिवाटीच्या हक्कांसह.

वरील वर्णन केलेली शेतजमीन ही **अस्लम बाबु शेख** यांना रे.मु.नं. ११६२/२०१३ या दाव्यामधील तडजोड हुकुमनाम्याप्रमाणे मिळालेली असून, त्यांचे शेतजमीन गट नं. ४१३/५ चे ७/१२ उताऱ्यास स्वतंत्र मालकी हक्कात नोंद आहे.

वर नमूद शेतजमीनीचे ७/१२ उताऱ्यास **अस्लम बाबु शेख** यांचे मालकी हक्कात नोंद असुन त्यांनी सदर मिळकतीचा कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकार पोर्णीमा आबासाहेब सुर्ती यांचे बरोबर कायमखुश खरेदी देण्याचा, ठराव करून वर नमुद शेतजमीनीची साक्षीदारासमक्ष खरेदी व्यवहाराची बोलणी करुन इसारा दाखल रोख रक्कम स्विकारलेली आहे. तसेच त्यांनां आमचे अशिलास सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री दिलेली आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे. तरी, वर नमुद मिळकती संदर्भाने इतर कोणीही कसल्याही प्रकारचा साठे करार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण, अथवा बैंक कर्ज बोजे व विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क अधिकार निर्माण होतील असा कोणताही व्यवहार करु नये. तसे केल्यास तो व्यवहार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याउपरही वर नमुद शेतजमीनी संदर्भाने साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण, अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क अधिकार निर्माण होतील असा दस्त केला असल्यास त्यासंबंधीचा सर्व ती कागदपत्रे घेऊन आमचे पक्षकार किंवा त्यांचे माहितीगार वकिल ॲड. आर.ए. पाटील यांच्याकडे येत्या आठ (०८) दिवसाचे आत संपर्क करावा अन्यथा वर नमुद शेतजमीन ही निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील त्यानंतर कोणाचीही तक्रार किंवा हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणून ही जाहीर नोटीस दिली असे. ता. १७/१०/२०२४

**सही/-**
**श्री. ॲड. राहुल अंकुश पाटील (गुंड)**
**बी.ए., एल.एल.एम.**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**मो. ९५२७०२३११८**

**खरेदीपूर्व जाहीर नोटीस**

तमाम लोकांस विशेषतः मोजे गौडगांव ता. बार्शी, व आसपासचे परिसरातील तसेच बार्शी तालुक्यातील लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, डि. सोलापूर सब डि. बार्शी व ता.बार्शी पैकी मौजे गौडगांव ग्रामपंचायत हद्दीतील शेतजमीन मिळकत गट नं. ४१३/५ पैकी दक्षिणेकडील बाजुची शेतजमीन क्षेत्र ०० हे ६९ आर आकार ०० रु. ६४ पैसे यासी चतुःसिमा :- पुर्वेस - चव्हाण यांचे क्षेत्र, दक्षिणेस - लक्ष्मण दराडे यांचे क्षेत्र, पश्चिमेस - नरसुडे यांचे क्षेत्र, उत्तरेस - सदर गटापैकी अस्लम शेख यांचे क्षेत्र येणेप्रमाणे चतुःसिमा पुर्वक शेतजमीन आतील तदंगभुत वस्तूंसह व मालकी वहिवाटीच्या हक्कांसह.

वरील वर्णन केलेली शेतजमीन ही **जहाँगीर बाबु शेख** यांना रे.मु.नं. ११६२/२०१३ या दाव्यामधील तडजोड हुकुमनाम्याप्रमाणे मिळालेली असून, त्यांचे शेतजमीन गट नं. ४१३/५ चे ७/१२ उताऱ्यास स्वतंत्र मालकी हक्कात नोंद आहे.

वर नमुद शेतजमीनीचे ७/१२ उताऱ्यास अस्लम बाबु शेख यांचे मालकी हक्कात नोंद असुन त्यांनी सदर मिळकतीचा कायदेशीर गरजेपोटी आमचे पक्षकार रंजना आबासाहेब सुर्ती यांचे बरोबर कायमखुश खरेदी देण्याचा, ठराव करून वर नमुद शेतजमीनीची साक्षीदारासमक्ष खरेदी व्यवहाराची बोलणी करुन इसारा दाखल रोख रक्कम स्विकारलेली आहे. तसेच त्यांनी आमचे अशिलास सदर मिळकत हो निर्वेध, निजोखमी व बिनबोजाची असल्याची खात्री दिलेली आहे. तसेच त्यांनी सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी खरेदी देण्याचे मान्य व कबूल केले आहे. तरी, वर नमुद मिळकती संदर्भाने इतर कोणीही कसल्याही प्रकारचा साठे करार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण, अथवा बँक कर्ज बोजे व विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क अधिकार निर्माण होतील असा कोणताही व्यवहार करु नये. तसे केल्यास तो व्यवहार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याउपरही वर नमूद शेतजमीनी संदर्भाने साठेकरार, खरेदीखत, भाडेपट्टा करार, वहिवाट, वहिवाटीचे अधिकार, मालकी हक्क, वारसा, गहाण, अथवा विकसन करार इत्यादी वा अन्य कोणतेही कायदेशीर हक्क अधिकार निर्माण होतील असा दस्त केला असल्यास त्यासंबंधीची सर्व ती कागदपत्रे घेऊन आमचे पक्षकार किंवा त्यांचे माहितीगार वकिल ॲड. आर.ए. पाटील यांच्याकडे येत्या आठ (०८) दिवसाचे आत संपर्क करावा अन्यथा वर नमुद शेतजमीन हो निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही तक्रार किंवा हरकत चालणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन ही जाहीर नोटीस दिली असे. ता. १७/१०/२०२४

**सही/-**
**श्री. ॲड. राहुल अंकुश पाटील (गुंड)**
**बी.ए., एल.एल.एम.**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**
**मो. ९५२७०२३११८**

SHRIRAM HOUSING FINANCE

**श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

**मुख्य कार्यालय:** लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
**दूरध्वनीः** ०२२ ४२४१ ०४००, ०२२ ४०६० ३१०० **वेबसाइट:** http://www.shriramhousing.in
**नोंदणीकृत कार्यालय:** श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८;
**शाखा कार्यालय:** कार्यालय क्रमांक एफ - 3, पहिला मजला, कनाळे प्लाझा, डफरीन चौक, रेल्वे लाईन्स, सोलापूर – ४१३००१

**परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना**

**सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.**

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडकडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा वास्तविक ताबा श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड (एसएचएफएल) सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली नमूद केलेले कर्जदार व जामीनदारांकडून श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड यांना देय असलेली खाली तक्त्यात नमूद रक्कम वसुलीकरिता खाली दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दिनांक ०७.११.२०२४ सकाळी ११.०० दरम्यान ते दुपारी १२.०० वा. पर्यंत** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार / तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन व ज्ञात अधिभार , ताबा प्रकार , आरक्षित मुल्य व इसारा रक्कम आणि वाढीव मूल्याचे तपशील खालीलप्रमाणे :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवण्याऱ्यांचे नाव | तारीख व रक्कम १३(२) डिमांड सूचनेनुसार | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | अनामत राशी ठेवींचा (ईएमडी ) तपशील | लिलावाची तारीख व वेळ | व्यक्तींचे संपर्क आणि सर्वेक्षण तारीख |
|---|---|---|---|---|---|
| **१. श्री. सुभाषचंद्र मल्लिकार्जुन बरुरे (कर्जदार १)**<br>**२. श्रीमती हेमलता सुभाषचंद्र बरुरे (कर्जदार २),**<br><br>**दोघांचा निवासाचा पत्ता :**<br>**G. NO. १७६, मुक्काम - तडवळ, तालुका अक्कलकोट, सोलापुर्याबाजी गल्ली, अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर - ४१३२१९**<br>**आणि येथे देखील :**<br>**सुमित इलेक्ट्रिकल आणि झेरॉक्स सेंटर, मुक्काम - तडवळ, तालुका अक्कलकोट, सोलापुर्याबाजी गल्ली, अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर - ४१३२१९**<br>**लॅनः: SHLHSOLR0000128**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**११ सप्टें., २०२३ - भौतिक ताबा**<br>**ज्ञात अधिभार** ज्ञात नाही | मागणी सूचना दिनांक : ०४.११.२०१९<br><br>दिनांक २५.०९.२०१९ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000128 अंतर्गत ररु. ६,२६,१४६/- (रुपये सहा लाख सव्वीस हजार एकशे शेचाळीस फक्त)) आणि संविदात्मक दराने पुढील व्याजासह, उक्त सूचना प्राप्त झाल्याच्या तारखे पासून ६० दिवसांच्या आत . | रु. २,२०,००० /- (रुपये दोन लाख वीस हजार फक्त)<br><br>बोली वाढविणे : रु. १०,०००/- आणि त्यापटीने<br><br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. २२,०००/- (रु. बावीस हजार फक्त)<br><br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : ६ नोव्हेंबर २०२४ वेळ : सकाळी ०९.०० ते ०५.०० वा.** | ईएमडी रक्कम खाली नमूद केलेल्या खात्याच्या तपशिलानुसार आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात जमा करावी:<br>**बँकेचे नाव-** ॲक्सिस बँक लिमिटेड<br>**शाखा:** वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई<br>**बँक खाते क्रमांक-** चालू खाते क्रमांक ९११०२००४५६ ७७६३३<br>**आयएफएससी कोड-** यूटीआयबी 0000२३० | **०७ नोव्हेंबर २०२४**<br><br>**वेळ. सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वा.** | **सुनील मानेकर ८९९९३४४८९७**<br><br>**मयूर भोजने ८८९८५२७०७६**<br><br>**अश्फाक पत्का ९८१९४१५४७७**<br><br>**मालमत्ता तपासणीची तारीख: २६ ऑक्टोबर २०२४ वेळ दुपारी १२. ०० वा. ते दुपारी ३.००** |

**संपत्तीचे विवरण**

फ्री होल्ड पूर्व उत्तर कॉर्नर जमीन असलेल्या स्थावर मालमत्तेचे सर्व तुकडा आणि खंड ज्याचे क्षेत्रफळ प्लॉट क्रमांक 11 पैकी १००.00 चौ. मीटर , गट नं. १७९/१ पैकी, असून ती मुक्काम - तडवळ, तालुका अक्कलकोट, जिल्हा - सोलापूर येथे स्थित आहे आणि सीमा खालीलप्रमाणे:-उत्तर :- गट क्रमांक १७९/१ , दक्षिण :- प्लॉट क्र.११, पूर्व:- रस्ता, पश्चिम :- प्लॉट एन

**कोणतेही कारण न देता काही किंवा सर्व बोली नाकारण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी राखून ठेवीत आहे. लिलावाचे नियम व अटी आणि निविदा सादर करण्याची / बोली अर्ज प्राप्त करण्याची जागा / निविदा उघडणे व लिलाव प्रक्रिया यासंबंधी तपशिलांसाठी कृपया संकेतस्थळाला भेट द्या, कृपया श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या संकेतस्थळाला भेट द्या जे संकेतस्थळाच्या https://shriramhousing.in/e-auction-Residential या पत्त्यावर श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेडच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**ऑनलाईन लिलाव आमची लिलाव एजन्सी सी१ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, पत्ता: प्लॉट क्र.६८, ३ रा मजला, सेक्टर-४४, गुरूग्राम – १२२००३, हरयाणा यांच्या https://www.bankeauctions.com या वेबसाईटवर पार पाडला जाईल. कोणत्याही सहाय्यासाठी, तुम्ही tn@c1india.com, support@bankeauctions.com या इमेल आयडीवर इमेल पाठवू शकता.**

**सूचना: कृपया नोंद घ्या की सिक्योर्ड क्रेडीटर कर्ज घेणा-याला / खात्रीदाराला सेल नोटीस जारी करणार आहे जी स्पीड / रजिस्टर पोस्ट / कुरियर केली जाईल. जर कोणत्याही पक्षाला ती न मिळाल्यास हे सेल नोटीसचे प्रकाशन सेवेचा पर्यायी मार्ग असे समजले जाईल.**

**सरफेसी कायदा,२००२ च्या नियम ८(६) अन्वये वैधानिक १५ दिवसांची विक्री सूचना:**
**कर्जदार / तारणकर्ता / जामिनदार यांना येथे सूचित करण्यात येत आहे की, ई-लिलावाच्या तारखेपूर्वी अर्थात ०७.११.२०२४ पूर्वी अद्ययावत व्याज व अनुषंगिक खर्चांसह वर नमूद केलेली संपूर्ण रक्कम जमा करावी, अन्यथा मालमत्तेचा लिलाव / विक्री केली जाईल आणि उर्वरित रक्कम असल्यास ती व्याज व शुल्कासह वसूल करण्यात येईल.**

**ठिकाण :** सोलापूर
**दिनांक :** १९-१०-२०२४

**स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी**
**श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## १७ लाखांच्या फसवणूकप्रकरणी आरोपीचा जामीन मंजूर

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर -**

तालुक्यातील वैराग भागातील फिर्यादी हे गोकुळ शुगर लि. धोत्री (ता. दक्षिण सोलापूर) या कारखान्याकडे ऊस वाहतुकीसाठी ऊसतोड कामगार पुरविण्याचे काम करतात. त्यासाठी त्यांनी यातील आरोपी जयंद्र जयचंद राठोड यांच्यासोबत कामगार पुरवणीकरिता करार केला होता. त्या कराराप्रमाणे यातील आरोपी यांनी यातील फिर्यादीकडून करारापोटी १७ लाख रुपये ही रक्कम घेतली होती. त्या कराराप्रमाणे यातील आरोपीने १७ लाख रुपये रक्कम घेऊन कुठल्याही कामगार न पुरवता फिर्यादीने कामगार व पैसे वारंवार मागूनही देण्यास टाळाटाळ केल्यामुळे यातील आरोपीविरुद्ध वैराग पोलीस स्टेशन येथे भारतीय दंड विधान, कलम ४२०, ४१७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. आरोपीने ॲड. अनिकेत सहदेव गुंड यांच्यावतीने कोर्टामध्ये जामीन अर्ज ठेवला होता. सदर जामीन अर्जाच्या सुनावणीवेळी आरोपीच्या वकील ॲड. अनिकेत गुंड यांनी केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून आरोपीचा जामीन अर्ज मंजूर करण्यात आला. सदर प्रकरणी आरोपीतर्फे ॲड. अनिकेत गुंड, ॲड. ऋषिकेश ननवरे, ॲड. प्रदीप शेळवणे यांनी काम पाहिले.

## दुचाकी वाहनांच्या आकर्षक नोंदणी क्रमांक राखून ठेवण्यासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**सोलापूर. दि. १८ ऑक्टोबर-**

सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालय या कार्यालयात लवकरच दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिका सुरु होणार आहे. वाहनांची नवीन मालिका चालू होण्याच्या दिवशी प्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर इच्छुकांची गर्दी होते व त्यामुळे कार्यालयीन व्यवस्थेवर त्याचा ताण पडतो व बऱ्याच वेळा नागरिकांनाही याचा त्रास होतो. नागरिकांना होणारा त्रास कमी व्हावा व त्यांना हवा असणारा आकर्षक नोंदणी क्रमांक उपलब्ध असल्यास त्यांना सुलभतेने तो मिळावा, यासाठी ज्या दुचाकी वाहन मालकांना आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक विहीत शुल्क भरुन हवे असतील त्यांनी दिनांक २१ ऑक्टोबर २०२४ रोजी सोबतच्या वेळापत्रकानुसार कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ४ या दरम्यान विहीत नमुन्यातील अर्जामध्ये कार्यालयाच्या नवीन नोंदणी विभागात डीडी (केवळ क्र १६ अन्वये जारी झालेले डी डी), पत्त्याचा पुरावा, आधार लिंक मोबाईल नंबर, ओळखपत्र, पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतीसह स्वतः जमा करावा. सदर डीडी फक्त डी वाय आरटीओ सोलापूर यांच्या नावे नॅशनलाईज शेडयुल्ड बँकेचा असावा. या व्यतिरिक्त इतर नावाचे डीडी बाद ठरवले जातील, असेही सोलापूर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने कळविले आहे.

# माळशिरस विधानसभेची मतमोजणी अकलूजमध्ये होणार

### निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर : आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. १८ ऑक्टोबर-**

विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासन सर्व तोपरी सज्ज झाले आहे. सर्व राजकीय पक्षांनी आणि नागरिकांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करुन निवडणुकीसाठी सहकार्य करण्याचे आवाहन करत आतापर्यंत माळशिरस येथे मतमोजणी व्हायची. तेथे ६ हजार स्केअर फूट जागा होती. त्याठिकाणी मशीन ठेवण्यासाठी अडचण होत होती. त्यामुळे अकलूज येथे वखार महामंडळाच्या १० हजार स्केअर फुटाचे तीन गोडाऊनमध्ये मतमोजणी होणार आहे, असे माळशिरस विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी विजया पांगारकर यांनी सांगितले.

अंतिम मतदार यादीमध्ये पुरुष मतदार १,७८,१४७, स्त्री मतदार १,६६,०४३ व इतर ३१ असे एकूण ३,४४,२२१ इतकी मतदार संख्या होती. त्यानंतर प्रशासनाने विविध माध्यमातून मतदार नोंदणी मोहीम राबविली. त्याचा सकारात्मक परिणाम झाला असून १६ ऑक्टोबर रोजी प्रसिद्ध करण्यात आलेल्या मतदार यादीत पुरुष १,७९,५५८, स्त्री १,६८,१९७ तर इतर ३२ असे एकूण ३,४७,७८७ इतकी मतदार संख्या झाली आहे. विशेष बाब म्हणजे ४ ऑक्टोबर रोजी झालेल्या विशेष शिबिरानंतर ३९६ तरुण मतदारांचीही संख्या वाढल्याचे पांगारकर यांनी सांगितले. अद्याप ही मतदार नोंदणी चालू असून १९ ऑक्टोबरपर्यंत नोंदणी करणाऱ्या मतदारांची नावे यादीत येणार आहेत. तेव्हा नाव नोंदणी नसलेल्या मतदारांनी आपली नावे नोंदणी करुन घेण्याचे आवाहनही त्यांनी केले. ३० ऑगस्ट रोजीच्या अंतिम यादीत असलेले ४०६ सैनिक मतदारांची संख्या कमी होऊन १६ ऑक्टोबरच्या यादीत ४०० झाली.




### प्रशासनाचे आवाहन

- कुटुंबातील सर्व सदस्यांचे मतदान एकाच मतदान केंद्रावर येण्यासाठी नागरिकांनी संपर्क साधावा
- एनसीसी, एनएसएसमधील युवकांनी भविष्याचा विचार करुन स्वयंसेवक म्हणून योगदान द्यावे
- २ ते २.५ हजार पोस्टल मतदान
- ४६ बस, ७० जिपचा होणार वापर

### ७७ मतदान केंद्रांचे विलिनीकरण

मतदार संख्येत असणारी विषमता टाळण्यासाठी सरासरी १३५० ते १५०० मतदारांसाठी एक मतदान केंद्र व्हावे यासाठी ७७ मतदान केंद्रांचे विलिनीकरण करण्यात आले. विलीन मतदान केंद्राची संख्या व क्रमांक (जुने मतदान केंद्र क्रमांक) कुरबावी- ६ व ७, डोंबाळवाडी ८ व ९, कारुंडे १७ व १८, एकशिव २८ व २९, नातेपुते-४७, ५२, ५३, ५४, ५८, ५९, ६०, फोंडशिरस ७०, ७१, ७२, ७५, ७७, फडतरी ८१ व ८२, मांडवे ८९ व ९०, सदाशिवनगर १०५ व १०६, तिरवंडी १२७ व १२९, माळशिरस, १३५, १३६, १३७, १३८, १३९, १४०, १४१, १४२, १४४, १४५, तरंगफळ-१६४ व १६५, यशवंतनगर १८२ व १८५, सुळेवाडी २०५ व २०६, पिलीव २०७, २०९, २१०, २१२, पिसेवाडी २२३ व २२५, माळेवाडी अकलूज २३० व २३१, अकलूज, २४८, २४९, २५५, २६६, संग्रामनगर २६०, २६१, २६३, २६४, तांबवे, २७७ व २७९, वेळापूर २९३, २९४, २९७, ३००, कोळेगाव-३१६, ३१७, ३१८, तांदुळवाडी ३२२ व ३२४, धानोरे ३२९ व ३३० दसूर ३३३ व ३३४, उघडेवाडी ३३७ व ३३८.

### सहा मतदान केंद्रांच्या नावात झाला बदल

जाधववाडी-११०, पानीव-१६८ (नवीन क्रमांक-१७०), वेळापूर-२९६ (नवीन क्रमांक-३०१), तांदुळवाडी-३२५, ३२६, ३२७ (नवीन क्रमांक ३३१, ३३२, ३३३).

### तीन मतदान केंद्रांच्या स्थानात बदल

देशमुखवाडी-४, पठाणवस्ती (वाणीवाडी)- २०३ (नवीन क्रमांक २०५), मतदान-३३४ (नवीन क्रमांक -३४०)

### ७ नवीन मतदान केंद्रे

माळशिरस-१३७, १४२, मगरवाडी (गारवाड)-२०७, सुळेवाडी-२१०, अकलूज (दत्तनगर)- २७१, काळमवाडी-३१५, उघडेवाडी-३४५

### निर्दोष मतदार यादी तयार करण्याचा प्रयत्न

मतदान टक्केवारी वाढण्यासाठी निर्दोष मतदार यादी गरजेची असते. त्यादृष्टीने प्रशासन प्रयत्नशील आहे. यामध्ये ४६ लोकांची मयत नोंद होती, त्यांची नोंद करण्यात आली. २३४ नागरिकांचे वय १०० पेक्षा जास्त वाले होते. त्यामध्ये दुरुस्ती करण्यात आली. त्यामध्ये ६८ लोकांचे वय जास्त लागले होते तर ६६ मयत होते ते दुरुस्त केले.

### बीएलओंचा होणार सन्मान

मतदान प्रक्रिया रबविताना बीएलओंची भूमिका महत्त्वाची असते. तालुक्यातील तीन गावांत ५ टक्केपेक्षा कमी मतदान होते. तेथील मतदार बाहेर वास्तव्यास आहेत. त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत. दोन मेसेज व दोनवेळा फोन करुन त्यांना मतदानासाठी बोलवण्यात येणार आहेत. या मोहिमेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बीएलओंचा १५ ऑगस्ट व २६ जानेवारीला सन्मान करण्यात येणार आहे.

### दहा मॉडेल केंद्रांची उभारणी

चार महिला केंद्र-यशवंत नगर, माळीनगर, अकलूज, दत्तनगर (खंडाळी)

युथ केंद्र चार- भांब-२, जळभावी, सुळेवाडी

दिव्यांग केंद्र दोन-माळशिरस, बागेवाडी या मॉडेल केंद्रामध्ये इको फ्रेंडली सजावट केली जाणार आहे. तसेच वेगवेगळ्या थीम वापरल्या जाणार आहेत.

# क्रीडा

## महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा उद्या बालेवाडीत

**मुंबई दि. १८ ऑक्टोबर -**



महाराष्ट्र खो-खो असोसिएशनची २०२३-२४ ची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार २० ऑक्टोबर रोजी श्री. शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी पुणे येथे आयोजित केली आहे. ही वार्षिक सर्वसाधारण सभा महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे नाईक निंबाळकर यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी १२ वाजता होणार असल्याचे महाराष्ट्र खो-खो असोसिएशन सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव यांनी कळविले आहे. या सभेत खो-खोचा प्रचार-प्रसार व पुढील वाटचाल या बद्दल सुध्दा चर्चा होणार असल्याचे जाधव यांनी संगितले.

# वीट येथील छत्रपती शिवाजी विद्यालय दुहेरी मकुटाचा मानकरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**



वीट (ता.करमाळा येथील छत्रपती शिवाजी विद्यालयाने शालेय जिल्हा १४ वर्षांखालील मुले व मुलींच्या गटात विजेतेपद पटकावित दुहेरी मुकुट संपादिला.

जुळे सोलापूर येथील स्वामी विवेकानंद प्रशालेच्या मैदानावर झालेल्या अंतिम सामन्यात त्यांनी मुलांनी वेळापूरच्या लोकविकास शाळेवर ८ धावांनी मात केली. मुलींनी वाडीकुरोली (ता. पंढरपूर) येथील वसंतराव काळे प्रशालेचा १४-१३ असा एका गुणाने निसटती मात केली. मध्यंतराची ७-५ ही दोन गुणाची आघाडीच त्यांना विजय मिळवून दिली.

स्पर्धेचे उद्घाटन स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे यांनी केले. यावेळी तालुका क्रीडाधिकारी सत्येन जाधव, सोलापूर ॲम्युचर खो-खो असोसिएशनचे सचिव ए. बी. संगवे, सहसचिव मोहन रजपूत, राज्य पंच मंडळ सदस्य शरद व्हनकडे, पंच मंडळ सचिव गोकूळ कांबळे, तांत्रिक समिती सचिव उमाकांत गायकवाड, असोसिएशनचे सदस्य संतोष कदम, अजित शिंदे, पुंडलिक कलखांबकर आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन श्रीकृष्ण कोळी यांनी केले.



## जिल्हा शिकई मार्शल आर्ट स्पर्धेत श्री स्वामी नारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलचे वर्चस्व

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका येथे झालेल्या जिल्हा संघटनेच्या शिकाई मार्शल आर्ट स्पर्धेत श्री स्वामीनारायण गुरुकुल इंटरनॅशनल स्कूलने वर्चस्व मिळविले. स्कूलच्या १५ खेळाडूंनी विविध वयोगट व वजनी गटातून अजिंक्यपद पटकाविले. या कामगिरीवर त्यांची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली. त्यांना प्रशिक्षक मनोज बाळगे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे मुख्य आचार्य श्री विश्वमंगलदास स्वामीजी, ब्रह्मस्वरूपदास स्वामीजी व मुख्याध्यापक संतोषकुमार अन्नम यांनी अभिनंदन करून राज्य स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

### विजेते खेळाडू असे

अर्णव नन्ना, नरेंद्र धावड, वेदांत जाधव, पवन राज पाटील, कार्तिक मंजुळकर, अथर्व मडगुंडे, गजानन आडगळे, समर्थ बागेवाडी, श्लोक कासार, साईराज महिंद्रकर, उदय इंगळे, चिरायू हिरेमठ, साईराज जानकर, कृष्णा जानकर, समर्थ देशमुख.



## संगमेश्वर कॉलेज हँडबॉल स्पर्धेत विजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

शालेय शहर हँडबॉल स्पर्धेत संगमेश्वर कनिष्ठ महाविद्यालयाने १९ वर्षांखालील मुलांच्या गटात विजेतेपद पटकावले.

संघास शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिवा ज्योती काडादी, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्रचार्य प्रा. प्रसाद कुंटे यांनी अभिनंदन केले.

**विजयी संघ :** सुंदर कट्टीमनी, अभिषेक सिंग, ओम देवकांबळे, हर्षद माने, तेजस पवार, अजय जाधव, विजय जाधव, उमरान पेरमपल्ली, आर्यन सोनकांबळे, अनिकेत भोसले, ओम कोळी, सोहम लब्बा.

## इंडियन मॉडेल स्कूलच्या १२ खेळाडूंची विभागीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

इंडियन मॉडेल स्कूलच्या (सी.बी.एस.ई) खेळाडूंनी स्पर्धेत १२ खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी केल्यामुळे अहमदनगर येथे होणाऱ्या पुणे विभागीय रायफल शूटिंग स्पर्धेसाठी निवड झाली. मॉडेल रायफल शूटिंग अकॅडमी येथे या स्पर्धा पार पडल्या.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक सचिन ढवाण, राजकुमार माने, प्रशिक्षक अविनाश पुरी व अलिशा पुरी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, सुजाता बुट्टे, अचला राचर्ला, ममता बसवंती यांनी अभिनंदन केले.

**कामगिरी : पिस्तूल :** १४ वर्षाखालील मुले : : आर्यन आयवळे (सुवर्ण), अथर्व जाधव (रौप्य). १७ वर्षाखालील मुले : क्षितिज करमले (रौप्य), दिग्विजय मुसळे (कांस्य). मुली : अस्मिता शितोळे (सुवर्ण), समृद्धी वाघचौरे (रौप्य), सृष्टी कोणदे (कास्य). १९ वर्षाखालील मुली : स्वरांकित राठोड (रौप्य).

**पीप साईट एअर रायफल :** १७ वर्षाखालील मुली : अनन्या कांबळे (सुवर्ण), अवंतिका नारायणकर (रौप्य). १९ वर्षाखालील मुली : आस्या देवर्षी (रौप्य). १९ वर्षाखालील मुले : शौर्य रतकंठवार (सुवर्ण).

## वसुंधरा महाविद्यालयाची सादिया मुल्ला गोल्डन कपची मानकरी

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत वसुंधरा कला महाविद्यालयाच्या सादिया अब्दुल करीम मुल्ला हिने १०० मीटर धावण्याच्या शर्यतीत अव्वल स्थान पटकावित वेगवान धावपटूचा मान मिळविला. तिने २०० मीटर धावण्याची शर्यतही जिंकत दुहेरीचा मान मिळविला.

नेहरूनगर येथील श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत सादियाचा प्र. कुलगुरू लक्ष्मीकांत दामा यांच्या हस्ते गोल्डन कप देऊन सन्मान करण्यात आला. तसेच महाविद्यालयाने सर्वसाधारण उपविजेतेपदही संपादिले.

# मोहोळच्या नागनाथ विद्यालयास विजेतेपद

### पुणे विभागीय व्हॉलीबॉल स्पर्धा : राज्य स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि. १८ ऑक्टोबर-**



पुणे विभागीय शालेय व्हॉलिबॉल स्पर्धेत मोहोळ येथील नागनाथ विद्यालय व ज्युनिअर कॉलेजच्या १९ वर्षांखालील मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले. या कामगिरीवर संघाची राज्य स्पर्धेसाठी निवड झाली.

अंतिम सामन्यात नागनाथ विद्यालयाने पुणे शहरातील मिलेनियम नॅशनल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज या संघावर २-० अशी मात केली. या संघास क्रीडा शिक्षक आबाराव गावडे, समीर शेख, मोहोळ तालुका क्रीडा संयोजक प्रा.संभाजी चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले.

विजय संघाचे प्राचार्य बशीर बागवान, उपप्राचार्य प्रकाश शिंदे यांनी अभिनंदन करून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

मोहोळ येथील नागनाथ विद्यालयाच्या मैदानावर या स्पर्धा पार पडल्या. स्पर्धेचे उद्घाटन मोहोळचे पोलीस निरीक्षक सुरेशकुमार राऊत, मोहोळ तालुका क्रीडा अधिकारी सुप्रिया गाढवे यांच्या हस्ते व प्राचार्य बशीर बागवान यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

विजेता संघ : कार्तिकी गरगडे, वैष्णवी आदलिंगे, पूजा राऊत, भाग्यश्री शेंबडे, सह्याद्री आवारे, संचिता माळी, अंजली मळगे, मनस्वी अलदर, महेक शेख, श्रावणी खताळ, राजनंदिनी शिंगाडे.

## महत्त्वाचे

### अर्जुन एरिगायसी डब्ल्यूआर मास्टर्स बुद्धिबळ विजेता



**लंडन** : भारतीय ग्रॅण्डमास्टर अर्जुन एरिगायसीने येथे आयोजित डब्ल्यूआर बुद्धिबळ मास्टर्स स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. अंतिम फेरीत अर्जुनने कौशल्य व जलद निर्णय क्षमतेच्या बळावर फ्रान्सच्या मॅक्सिम व्हॅचियर-लॅग्रेव्हचा पराभव केला. दोन्ही क्लासिकल लढत अनिर्णित राहिल्यानंतर १६ खेळाडूंच्या मजबूत नॉकआऊट अंतिम सामना आर्मगेडॉनद्वारे घेण्यात आला. ही स्पर्धा आर्मगेडनच्या स्वरूपाचे अनुसरण करते. अर्जुनने मॅक्सिमला वेळेच्या बंधनात अडकवून बाजी मारली. मॅक्सिमच्या ७.४८ मिनिटांच्या तुलनेत सहा मिनिटांत चाल खेळली व त्यामुळे अर्जुनला जिंकण्यासाठी केवळ काळ्या सोंगट्यानिशी लढत बरोबरीत राखणे आवश्यक होते. अर्जुनने विजयाची संधी साधली. अर्जुनने विजेतेपदासह २७.८४ फिडे सर्किट पॉइंट्स व रोख बक्षीस खिशात घातले. मी नवीन फॉरमॅटशी चांगल्या जुळवून घेऊ शकलो आणि स्पर्धा जिंकू शकलो, याचा मला आनंद आहे, असे अर्जुन म्हणाला. अर्जुनच्या कामगिरीमुळे त्याला २७९६.१ चे थेट रेटिंग मिळाले आणि तो आता २० ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या युरोपियन चषक स्पर्धेत २८०० चा टप्पा ओलांडण्याचा प्रयत्न करेल. गत महिन्यात नऊ लढती जिंकून व दोन सामने बरोबरीत राखून भारताच्या पहिल्या ऑलिम्पियाड सुवर्णपदकात २१ वर्षीय अर्जुनने महत्त्वाची भूमिका बजावली होती.

### दक्षिण कोरियात महिलांच्या गोल्फ स्पर्धेत पावसाचा व्यत्यय

**पाजू** : येथे सुरू असलेल्या बीएमडब्ल्यू लेडिज गोल्फ अजिंक्यपद स्पर्धेत पावसाने व्यत्यय आणला. परिणामी स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीचा बराचसा भाग धुवून काढला आणि एकाही खेळाडूला आपली फेरी पूर्ण करता आली नाही. सेवॉन व्हॅली कंट्री क्लबमध्ये पहिल्या फेरीत ऑस्ट्रेलियाची हॅना ग्रीन, दक्षिण आफ्रिकेची ॲशले बुहाई आणि दक्षिण कोरियाची जेनी शिनने ८-अंडर ६४ गुणांसह आघाडी मिळविली आहे. ग्रीन क्लबने क्रमवारीत आघाडीचे स्थान मिळविले आहे. तिसरी फेरी सुरू होण्यापूर्वी शनिवारी दुसरी फेरी पूर्ण होईल. रविवारी या स्पर्धेचा समारोप होणार आहे, परंतु यादरम्यान पाऊस पडण्याचा अंदाज हवामान खात्याने वर्तविला नाही. या स्पर्धेत अव्वल १० खेळाडूंपैकी आठ व या हंगामातील १८ विजेत्यांपैकी १७ खेळाडूंचा समावेश आहे. मानेच्या दुखापतीमुळे अमेरिकेच्या नेली कोर्डाने माघार घेतली.

### मानव, साथियनला अव्वल मानांकन

**मडगाव** : मानव ठक्कर, जी. साथियान, अहिका मुखर्जी आणि सुतीर्थ मुखर्जी यांच्यासह भारतातील अव्वल टेबल टेनिसपटू मडगाव येथे सुरू होणाऱ्या हंगामातील दुसऱ्या यूटीटी राष्ट्रीय मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत सहभागी होणार आहेत. वरिष्ठ पुरुषांच्या गटात अस्ताना आशियाई स्पर्धेतील उत्कृष्ट कामगिरीमुळे मानव, साथियान(झड्झइ) व मानुष शाह (ठइख) यांना ताज्या अव्वल मानांकन दगेण्यात आले आहे. शरथ कमल आणि हरमीत देसाई या दोघांनीही या स्पर्धेतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. महिलांच्या विभागात महिला दुहेरीचे पदक जिंकून इतिहास रचणाऱ्या आणि आशियाई स्पर्धेत भारताला सांघिक प्रकारातील कांस्यपदक जिंकून देणाऱ्या अहिका व सुतीर्था आपल्या विजयाची परंपरा कायम राखण्याचा प्रयत्न करतील. अव्वल मानांकित श्रीजा अकुला व मनिका बत्रा या स्पर्धेत सहभागी होत नसल्यामुळे दिया चितळेला पुन्हा चमक दाखवण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या स्पर्धेत १९ वर्षांखालील, १७ वर्षांखालील, १५ वर्षांखालील आणि १३ वर्षांखालील गटांमध्येही स्पर्धा होणार आहेत.

### डॅनियल कॉलिन्सने निवृत्ती पुढे ढकलली

**फ्लोरिडा** : अमेरिकेची स्टार टेनिसपटू डॅनियल कॉलिन्सने आपल्या निवृत्तीची योजना पुढे ढकलली. मी पुढच्या वर्षी म्हणजे २०२५ मध्ये टेनिस स्पर्धा दौऱ्यावर परत येईल, असे तिने जाहीर केले आहे. या वर्षाच्या सुरूवातीस कॉलिन्सने सांगितले होते की २०२४ हा तिचा कारकिर्दीतील अखेरचा टेनिस दौरा असेल, परंतु आता २०२५ मध्ये दौऱ्यावर परतण्याचा निर्णय घेतला आहे. आयुष्यात कोणतीही हमी नसतानाही, मी माझ्या २०२४ चा वेग वाढवण्याची आशा करते व माझ्या वैयक्तिक जीवनात निश्चिंत होईपर्यंत खेळत राहीन, असे तिने एका पोस्टमध्ये म्हटले आहे. माझ्या सर्व चाहत्यांचे आणि माझ्या पाठीशी उभे असलेल्या लोकांचे आभारी आहेत, त्यांनी या काळात खूप प्रोत्साहन दिले आणि माझ्या जवळच्या मित्रांना देखील धन्यवाद देते, त्यांनी मला प्रत्येक टप्प्यावर साथ दिली, असेही तिने म्हटले आहे. ३० वर्षीय कॉलिन्ससाठी गत हंगाम खूप फलदायी ठरला आहे.

# भारत-न्यूझीलंड कसोटी रोमांचक स्थितीत

## रचिन रवींद्रचे शतक, रोहित, विराट, सर्फराजची अर्धशतके



फटकेबाजी करताना शतकवीर रचिन रवींद्र



कर्णधार रोहित शर्माचे अर्धशतक

◆ **बंगळुरू, १८ ऑक्टोबर**

येथे सुरू असलेल्या पहिल्या कसोटी क्रिकेट सामन्यात भारताला पहिल्या डावांत ४६ धावांत गुंडाळल्यानंतर रचिन रवींद्रच्या शतकाच्या बळावर न्यूझीलंडने तिसऱ्या दिवशी ४०२ धावांचा डोंगर उभारला. आता न्यूझीलंड संघ डावाने विजय मिळवण्याच्या विचारात आहे, परंतु भारतीय फलंदाजांनी दुसऱ्या डावात तडाखेबंद फलंदाजी करत पाहुण्या संघाचे मनसुबे उधळून लावण्यासाठी प्रयत्नशील आहे. भारताने दिवस अखेर दुसऱ्या डावात ३ बाद २३१ धावा काढल्या. भारत अजून १२५ धावांनी पिछाडीवर असून त्यांच्याकडे अजून ७ गडी शिल्लक आहेत.

न्यूझीलंडने ३ बाद १८० धावांवरुन पुढे खेळताना अधिक जोमाने फलंदाजी केली. कालचा नाबादवीर रचिन रवींद्रने एक बाजू सांभाळत आपल्या संघाच्या धावसंख्येला आकार दिला. यादरम्यान रचिन रवींद्रने डॅरिल मिचेल(१८), टॉम ब्लण्डेल (५), ग्लेन फिलिप्स (१४), मॅट हेनरीच्या (५) साथीने आपल्या संघाला दोनशे धावांचा उंबरठा ओलांडून दिला. पुढे रचिनने टीम साऊदीची उत्तम साथ मिळाली व या दोघांनी आठव्या गड्यासाठी १३७ धावांची भागीदारी केली, संघाला ३७० धावांवर पोहोचवले. साऊदीने ७३ चेंडूंत ५ चौकार व ४ षट्कारांच्या मदतीने ६५ धावा ठोकल्या. कुलदीप यादवने एजाज पटेलला (४) बाद केल्यानंतर रचिन रवींद्रची घोडदौड थांबविली. कुलदीपने आपल्या फिरकीवर बदली खेळाडू ज्युरेलच्या हातात झेल देण्यास भाग पाडले. तोपर्यंत न्यूझीलंडने ९१.३ षटकांत सर्वबाद ४०२ धावांचा टप्पा गाठला. रचिन रवींद्रने १५७ चेंडूत १३ चौकार आणि चार षट्कारांसह आपल्या १३४ धावा केल्या.

भारताकडून रवींद्र जडेजाने ७२ धावांत ३ बळी, कुलदीप यादवने ९९ धावांत ३ बळी, मोहम्मद सिराजने २ बळी घेतले. जसप्रीत बुमराह व आर. अश्विनने प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळवले.

भारताचा पहिला डाव अवघ्या ४६ धावांवर आटोपला होता, मात्र भारतीय फलंदाजांनी आपल्या दुसऱ्या डावास दमदारपणे सुरुवात केली. सलामीवीर यशस्वी जयस्वाल व कर्णधार रोहित शर्माने पहिल्या डावातील कसर भरून काढत ७२ धावांची सलामी भागीदारी केली. यशस्वीने ५२ चेंडूंत ६ चौकारांच्या मदतीने ३५ धावा केल्या. पुढे रोहितने विराट कोहलीसोबत दुसऱ्या गड्यासाठी २३ धावांची भर घालत आपले अर्धशतक साजरे केले. एजाज पटेलने त्रिफळा उडवण्यापूर्वी रोहितने ६३ चेंडूंत ८ चौकार व एका षट्काराच्या मदतीने ५२ धावांची अर्धशतकी खेळी केली. पुढे विराट कोहली व सर्फराज खान ही जोडी खेळपट्टीवर चांगलीच जमली. या दोघांनी तिसऱ्या गड्यासाठी १३६ धावांची भागीदारी करून संघाला अडीचशे धावांच्या जवळपास पोहोचवले. याचदरम्यान कोहली फिलिप्सच्या फिरकीला बळी पडला. कोहलीने १०२ चेंडूंत ६ चौकार व एका षट्कारांसह ७० धावांची खेळी केली. कोहली बाद होताच भारताने दिवस अखेर दुसऱ्या डावात ४९ षटकांत ३ बाद २३१ धावा काढल्या. सर्फराज खान ७० धावांवर नाबाद राहिला. न्यूझीलंडकडून एजाज पटेलने २ बळी, तर ग्लेन फिलिप्सने १ बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

# मेस्सी मार्का अमेरिका पुरस्काराने सन्मानित




◆ **फोर्ट लॉडरडेल, १८ ऑक्टोबर**

इंटर मियामी क्लबचा स्टार खेळाडू लियोनेल मेस्सीने आपल्या संग्रहात आणखी एक पुरस्काराची भर घातली. स्पेन-आधारित मीडिया कंपनीने सादर केलेल्या मार्का अमेरिका पुरस्काराचा ३७ वर्षीय मेस्सी पहिला मानकरी ठरला.

मेस्सीच्या कारकीर्दीतील हे क्लब किंवा देशासाठी जिंकलेले विक्रमी ४६ वा पुरस्कार असून त्याने वैयक्तिक पातळीवर किमान ५६ इतर पुरस्कार पटकावले आहे.

चेस स्टेडियमवर झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यात अर्जेंटिनाचा सुपरस्टार मेस्सी सत्काराला उत्तर देताना म्हणाला की, हा खूप छान प्रवास झाला आहे. आम्ही अनेक सुंदर व आनंदाच्या गोष्टी अनुभवल्या आहेत, काही दुःखद क्षणही अनुभवले आहेत. २० वर्षांत सर्वकाही सुंदर असणार नाही. आपण सर्व सामन्यात बाजी मारू असेही होत नाही.

मेस्सीसाठी अर्जेंटिनासह २०२२ च्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेच्या विजेतेपदापेक्षा कोणतेही विजेतेपद श्रेष्ठ नाही. या विजेतेपदामुळे त्याला महान खेळाडूंच्या यादीत स्थान मिळण्यास आणि आपला वारसा मजबूत करण्यास मदत झाली ◂(वृत्तसंस्था)

# सिंधू डेन्मार्क ओपनमधून बाहेर

## उपांत्यपूर्व फेरीत ग्रेगोरिया तुनजुंगकडून पराभूत

◆ **ओडेन्से, १८ ऑक्टोबर**

येथे सुरू असलेल्या बीडब्ल्यूएफ वर्ल्ड टूर ७५० डेन्मार्क ओपन बॅडमिंटन स्पर्धेत दोन वेळची ऑलिम्पिक पदक विजेती पी. व्ही. सिंधू हिचे आव्हान संपुष्टात आले. महिला एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत सिंधूला इंडोनेशियाच्या ग्रेगोरिया मारिस्का तुनजुंग हिच्याकडून पराभव पत्करावा लागला.




२०१५ मध्ये उपविजेते ठरलेल्या सिंधूला अंतिम आठच्या लढतीत ५७ मिनिटांत पॅरिस ऑलिम्पिकमधील कांस्यपदक विजेत्या पाचव्या मानांकित तुनजुंगकडून १३-२१, ९-२१ असा पराभव पत्करावा लागला.

जागतिक क्रमवारीत आठव्या क्रमांकावर असलेल्या तुनजुंगने मागील १२ सामन्यांमध्ये सिंधूला केवळ दोनदा पराभूत केले होते. सिंधूने चीनच्या हान यूवर १८-२१, २१-१२, २१-१६ असा संघर्षपूर्ण विजय मिळवत उपांत्यपूर्व फेरी गाठली होती. २९ वर्षीय सिंधूने पहिल्या फेरीत चीन तैपेईच्या पै यू पो हिच्यावर २१-८, १३-७ ने आघाडी घेतली असताना पै यू पो हिला स्पर्धेतून माघार घ्यावी लागली.

ऑलिम्पिकमध्ये अंतिम सोळाच्या सामन्यात चीनच्या हि बिंग जिओकडून पराभूत झाल्यानंतर सिंधूची ही दुसरी स्पर्धा होती. गत आठवड्यात ती फिनलंडमधील आर्क्टिक ओपनमधून पहिल्या फेरीतून बाहेर पडली. ◂(वृत्तसंस्था)

# शतकवीर यश राठोडने सावरला विदर्भाचा डाव

### रणजी करंडक क्रिकेट

◆ **पुद्दुचेरी, १८ ऑक्टोबर**

प्रतिष्ठेच्या रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेत येथे एलिट ब गटाच्या पुद्दुचेरीविरुद्धच्या आपल्या दुसऱ्या साखळी सामन्यात यश राठोडच्या दमदार शतकी खेळीच्या बळावर विदर्भाने पहिल्या दिवस अखेर पहिल्या डावात ८३ षटकांत ८ बाद २६१ धावा उभारल्या.

विदर्भाने आपल्या पहिल्या साखळी सामन्यात आंध्र प्रदेशवर ७४ धावांनी विजय मिळविला. पहिल्या विजयामुळे विदर्भ संघाचा आत्मविश्वा वाढला असेल व ते दुसऱ्या सामन्यात उत्तम कामगिरी करतील अशी अपेक्षा होती. कर्णधार अक्षय वाडकरने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, परंतु अथर्व ताडे (२), ध्रुव शोरी (६), अमन मोखाडे (१) व करुण नायर (१) हे विदर्भाचे पहिले चार फलंदाज स्वस्तातच बाद झाले.




त्यामुळे विदर्भाची ८ षटकांत ४ बाद १४ अशी अवस्था झाली, मात्र त्यानंतर यश राठोडने धैर्याने फलंदाजी करत विदर्भाचा डाव सावरला. यश राठोडने कर्णधार अक्षय वाडकर (३१) व अक्षय कर्णेवारच्या (१६) सहकार्याने विदर्भाला शंभर धावांचा टप्पा ओलांडून दिला. पुढे यश राठोडने हर्ष दुबेच्या साथीने आपले वैयक्तिक शतक साजरे केले व संघाला दोनशे धावांचा टप्पा पार करून दिला. फिरकी गोलंदाज फाबिद अहमदने यश राठोडची घोडदौड रोखली. यश राठोडने १९६ चेंडूंचा सामना करत ८ चौकारांच्या मदतीने ११८ धावांची शतकी खेळी केली. त्यानंतर हर्ष दुबेने सामन्याची सूत्रे आपल्या हाती घेत प्रफुल्ल हिंगे (६) व आदित्य ठाकरेच्या (नाबाद ५) मदतीने दिवसअखेरपर्यंत विदर्भाला ८३ षटकांत ८ बाद २६१ धावा उभारून दिल्या. हर्ष दुबेने १५० चेंडूंत ८ चौकारांसह नाबाद ६९ धावांची खेळी केली.

पुद्दुचेरीकडून गौरव यादवने ३ बळी, तर सागर उदेशी व फाबिद अहमदने प्रत्येकी २ बळी व अमन खानने एक बळी टिपला. ◂(वृत्तसंस्था)

# राफेल नदाल अल्काराझकडून हरला

## सिक्स किंग्ज स्लॅम प्रदर्शनी टेनिस



कार्लोस अल्काराझ व राफेल नदाल

◆ **रियाध, १८ ऑक्टोबर**

येथे आयोजित सिक्स किंग्ज स्लॅम प्रदर्शनी सामन्यात स्पेनच्या राफेल नदालला आपलाच देशबांधव कार्लोस अल्काराझकडून ३-६, ३-६ असा पराभवाचा सामना करावा लागला. यादरम्यान, इटलीच्या जेनिक सिनरने सर्बियाच्या नोवाक जोकोविचचा ६-२, ६-७ (०), ६-४ असा पराभव केला.

या स्पर्धेत एटीपी रँकिंग गुण नाहीत व सौदी अरबसाठी ही नवीनतम टेनिस स्पर्धा आहे.

सिक्स किंग्स स्लॅममध्ये कार्लोस अल्काराझकडून पराभूत होऊनही मी माझ्या कामगिरीवर खूश आहे, असे राफेल नदाल म्हणाला.

पुढील महिन्यात डेव्हिस चषक स्पर्धेत स्पेनकडून खेळल्यानंतर निवृत्त होणार असल्याचे गत आठवड्यात जाहीर केल्यानंतर अल्काराझ विरुद्धचा सामना नदालचा पहिला होता. पॅरिस ऑलिम्पिकमध्ये नदाल व अल्काराझ एकत्र दुहेरी खेळले व डेव्हिस चषकासाठी दोन्ही खेळाडू पुन्हा संघात दाखल झाले.

आता डेव्हिस चषकात खेळण्यासाठी एका महिन्याचा कालावधी शिल्लक आहे, त्यामुळे प्रत्येक दिवस चांगला असावा अशी अपेक्षा आहे. मी माझ्या टेनिस कारकिर्दीच्या या अंतिम स्पर्धेसाठी सज्ज आहे. संघाला काही प्रमाणात मदत करण्याचा माझा प्रयत्न असणार आहे, असे नदाल म्हणाला.

जुलैमध्ये पॅरिस ऑलिम्पिकमधून बाहेर पडल्यानंतर नदालसाठी सामना हा पहिलाच सामना होता.

अल्काराझसारख्या खेळाडूविरुद्ध खेळणे पुरेसे नसले तरीही ही चांगली कामगिरी होती. पण माझ्यासाठी हा सकारात्मक सामना होता व मी आनंदी आहे, असे नदाल म्हणाला.

नदाल शनिवारी तिसऱ्या स्थानाच्या लढतीत जोकोविचशी खेळेल, तर सिनरचा अंतिम सामना अल्काराझशी होणार आहे.

रविवारी शांघाय मास्टर्स विजेतेपदासाठी इटलीचा सिनर व कार्लोस अल्काराझ यांच्यात अंतिम सामना खेळला जाणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

### कोहली ९ हजार कसोटी धावा करणारा चौथा भारतीय

**बंगळुरू** : भारताचा फलंदाज विराट कोहलीने एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सुरू असलेल्या न्यूझीलंडविरुद्धच्या पहिल्या कसोटी सामन्यात ९,००० कसोटी धावा पूर्ण केल्या. भारताच्या दुसऱ्या डावात त्याने हा टप्पा गाठला. सचिन तेंडुलकर (१५,९२१), राहुल द्रविड (१३,२६५) आणि सुनील गावस्कर (१०,१२२) यांच्यानंतर कोहली हा पराक्रम करणारा चौथा भारतीय फलंदाज ठरला. त्यापैकी, डावांच्या (१९७) संदर्भात मैलाचा दगड गाठणारा कोहली सर्वात कमी आहे. २०२४ मध्ये कसोटी अर्धशतक न ठोकलेल्या ३५ वर्षीय फलंदाजाने आपले ३१ वे कसोटी अर्धशतक ठोकले. पहिल्या डावात ४०२ धावा केल्यानंतर न्यूझीलंडने भारतावर दबाव आणला होता. सक्रिय खेळाडूंमध्ये कोहली हा इंग्लंडच्या जो रूट (१२,७१६ धावा) नंतर कसोटी धावा करणारा दुसरा खेळाडू आहे. एकूण यादीत तो १८ व्या स्थानावर आहे.

# पाकिस्तानचा इंग्लंडवर १५२ धावांनी विजय

### मालिका १-१ ने बरोबरीत

◆ **मुल्तान, १८ ऑक्टोबर**

फिरकी गोलंदाज साजीद खान व डावखुरा फिरकी गोलंदाज नोमान अली पाकिस्तानच्या विजयाचे शिल्पकार ठरले. या दोघांच्या अचूक माऱ्याच्या बळावर पाकिस्तानने इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्यात चौथ्या दिवशी १५२ धावांनी दणदणीत विजय नोंदविला. या विजयाबरोबर पाकिस्तानने तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेत १-१ अशी बरोबरी मिळविली आहे.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करणाऱ्या पाकिस्तानने पहिल्या डावात सर्वबाद ३६६ धावा उभारल्या होत्या. यात कामरान गुलामने ११८ धावांची शतकी खेळी, तर सईम अयुबने ७७ धावांची अर्धशतकी खेळी केली होती. प्रत्युत्तरात इंग्लंडला ६७.२ षटकांत सर्वबाद २९१ धावांपर्यंत मजल मारता आली. पहिल्या डावात ७५ धावांची आघाडी मिळविणाऱ्या पाकिस्तानने दुसऱ्या डावात ५९.२ षटकांत सर्वबाद २२१ धावा उभारल्या आणि इंग्लंडसमोर विजयासाठी २९७ धावा काढण्याचे लक्ष्य ठेवले होते. इंग्लंडने २ बाद ३६ धावांवरून पुढे आपल्या चौथ्या दिवसाच्या खेळास सुरुवात केली, परंतु उपहारापूर्वीच इंग्लंडचा दुसरा डाव ३३.३ षटकांत सर्वबाद १४४ धावांतच आटोपला. पुनरागमन करणारा कर्णधार बेन स्टोक्सने तेवढ्या सर्वाधिक ३७ धावा काढल्या.




साजीद खान व नोमान अली

इंग्लंडचा पहिला डाव गुंडाळताना साजीद खानने १११ धावांत ७ बळी, तर नोमान अलीने १०१ धावांत ३ बळी टिपले, तर दुसरा डाव गुंडाळताना साजीदने ९८ धावांत २ बळी, तर नोमान अलीने अवघ्या ४६ धावांत तब्बल ८ बळी टिपण्याची किमया केली. एकूण ९ बळी टिपणारा साजीद खान सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

मुल्तान येथे झालेल्या पहिल्या कसोटी सामन्यात इंग्लंडने पाकिस्तानवर एक डाव व ४७ धावांनी विजय नोंदवला होता. पाकिस्तानने दुसरा कसोटी सामना १५२ धावांनी जिंकून मालिकेत बरोबरी मिळविली. आता २४ ऑक्टोबरपासून रावळपिंडी येथे तिसरा व अंतिम कसोटी सामना खेळला जाणार आहे. ◂(वृत्तसंस्था)

# भारताची सलामी लढत जपानशी

## १२ वी सुल्तान ऑफ जोहोर चषक हॉकी ● पी. आर. श्रीजेशची प्रशिक्षक म्हणून मोठी परीक्षा

◆ **जोहोर, १८ ऑक्टोबर**

येथे शनिवारपासून १२ व्या सुल्तान जोहोर चषक हॉकी स्पर्धेला प्रारंभ होणार असून भारत आणि जपान यांच्यादरम्यान सलामीचा सामना खेळला जाणार आहे. भारतीय कनिष्ठ हॉकी संघाने या स्पर्धेचे चौथ्यांदा विजेतेपद पटकावण्याचे लक्ष्य ठेवले आहे. दोन वेळा ऑलिम्पिक पदकविजेता दिग्गज हॉकीपटू पी. आर. श्रीजेशला भारताच्या २१ वर्षांखालील कनिष्ठ पुरुष हॉकी संघाचा प्रशिक्षक म्हणून पहिल्या मोठ्या परीक्षेला सामोरे जावे लागणार आहे.

या वर्षाच्या सुरुवातीला पॅरिस ऑलिम्पिकमध्ये कांस्यपदक जिंकण्याच्या मोहिमेनंतर निवृत्त झालेल्या ३६ वर्षीय माजी गोलरक्षकाने लगेचच कनिष्ठ संघाच्या प्रशिक्षणाची जबाबदारी आपल्या हाती घेतली.

भारताने गत वर्षी मे महिन्यात कनिष्ठ आशिया चषक स्पर्धेत आपल्या शेवटच्या सामन्यात जपानवर ३-१ असा विजय मिळवला होता व २०२२ च्या सुलतान ऑफ जोहोर चषकात भारताने ५-१ ने त्यांचा पराभव केला होता.



नवीन मुख्य प्रशिक्षक पीआर श्रीजेशच्या नेतृत्वाखाली संघ चांगला सराव करत आहे आणि आम्ही त्याच्यासोबत आमचा पहिला सामना खेळण्यास उत्सुक आहोत, असे कर्णधार अमीर अली म्हणाला.

गत वेळी जर्मनीकडून पराभूत झाल्यानंतर, आम्ही आमचे विजेतेपद कायम राखू शकलो नाही, परंतु यावेळी आम्ही चांगली कामगिरी करण्यासाठी सज्ज आहोत व स्पर्धेतील कोणत्याही संघाशी सामना करण्यास तयार आहोत, असे तो म्हणाला.

यापूर्वी २०१३, २०१४ आणि २०२२ मध्ये विजेतेपद पटकावणाऱ्या भारताचा रविवारी ब्रिटनशी सामना होणार आहे. या स्पर्धेत चार वेळा दुसरे स्थान पटकावणारा इंग्लंडचा संघ सुद्धा आहे. एक दिवसाच्या सुट्टीनंतर भारतीय संघ २२ ऑक्टोबरला यजमान मलेशियाशी व त्यानंतर २३ ऑक्टोबरला ऑस्ट्रेलियाशी सामना करतील.२५ ऑक्टोबर रोजी न्यूझीलंड विरुद्ध गट साखळी फेरीचा समारोप होईल, २६ ऑक्टोबर रोजी अंतिम फेरीत स्थान मिळविण्यासाठी भारताचे पहिल्या दोनमध्ये क्रमांकात स्थान मिळवण्याचे लक्ष्य आहे.

आम्ही गत काही दिवसांपासून सुल्तान ऑफ जोहर चषकापूर्वी सर्वोत्तम स्थितीत राहण्यासाठी सराव करत आहोत. यावेळी संघातील अनेक नवीन खेळाडू मैदानावर आपली क्षमता दाखवण्यास उत्सुक आहेत. सर्व खेळाडू व्यस्त वेळेच्या तयारीत सुधारणा करण्यासाठी एकमेकांना प्रोत्साहन देत आहेत, असे उपकर्णधार रोहित म्हणाला.

**सुल्तान ऑफ जोहर चषकासाठी भारतीय कनिष्ठ हॉकी संघ :**

**गोलरक्षक:** बिक्रमजीत सिंग, अली खान, बचावपटू: अमीर अली (कर्णधार), तालीम प्रियोबर्त, शारदानंद तिवारी, सुखविंदर, अनमोल एक्का, रोहित (उपकर्णधार), मध्य फळी : : अंकित पाल, मनमीत सिंग, रोसन कुजूर, मुकेश टोप्पो, चंदन यादव, आक्रमक फळी : गुरज्योत सिंग, सौरभ आनंद कुशवाह, दिलराज सिंग, अर्शदीप सिंग, मोहम्मद. कोनैन बाबा. ◂(वृत्तसंस्था)



## संक्षिप्त वृत्त




### 'ऑर्किड'मध्ये जागतिक तज्ञांचे व्याख्यान

**सोलापूर,दि. १८ ऑक्टोबर-**
स्वयं टॉक फाऊंडेशन आणि नागेश करजगी ऑर्किड अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक कीर्तीच्या तज्ञांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानासाठी ध्रुव पाकणीकर, ज्यांचे कॉर्पोरेट ऑफिसस, अमेरिका, युरोप आणि गल्फमध्ये आहेत. ते स्वत: डॉमिनिक्स ग्रुपचे चेअरमन आहेत. श्री. ध्रुवांनी त्यांच्या व्याख्यानात विद्यार्थ्यांना डिझाईन थिंकींग या विषयावर सविस्तर माहिती दिली आणि त्यांच्या निदर्शनास ॲपल या कंपनीची प्रगती डिझाईन थिंकींगमुळे कशी जागतिक पातळीची झाली हे पटवून दिले. याच सत्रातील दुसरे वक्ते नितीन घोरपडे यांनी त्यांचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर ठेवला. जीवनात बरेच चढ-उतार येतात. त्यांना सामोरे जाताना जिद्द कायम मनात पेटती ठेवण्याचे महत्व अधोरेखीत केले. व्यसनाधिनतेतून जागतिक कीर्तीच्या 'आर्यन मॅन' या स्पर्धेत त्यांनी बाजी मारल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांना सकाळी लवकर उठून तयार होऊन मैदानावर धावण्यासाठी जाण्याचे त्यांनी आवाहन केले. कार्यक्रमाच्या सुरूवातीला स्वंय टॉक फाऊंडेशनचे मुख्य प्रवर्तक नवीन काळे यांनी त्यांच्यामार्फत राबविण्यात येत असलेल्या कार्यक्रमाची माहिती दिली. समाजातील प्रेरणादायी माणसे आणि तरुण विद्यार्थी यांच्यात एक पूल बनवण्याचे काम स्वयं सेतू या उपक्रमातून करण्याचा त्यांचा प्रयत्न असल्याचे नमूद केले. यावेळी प्राचार्य डॉ. बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ. व्ही. के. पत्की, उपप्राचार्य डॉ. श्रीनिवास एस. मेतन यांची उपस्थिती लाभली. डॉ. एन. आर. पाटील यांनी आभार मानले.

### वृध्दाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर,दि. १८ ऑक्टोबर-**
शहरातील विजापूर रोडवरील वैष्णवी नगरात राहणाऱ्या वृध्दाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली. शांतीनाथ श्रीरंग मोहरे (वय ९०, रा. प्लॉट नं. ५८७७, वैष्णवी नगर, विजापूर रोड, सोलापूर) असे आत्महत्या केलेल्यांचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी शांतीनाथ मोहरे यांनी त्यांच्या राहत्या घरातील बेडरूममधील सिलिंग फॅनला साडीच्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यांचा नातू पंकज महावीर मोहरे व इतरांनी शांतीनाथ यांना खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी डॉ. तुषार मेडे यांनी शांतीनाथ मोहरे यांना मृत घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

### दुसरे शंख प्रक्षालन शिबीर आजपासून

**सोलापूर,दि. १८ ऑक्टोबर-**
भारतीय योग संस्थान सोलापूर शाखेमार्फत १९ व २० आक्टोबरला काडादी मंगल कार्यालयात दुसऱ्या शंख प्रक्षालन शिबीराचे आयोजन केले आहे. या शिबीरासाठी मार्गदर्शक म्हणून औरंगाबाद विभागातील डॉ. उत्तम काळवणे, संजय औरंगाबादकर, भगवानसिंह चव्हाण, माधूरी चव्हाण हे पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत. शनिवार (दि. १९) शिबीराचे ऊदघाटन होवून,रविवारी २० तारखेला शिबीर समाप्ती होणार आहे १०० योग साधकांकडून या शिबिरात सहभाग नोंदविला आहे. शिबिराची पूर्ण तयारी झाली असल्याचे जिल्हा प्रधान डी. पी. चिवडशेट्टी, शेखर लक्ष्मेशवर, जिल्हा मंत्री बी, एन पाटील शिबीरप्रमुख डी. कुलकर्णी व शिबीर उपप्रमुख रितू कटकधोंड, राजेशवरी कोंगारी, तेजल बत्तूल, विशाखा रेठरे, लक्ष्मी दोरनाल आदी पदाधिकारी यांनी कळविले आहे.

# पक्षश्रेष्ठी देतील तो उमेदवार आम्हाला मान्य

**● एकत्रितपणे काम करण्याची महायुतीच्या नेत्यांची पत्रकार परिषदेत ग्वाही; विकासाच्या कामावर मते मागणार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आम्ही आम च्या पध्दतीने शहर-जिल्ह्यासाठी उमेदवारांची मागणी केली असली तरी आमचे मुंबईतील पक्षश्रेष्ठीकडून ज्यांना उमेदवारी मिळेल; त्यांचे काम निष्ठेने करु अशी ग्वाही महायुतीमधील नेत्यांनी दिली.



राज्यातील महायुतीमधील भाजप, अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस, एकनाथ शिंदे गट शिवसेना आणि रयत क्रांती संघटना या पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी शुक्रवार, दि. १८ रोजी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली. काम हीच महायुतीची ओळख असल्याचे सांगत पक्षाने तयार केलेले रिपोर्ट कार्ड यावेळी सादर केले. यात सर्वाधिक मार्केटिंग हे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे करण्यात आल्याचे पाहायला मिळाले. यावेळी शिवसेनेचे प्रदेश सचिव संजय मशिलकर, भाजप अध्यक्ष नरेंद्र काळे, शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष संतोष पवार, शिवसेना शहर प्रमुख मनोज शेजवाळ, भाजप नेते मनिष देशमुख, राष्ट्रवादी कार्याध्यक्ष जुबेर बागवान, अनंत जाधव, वैभव गंगणे, प्रमोद भोसले यांच्यासह पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोलापूर जिल्ह्यातील अनेक नेते, कार्यकर्ते पक्ष सोडत आहेत याचा आगामी निवडणुकीत पक्षाला फटका बसेल का? असे प्रश्न विचारले असता कार्यकर्ते पक्ष सोडून जाणे दुःखद आहे, नेते गेले पण जनता महायुती सोबत आहे; त्यामुळे फरक पडणार नाही, असा खुलासा भाजपा शहराध्यक्ष नरेंद्र काळे यांनी केला. तर यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, शिवसेना जिल्हाध्यक्ष अमोल शिंदे यांनी आगामी विधानसभा निवडणुका एकत्रित लढणार असून, पक्षश्रेष्ठी जो उमेदवार देतील त्यांचे काम एका दिलाने करणार असल्याचे सांगितले. तर शिवसेना प्रदेश सचिव यांनी महायुती सरकारने राज्यभरात केलेल्या कामाचा पाढा वाचला.

राज्यभरात महायुतीच्या सरकारने अडीच वर्षात महिला, मुली, शेतकरी, कामगार, ग्रामीण विकासावर मोठ्या प्रमाणात काम केले आहे. याचे रिपोर्ट कार्डही यावेळी सादर केले. आम्ही केलेल्या या कामांमुळे युवावर्ग मोठ्या प्रमाणावर आकर्षित झाल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

**सरकार योजना राबविते तर विरोधकांचा बंद करण्याचा प्रयत्न**

शिवसेनेचे प्रदेश सचिव संजय मशिलकर बोलताना म्हणाले की, आम्ही राज्यातील महिलांसाठी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना राज्यभर राबविली. इतकेच नाहीतर शेतकरी, कामगार व इतर घटकांसाठीही अनेक योजना शासनाकडून राबविण्यात येत आहेत. तर या योजनांमुळे महायुतीचे वजन वाढत असल्याने विरोधक या योजना बंद कशा पडतील यासाठी प्रयत्न करतात. यामुळे आगामी विधानसभा निवडणूक आम्ही केलेल्या कामावरच लढणार आहोत.

## कांद्याने केला शेतकऱ्यांचा वांदा

**● दर घसरल्याने काढणीला आलेल्या कांद्याची बळीराजाला सतावतेय चिंता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १८ ऑक्टोबर-**
सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये गेल्या आठ दिवसांपासून कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक होत आहे. राज्यामध्ये सोलापूर बाजार समि ती कांद्याच्या खरेदी विक्रीसाठी दुसऱ्या क्रमांकावर आहे. मध्यंतरी कांद्याच्या दरामध्ये विक्रमीस्तर गाठणारी बाजार समिती म्हणून सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीची ओळख निर्माण झाली होती. दरम्यान कांद्याची आवक वाढल्याने सध्या बाजारात कांद्याचे दर घसरणीला आले आहेत. काही दिवांपूर्वीच ग्राहकांना कांद्याने रडवले होते, आज मात्र कांद्याने शेतकऱ्यांचा वांदा केला आहे.



दरम्यान सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये कांद्याची आवक दिवसेंदिवस वाढत असल्याने कांद्याचे दर हे मागील काही दिवसांपासून घसरत आहेत. मागील आठवड्यात प्रतिदिन सरासरी १५० ट्रक कांद्याची आवक होत होती. यावेळी सरासरी दर प्रति किलो ३५ ते ४० रुपयांपर्यंत पोहोचले होते. त्यावेळी कांद्याची प्रतही चांगली होती. सध्या दररोज सरासरी ३०० ट्रक कांद्याची आवक होत आहे. आंध्र प्रदेश तेलंगणा व कर्नाटक राज्यातून पावसात भिजून खराब झालेल्या कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक होत असल्याने सरासरी दर प्रति किलो २० रुपयापर्यंत घसरले आहेत. तर उंचाकी दर हा ५५ रुपये किलो पर्यंत आहे. परंतु त्याचे प्रमाण अत्यल्प दिसून येत आहे.

**● दीड लाख क्विंटल कांद्याची आवक**

गेल्या आठवड्यात कांद्याची बाजारपेठेत विक्रमी आवक होती. परतीच्या पावसाचा जोर वाढल्याने शेतकऱ्यांनी तात्काळ कांदा काढून बाजारपेठेत विक्रीसाठी आणला होता त्यामुळे कांद्याच्या काढणीला वेग आला होता. आवक दिवसेंदिवस वाढत गेल्याने त्याचा परिणाम दरावर झाला. खराब प्रतीचा कांदा बाजारपेठेत आल्याने कांद्याचे दर घसरले. त्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांसमोर मोठा प्रश्न निर्माण झाला आहे.

**● कांद्याचे दर घसरल्याने चिंता**

कांद्याची लागवड करण्यासाठी हजार रुपये खर्च केला आहे. सध्या एक एकर वर कांद्याची लागवड केली आहे. पुढील महिन्यात विक्रीसाठी कांदा बाजारात येईल. आत्ताच कांद्याचे दर पडत असल्याने शेतकऱ्यांपुढे चिंता वाढलेली आहे. भविष्यकाळात दरात आणखीन घसरण झाल्यास, मात्र लागवडीवरील खर्चही निघणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यासमोर मोठा प्रश्न उभा ठाकला आहे.

**- प्रभूलिंग कोरे, शेतकरी**



## रेल्वे स्टेशन, विजापूर रोड परिसरातील रस्त्यावरील अतिक्रमण काढले

**● रस्त्या लगत लावलेले राजकीय बॅनर हटविले**
**● चारचाकी हात गाड्या, भाजीपालासह इतर साहित्य केले जप्त**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. १८ ऑक्टोबर-**
महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज रेल्वे स्टेशन , विजापूर रोड परिसरातील फुटपाथ व रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात आले.

रस्त्या लगत लावलेले राजकीय बॅनरही हटविण्यात आले. यामध्ये चार चाकी हात गाड्या, भाजीपालासह इतर साहित्य जप्त केले. महापालिका आयुक्त शितल तेली -उगले यांच्या आदेशानुसार उपायुक्त तैमूर मुलाणी यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर शहरात रस्त्यावर तसेच फुटपाथवर रहदारीस अडथळा ठरणारे अतिक्रमण काढण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. दरम्यान, नियमितपणे कारवाई सुरू आहे. आज शहरात सकाळच्या सत्रात गजबजलेल्या छत्रपती संभाजी महाराज तलाव (कंबर ) ते सैफुल रस्ता आणि फुटपाथवरील अतिक्रमण काढण्यात आले. रस्त्या लगत असलेले राजकीय बॅनर हटविण्यात आले. यावेळी भाजीपाला, लोखंडी वजन काटे व इतर साहित्य जप्त करण्यात आले. दुपारच्या सत्रात रेल्वे स्टेशन लगत परिसरातील अतिक्रमण काढण्यात आले. या मोहिमेत चार हात गाड्या व रस्त्यालगत असलेले दोन बॅनर हटविण्यात आले. इतर सामानही जप्त करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात जेसीबीच्या सहाय्याने ही करवाई करण्यात आली. या मोहिमेत महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे , मुर्तुजा शहापुरे, सुफियान पठाण आदींसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी रस्त्यावर तसेच फुटपाथवर अतिक्रमण करू नये. अतिक्रमण आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करण्यात येईल, असा इशारा अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख हेमंतकुमार डोंगरे यांनी दिला आहे.

### रस्त्यावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करा

**सोलापूर,दि. १८ ऑक्टोबर-**
सोलापूर-अक्कलकोट रोड येथील संगमेश्वर नगर परिसरात असलेल्या उड्डापुलाच्या खाली त्या भागातील व्यवसायिक कचरा, घाण, शिळे अन्न टाकत असल्याने परिसरात मोठ्या प्रमाणात दुर्गंधी पसरली आहे. कॅरीबॅग, नासलेले अन्नासह प्लास्टिकच्या वस्तू अस्तव्यस्तपणे रस्त्याच्या कडेला टाकल्या आहेत. यावर मोकाट जनावरे, कुत्रे, डुंकर वावरत आहेत. यामुळे लहान बालके, वृद्धांना या घाणीचा आणि मोकाट जनावरांचा मोठ्या प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. घाण टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

## नोडल अधिकाऱ्यांनी निवडणुकीची जबाबदारी दक्ष राहून पार पाडावी : जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
विधानसभा सार्वत्रिक निवडणूकच्या अनुषंगाने जिल्हास्तरावर नियुक्त करण्यात आलेल्या सर्व संबंधित नोडल अधिकारी यांनी त्यांच्यावर सोपवण्यात आलेली जबाबदारी अत्यंत दक्ष राहून पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित सर्व नोडल अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीत ते मार्गदर्शन करत होते.



यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश निराळी, उपजिल्हाधिकारी संतोषकुमार देशमुख, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक सुधीर ठोंबरे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांच्यासह सर्व निवडणूक निर्णय अधिकारी, तहसीलदार तथा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सर्व संबंधित निवडणूक नोडल अधिकारी उपस्थित होते.

आशीर्वाद पुढे म्हणाले की, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विधानसभा निवडणूक २०२४ मध्ये अकरा मतदारसंघातील एकूण ३ हजार ७२३ मतदान केंद्रावर अत्यंत चांगल्या सोयीसुविधा मतदारांना उपलब्ध करून द्याव्यात. यासाठी नियुक्त केलेले नोडल अधिकारी यांनी ग्रामीण व शहरी भागात सर्व मतदान केंद्रावर सुविधा उपलब्ध करून घेण्याबाबतची कार्यवाही करावी. त्याप्रमाणे सर्व संबंधित अतिरिक्त निवडणूक निर्णय अधिकारी यांनी प्रिसायडिंग ऑफिसर च्या माध्यमातून प्रत्येक म तदान केंद्रावरील किमान दहा मतदारांना लोकसभा निवडणूक २०२४ मध्ये मतदान केंद्रावर देण्यात आलेल्या सोयी सुविधा बाबत प्रश्न विचारून माहिती घ्यावी.

## तिकीट आरक्षणाची १२० दिवसांची मुदत घटवली

**● रेल्वे आरक्षण आता ६० दिवसच आधी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
प्रवासाचे, सुट्ट्यांचे नियोजन चार महिने आधीपासून करण्याची सवय आता बदलावी लागणार आहे. पूर्वीची १२० दिवसांची मर्यादा रेल्वेने घटवली असून, यापुढे रेल्वे आरक्षण ६० दिवस आधीच करता येणार आहे.

भारतीय रेल्वेने तिकिटांच्या आरक्षणाच्या कालावधीची मर्यादा घटविल्याचे गुरुवारी जाहीर करण्यात आले. त्यानुसार एक नोव्हेंबर २०२४ नंतर रेल्वे तिकिटांचा आरक्षण कालावधी गाडी सुटण्याच्या १२० दिवसांवरून ६० दिवस आधी इतका कमी करण्यात आला आहे. विदेशी पर्यटकांसाठी ३६५ दिवसाच्या आरक्षण कालावधीम ध्ये कोणताही बदल होणार आहे. गावापासून, घरापासून दूर मोठ्या शहरामध्ये राहणाऱ्या लोकांना सणासुदीत किंवा आपत्कालीन कामासाठी गावाकडे परतण्यासाठी रेल्वे हा सर्वांत मोठा आधार असतो.

तिकिट आरक्षणासाठी रेल्वेने यापूर्वी १२० दिवसांची सुविधा दिली होती. ती आता ६० दिवसांवर आणण्यात आली आहे. आधीपासूनच कमी कालावधीचा नियम लागू असलेल्या एक्स्प्रेस रेल्वे गाड्यांवर नव्या बदलांचा परिणाम होणार नाही. यासोबतच रेल्वेच्या बदललेल्या नियमांचा कोणताही परिणाम ३१ ऑक्टोबर २०२४ पर्यंत आरक्षित केलेल्या तिकिटांवर होणार नाही.

**उद्देश काय...**
- रेल्वे प्रशासनाच्या दाव्यानुसार तिकिट आरक्षणासाठी कमी कालावधी दिल्याने प्रवाशांना तात्काळ प्रवासाचे नियोजन करणे सोपे होईल.
- गाडी रद्द झाल्यास समस्यांना तोंड द्यावे लागणार नाही.
- प्रवाशांच्या मागण्या ओळखून रेल्वेच्या आरक्षण यंत्रणेत बदल करून त्यानुसार तिकीट वितरणात सुधारणा केली जाईल.
- किती जागा रिक्त आहेत, याची माहिती देण्यासाठी कृत्रिम बुद्धि मत्तेवर आधारित (एआय) मॉडेल तयार केले आहे.





**अशीही समस्या...**
पसंतीची एक्स्प्रेस संपूर्ण आरक्षित झाल्यास तीन-चार महिने आधी विमान प्रवासाचा पर्यायही स्वीकारता येत होता. तीन-चार महिने आधी विमान तिकिटांचे दर अनेकदा कमी असल्याने पसंतीची रेल्वे न मिळाल्यास हवाई प्रवासाचे नियोजन केले जात होते. मात्र, आता तसे करता येणार नाही.




हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## संतोष नगरात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

शहरातील बाळे परिसरातील संतोष नगरात राहणाऱ्या तरूणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शुक्रवारी सकाळी उघडकीस आली.




बाळू रामचंद्र भिसे (वय २५, रा. संतोष नगर, बाळे) असे आत्महत्या केलेल्या तरूणाचे नाव आहे. शुक्रवारी सकाळी सहाच्या सुमारास बाळू भिसे याने राहत्या घरात स्कार्फ (ओढणी) च्या सहाय्याने गळफास घेतल्याचे दिसून आले. त्यामुळे त्यास फौजदार चावडी पोलिस ठाण्यातील हवालदार एस एच घुगे यांनी खाली उतरवून बेशुध्दावस्थेत शासकीय रुग्णालयात दाखल केले. त्यावेळी बाळू भिसे याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. तुषार मेडे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

दसरा, दिवाळी निमित्त 20% पर्यंत सूट
यल्लम्मा हॅण्डलूम
विविध कॉटन साड्या व ड्रेस मटेरियलचे एकमेव परिपूर्ण दालन
शाखा नं. १ : मार्कंडेय सहकारी रुग्णालय रोड, सोलापूर. मो. 9371289887
शाखा नं. २ : अंत्रोळीकर शॉपिंग सेंटर, दत्त चौक, सोलापूर. मो. 9372351860

# विद्यापीठाच्या सॉफ्टवेअरचा गुंता सुटता सुटेना

### कर्मचाऱ्यांची वाढली डोकेदुखी

### परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखा एका दिवसावर

### लॉगिनमध्ये परीक्षा अर्ज नाहीत

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर दि. १८ ऑक्टोबर-**

शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ पासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांनी 'एज्युकेशन लॅब' हे सॉफ्टवेअर घेतले. परंतु या सॉफ्टवेअरचा गुंता सुटता-सुटता महाविद्यालय व विद्यापीठ कर्मचारी यांची डोकेदुखी वाढली आहे. एम केसीलच्या सॉफ्टवेअर बंद केल्यानंतर एका जिल्ह्याच्या विद्यापीठात २०२१-२२ नंतर पाच सॉफ्टवेअर हाताळण्यात आली आहेत. परंतु एकही सॉफ्टवेअर विद्यापीठ व महाविद्यालयास सुट होत नसल्याचे समोर आले आहे.

ऑक्टोबर संपत झाला तरी काही विद्यार्थ्याचे महाविद्यालयात ऑफलाईन प्रवेश झालेले आहेत. अजूनही सॉफ्टवेअरमध्ये त्यांचा प्रवेश निश्चित होत नाही. विद्यार्थ्यांचा प्रवेश एका कॉलेजमध्ये व सॉफ्टवेअरमध्ये दुसऱ्या कॉलेजचे नाव येत आहे. विद्यार्थी सायन्सचा परंतु विषय त्याला बीकॉमचे असे अशी गुंतागुत या सॉफ्टवेअरमध्ये झाली आहे.

नुकतेच विद्यापीठाने परीक्षा अर्ज भरण्याचे परिपत्रक काढले आहे. त्यामध्ये परीक्षा अर्ज भरण्याची शेवटची तारीख १९ ऑक्टोबर आहे. परंतु अद्याप एकही परीक्षा फॉर्म विद्यापीठाकडून महाविद्यालयाच्या लॉगिनमध्ये आलेला नाही. विद्यापीठ प्रशासनाला या विषयाचे गांभीर्यच नाही. अशा निर्णयाचा त्रास महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचारी यांना होत आहे. नवीन सॉफ्टवेअर घेतले. परंतु महाविद्यालय व विद्यापीठ कर्मचारी यांचे प्रशिक्षणही झालेले नाही. कॉलेज कर्मचारी युनियनच्या वतीने हे सॉफ्टवेअर व्यवस्थित चालण्यासाठी संबंधित सॉफ्टवेअरला काम करणारे शिक्षकेतर कर्मचारी यांचे प्रशिक्षण शिबिर घ्यावे, असा विद्यापीठाशी पत्रव्यवहारही केलेला होता. विद्यापीठात अधिकारी निर्णय घेतात. परंतु घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी व्यवस्थित होते की नाही हे पाहिले जात नाही. विद्यापीठात सॉफ्टवेअरच्या तज्ञ व्यक्तीचा अभाव असल्याचे वारंवार दिसून येत आहे. सॉफ्टवेअर व्यवस्थित नसताना पात्रतेचे परिपत्रक काढतात व वेळेची मर्यादा देतात. परंतु त्या वेळेच्या मर्यादेनुसार अंमलबजावणी ही विद्यापीठाकडून होत नाही. विद्यापीठाच्या चुकीच्या परिपत्रकामुळे अनेक महाविद्यालयांना विद्यापीठाकडून दंडाची आकारणी केलेली आहे. सॉफ्टवेअर संदर्भात अडीअडचणी सोडविण्यासाठी मोबाईल नंबरही जनरेट करतात. परंतु मोबाईल उचलला जात नाही. क्वचित फोन उचलला तरी समाधानकारक उत्तर मिळत नाही व उडवाउडवीची उत्तरे दिले जातात. कर्मचाऱ्यांना अडीअडचणी सोडविण्यासाठी एक व्हाट्सअप ग्रुप ही विद्यापीठाचा आहे. त्यामध्ये कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रश्नासंदर्भात मांडलेले उत्तरही विद्यापीठ प्रशासनाकडून मिळत नाही व्हाट्सअपवर पाठविलेल्या अडचणी बघूनही उत्तरे दिली जात नाहीत.



### अडचणीचा विचार करण्यात येईल

परीक्षेचे वेळापत्रक हे अंतिम नाही. परीक्षा विभागाच्या प्राधिकरणाची बैठक २१ तारखेला आहे. त्या बैठकीत महाविद्यालयातील अडचणीचा विचार करून परीक्षेची तारीख निश्चित करण्यात येईल. तसेच परीक्षा अर्ज भरण्याच्या तारखाही पुढे ढकलण्यात येतील

**-डॉ. श्रीकांत अंधारे**
**संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ**

### विद्यापीठ परीक्षेच्या कामकाजावर बहिष्कार टाकणार

कॉलेज कर्मचारी युनियनने पत्र देऊनसुद्धा शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या अडचणीसंदर्भात बैठक घेतली जात नाही. जर हे असेच होत राहिले तर विद्यापीठ परीक्षेच्या कामकाजावर महाविद्यालयीन कर्मचारी बहिष्कार टाकल्याशिवाय राहणार नाहीत, असा इशारा कॉलेज कर्मचारी युनियनचे अध्यक्ष दत्ता भोसले यांनी दिला आहे.

### एमकेसीएल सॉफ्टवेअर का बंद; हे एक मोठे गौडबंगाल

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पूर्वी विद्यापीठात एमकेसीएल प्रणाली कार्यरत होती. यामध्ये येणाऱ्या अडचणी ताबडतोब सोडविल्या जात होत्या. हे सॉफ्टवेअर अचानक बंद का केले. हे आज देखील एक मोठे गौडबंगाल आहे. या सॉफ्टवेअरला शासनाने बंदी घातली आहे, असे विद्यापीठ प्रशासनाकडून सांगण्यात आले. परंतु हे सॉफ्टवेअर आजही यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात वापरले जात आहे.

## कुंटणखान्यावर पोलिसांचा छापा

### 3 पिडीतांची सुटका तर महिलेला अटक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर. दि. १८ ऑक्टोबर-**

हैदराबाद रोडवरील गंगाई केकडे नगरजवळील राघवेंद्र नगरातील एका घरात सुरु असलेल्या कुंटणखान्यावर अनैतिक मानवी प्रतिबंधक विभागाच्यावतीने छापा टाकून ३ पिडीतांची सुटका करण्यात आली. कुंटणखाना चालविणाऱ्या महिलेस अटक करून एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

विजया नागनाथ खांडेकर (वय ४०, रा. प्लॉट नं. ११४, राघवेंद्र नगर, गंगाई केकडे नगरजवळ, सोलापूर) असे अटक केलेल्या महिलेचे नाव असून तिला तीन दिवस पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत. पोलिस आयुक्तालयातील अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाच्या अधिकाऱ्यांना कुंटणखाना सुरु असल्याची माहिती मिळाली होती. त्यावरून पोलिसांनी त्या ठिकाणी १६ ऑक्टोबर रोजी बोगस गिऱ्हाईक पाठवून छापा टाकला असता विजया खांडेकर ही महिला पिडीत ३ महिलांची पिळवणूक करून त्यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडून त्यांच्याकडून वेश्या व्यवसाय करवून घेत असल्याचे दिसून आले. या कारवाईवेळी तीन पिडीत महिला मिळून आल्यास असून पोलिसांनी त्यांची सुटका केली.

ही कारवाई पोलिस आयुक्त एम राजकुमार, उपायुक्त डॉ. दिपाली काळे, सहायक आयुक्त राजन माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक महादेव राऊत, महिला पोलिस उपनिरीक्षक अश्विनी काळे, सहायक फौजदार राजेंद्र बंडगर, हेमंत मंठाळकर यांच्या टीमने केली.

## शेळगी ब्रिजवर वाहनाच्या धडकेने एक ठार

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -**

मार्केट यार्ड ते पुना नाका या रस्त्यावरील शेळगी ब्रिजवर अज्ञात वाहनाच्या धडकेने अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला. शुक्रवारी पहाटे चारच्या सुमारास शेळगी ब्रिजवर अज्ञात वाहनाने ३५ ते ४० वर्षाच्या पुरुषाला जोरदार धडक दिली. त्यामुळे तो अनोळखी व्यक्ती गंभीर जखमी झाल्याने त्यास जोडभावी पेठ पोलिस ठाण्यातील हवालदार दुधाळे यांनी उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे डॉ. अक्षय हेमडे यांनी घोषित केले. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...

### आचारसंहिता कालावधीत जिल्हा लोकशाही दिन नाही

**सोलापूर दि. १८ ऑक्टोबर-**

अतिरिक्त मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांचेकडील पत्र दि. १५ ऑक्टोबर २०२४ अन्वये विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ चा कार्यक्रम घोषित झाल्याने निवडणूक कार्यक्रमानुसार सोलापूर जिल्हयामध्ये विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येणार आहेत. निवडणुकांची आचार संहिता दि. १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत असल्याने शासनाचे सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक अन्वये आचार संहिता कालावधीत लोकशाही दिनाचे आयोजन करु नये असे नमूद केलेले आहे. त्यामुळे विधानसभा सार्वत्रिक निवडणूकची आचार संहिता असल्याने या कालावधीमध्ये सोलापूर जिल्हयात दरमहा पहिल्या सोमवारी होणारा जिल्हा लोकशाही दिन (माहे नोव्हेंबर २०२४) मध्ये आयोजित केला जाणार नाही, असे निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा कुंभार यांनी कळविले आहे.

### कुचन नगरातून ५० हजारांची दुचाकी चोरीस

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -**

शहरातील कुचन नगरातून चोरट्याने ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.याबाबत गोवर्धन प्रभाकर करमगोंडा (वय ३३, रा. कुचन नगर, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ ऑक्टोबर रोजी रोजी रात्री गोवर्धन करमगोंडा यांनी त्यांची एमच १३ डीजी २१०९ क्रमांकाची दुचाकी ही घराजवळ हॅन्डल लॉक करून पार्क केली होती. ती चोरट्याने चोरून नेल्याची नोंद जेलरोड पोलिसांकडे करण्यात आली आहे. हवालदार बाबर पुढील तपास करीत आहेत.

### पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर दि. १८ ऑक्टोबर-**

हिस्स्याचे घर विकून पैसे आणावेत म्हणून पत्नीचा छळ करणाऱ्या पतीसह चौघांविरुध्द सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शबनमबानू तौसिफ शेख (वय ३४, रा. शास्त्री नगर, सोलापूर) या विवाहितेच्या फिर्यादीवरुन पती तौसिफ युनूस शेख, सासू परवीन युनूस शेख, दीर जावेद शेख, सना जुबेर शेख (रा. नई जिंदगी, सोलापूर) यांच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १६ एप्रिल २००९ ते मार्च २०२३ या कालावधीत शबनमबानू या नई जिंदगी येथे सासरी नांदत होत्या. त्यावेळी पती व इतरांनी शबनमबानू यांनी आम्हांला लग्नात मानपान केला नाही, व्यवसायाकरीता माहेरून तुझ्या हिश्श्याचे घर विकून ५ लाख रूपये घेऊन येत म्हणून मारहाण करून शिवीगाळ केली व मानसित्रक त्रास दिला. म्हणून सदर बझार पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार इनामदार पुढील तपास करीत आहेत.

### दुचाकीच्या धडकेने दुचाकीवरील तरूणाचा मृत्यू

**सोलापूर दि. १८ ऑक्टोबर-**

अज्ञात दुचाकीस्वाराने दिलेल्या धडकेत दुचाकीवरील तरूणाचा मृत्यू झाला. योगिनाथ अचलेरे (वय २२, रा. सोरेगाव, ता. उत्तर सोलापूर) असे मरण पावलेल्या तरूणाचे नाव आहे. याबाबत शुभम निंगप्पा भिमदे (वय २१, रा. बसवेश्वर नगर, विजापूर रोड, सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सलगर वस्ती पोलिस ठाण्यात अज्ञात चालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी शुभम भिमदे हा बेलाटी गावातील बाळूमामा येथील सार्वजनिक रस्त्यावर दुचाकी क्र. एमएच २५ बीबी ०२८२ च्या अज्ञात चालकाने दुचाकी निष्काळजीपणे चालवून पाठीमागून भिमदे याच्या दुचाकीस जोरदार धडक दिली. यामध्ये योगीनाथ अचलेरे हा गंभीर जखमी होऊन मरण पावला. त्यामुळे याबाबत सलगर वस्ती पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार उपासे तपास करीत आहेत.

# आगामी विधानसभा निवडणुकीसाठी आज मतदार नोंदणीची शेवटची संधी

### मतदारांनी नाव नोंदविण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी केले आवाहन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

विधानसभा निवडणुकीत मतदार करण्यासाठी ज्यांनी आजतागायत आपले नाव मतदार यादीत नोंदवलेले नाही; त्यांना उद्या शनिवार, दि. १९ ऑक्टोबर २०२४ ची शेवटची संधी आहे. या दिवशी ऑफलाईन तसेच ऑनलाईन दोन्ही पद्धतीने मतदार आपले नाव मतदार यादीत नोंदवू शकतात. निरंतर मतदार नोंदणीचा कार्यक्रम अद्याप सुरु आहे. त्यामुळे ज्या पात्र नागरिकांची अद्यापपर्यंत मतदार नोंदणी झालेली नाही, अशा नागरिकांकडून उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे दाखल करण्याच्या अंतिम दिनांकाच्या १० दिवस अगोदरपर्यंत म्हणजेच दि. १९ ऑक्टोबर २०२४ पर्यंत प्राप्त झालेले अर्ज क्र. ६ मतदार यादीमध्ये नोंद घेण्यासाठी विचारात घेण्यात येतील. तरी या शेवटच्या संधीचा लाभ घेऊन सर्व पात्र नागरिकांनी मतदार यादीत आपले नाव समाविष्ट करत मतदानाचा आपला हक्क आर्वजून बजावावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी केले. विधानसभा सार्वत्रिक निवडणूकची अधिसूचना मंगळवार, दि. २२ ऑक्टोबर २०२४ रोजी जाहीर झाली आहे. दरम्यान, नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम मुदत मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर रोजी पर्यंत आहे.




नामनिर्देशन पत्रांची छाननी बुधवार, दि. ३० ऑक्टोबर रोजी करण्यात येईल. तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत सोमवार, दि. ४ नोव्हेंबर रोजी पर्यंत आहे. बुधवार, दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान घेण्यात येणार असून, शनिवार, दि. २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी करण्यात येईल. सोमवार दि. २५ नोव्हेंबर रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल.

### स्वत:च्या नाव नोंदणीची स्वत:च काळजी घ्यावी

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या मतदानादिवशी ज्या मतदारांची नावे मतदार यादीत आढळून आलेली नाहीत अथवा वगळलेली गेलेली असल्याने ज्या मतदारांना मतदान करता आले नाही, अशा मतदारांची आज शेवटच्या दिवशी पडताळणी करून आपले फॉर्म नंबर- ६ भरून घेऊन नावे नव्याने समाविष्ट करून घ्यावीत आणि आपला मतदानाचा पवित्र हक्क बजवावा.

**- कुमार आशीर्वाद, जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी, सोलापूर**

# नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी पाच व्यक्तींनाच प्रवेश

### तीन पेक्षा जास्त वाहने नसावीत

### जिल्हाधिकारी आशीर्वाद यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -**

उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे दालनात फक्त पाच व्यक्ती उपस्थित राहतील. या व्यतिरिक्त कोणालाही निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या दालनात प्रवेश दिला जाणार नाही आणि कार्यालयाच्या आवारात ३ पेक्षा अधिक वाहने सोडली जाणार नाहीत, असे निर्देश जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी काढले आहेत.

महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषित करण्यात आला आहे. १५ ऑक्टोबरपासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. जिल्ह्यातील विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी अवलंब करण्याची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या/मोटारसायकल/वाहने यांचा समावेश नसावा तसेच नामनिर्देशनपत्र दाखल करतेवेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक/सभा घेणे कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे / वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध घालण्यात आले आहेत. उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे १०० मीटर परिसरात तसेच दालनात पाच व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये देण्यात आलेल्या शक्तीचा वापर करुन त्यांनी हा आदेश निर्गमित केला आहे. हा आदेश १५ ऑक्टोबर ते २५ नोव्हेंबर २०२४ पर्यंत अंमलात राहणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी कळविले आहे.



# 'उद्योगवर्धिनी'चा दिवाळी फराळ पोहोचला ९ देशात

### २५० महिलांना मिळाला रोजगार

### उपक्रमाचे यंदाचे १६ वे वर्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

महिलांना रोजगार मिळवून देत त्यांना आर्थिक स्वावलंबी बनविणाऱ्या उद्योगवर्धिनी संस्थेच्या महिला भगिनींनी बनविलेला दिवाळी फराळ आजवर तब्बल ९ देशांमध्ये गेला आहे. वर्षभर विविध उपक्रमांच्या माध्यमातून सुमारे २५० महिलांना रोजगार मिळवून देणाऱ्या उद्योगवर्धिनीच्या दिवाळी फराळ बनविण्याच्या उपक्रमाचे यंदाचे १६ वे वर्ष आहे, अशी माहिती संस्थेच्या अध्यक्ष आणि सामाजिक कार्यकर्त्या चंद्रिका चौहान यांनी दिली.



यावाबत चौहान म्हणाल्या, समाजातील अनेक कुटुंबांमध्ये दिवाळी फराळ बनवण्याची असमर्थता आणि गरजू महिलांना रोजगाराची असलेली आवश्यकता यातून उद्योगवर्धिनीच्या दिवाळी फराळ बनवण्याच्या उपक्रमाचा उगम झाला. उद्योगवर्धिनीने आजवर सुमारे दीड लाख जणांपर्यंत दिवाळी फराळ दिला आहे.

मुरमुरे चिवडा, पोहे चिवडा, शेव, मसाला शेव, खारी बुंदी, शंकरपाळी, विविध प्रकारचे लाडू, चकली, अनारसे, करंजी असे १३ प्रकारचे फराळाचे पदार्थ तयार केले जातात. उद्योगवर्धिनीने बनविलेल्या दिवाळी फराळाला संपूर्ण महाराष्ट्रासह दिल्ली, उत्तराखंड, राजस्थान, गुजरात, झारखंड, कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश, पंजाब अशा राज्यांमध्ये मागणी आहे. शिवाय अमेरिका, कॅनडा, सिंगापूर, जपान, जर्मनी, नेदरलँड, ऑस्ट्रेलिया, दुबई, इस्त्राईल अशा देशांमध्ये राहणाऱ्या सोलापूरकरांकडून उद्योगवर्धिनीने बनविलेला दिवाळी फराळ मागविला जातो.

### गरजूंना देणार फराळ

दरवर्षी विविध सामाजिक संस्थांच्या माध्यमातून गरजूंना दिवाळी फराळ देण्याचा उपक्रम यंदाच्यावर्षीही राबविण्यात येणार आहे. दिवाळीनिमित्त यंदाच्यावर्षी सेवावर्धिनी पुणे तर्फे पुणे जिल्ह्यातील १००० वंचित कुटुंबांना दिवाळी किट देण्यात येणार आहे. यात चिवडा, चकली, करंजी, शंकरपाळी, लाडू, उटणे, सुगंधी तेल, सुगंधी साबण, पणत्या आणि साडी यांचा समावेश आहे. हे दिवाळी किट तयार करण्याची जबाबदारी उद्योगवर्धिनीला देण्यात आली आहे. हे कीट तयार करण्याचे काम उद्योगवर्धिनीच्या महिला सदस्या ज्ञान प्रबोधिनी शाळेमागे असलेल्या उद्योगवर्धीनी संस्थेच्या कार्यालयात युद्धपातळीवर करीत आहेत.

## विधानसभेसाठी मनोहर सपाटे यांनी केली शहर उत्तरची मागणी

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे संस्थापक शरद पवार यांच्याशी एकनिष्ठ राहिल्यानेच आपल्यावर अजितदादांकडून वारंवार अन्याय करण्यात आल्याची खंत व्यक्त करून माजी महापौर मनोहर सपाटे यांनी येत्या विधानसभा निवडणुकीत शहर उत्तर मधून उमेदवारी मिळावी म्हणून पक्षाकडे मागणी केली आहे.



पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाकडून विधानसभा निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आल्या. त्यात श्री. सपाटे यांनी मुलाखत देऊन आपण शहर उत्तरसाठी इच्छुक असल्याचे सांगितले. गेल्या ४५ वर्षांपासून आपण महापालिका व पक्षाच्या विविध पदांवर काम केले आहे. या पूर्वी आपण या मतदारसंघातून दोनदा विधानसभेची निवडणूक लढविली आहे. मात्र, पक्षाने आपल्याला एबी फॉर्म न दिल्याने त्यावेळी आपल्याला अपक्ष म्हणून लढावे लागले. काँग्रेस उमेदवाराचा पराभव करण्यासाठी आपल्याला त्यावेळी बळ देण्यात आले. आपण शरदनिष्ठ असल्यानेच त्यांच्याकडून हा अन्याय केला गेला. त्यामुळेच आपल्याला त्यावेळी मिळालेला एबी फॉर्म काढून ऐनवेळी महेश गादेकर यांना देण्यात आला, असा गौप्यस्फोटही सपाटे यांनी आपल्या या मुलाखतीत केला आहे. त्यामुळे येत्या विधानसभा निवडणुकीत त्यांना उमेदवारी देऊन मोठ्या पवारांकडून सपाटे यांच्यावरील हा अन्याय दूर करण्यात येणार का? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी - ९१९

**आम्हांवरी सत्ता व्हावी आणिकांची ।**
**थोरीव तुमची काय मग ?।।**
**आला सेना न्हावी पायाचे जवळी ।**
**आता टाळाटाळी नका करू ।।**

इतर प्राण्याच्या तुलनेत मनुष्य हा प्राणी भाग्यशाली मानला जातो. त्याचे कारण म्हणजे माणसाकडे बुध्दि, वाचा आहे. जर माणूस बुध्दिचा, वाचेचा सदुपयोग करू शकला तरच तो खऱ्या अर्थाने भाग्यशाली आहे. अन्यथा याच्या इतका अवघड जीव दुसरा कोणता असणार नाही. समाजातील वाईटात वाईट घटना ह्या माणसाशिवाय इतर कोणता प्राणी करत नाही. वाईट कृत्य तोच माणूस करतो जो त्याच्या मनाच्या आणि इंद्रियांच्या अधिन झालेला असतो. बुध्दिवादी माणसाने मनाला आणि त्याच्या इंद्रियांना ताब्यात ठेवायला पाहिजे.



पण दुर्देवाने नमुद करावे लागते की मोठ्या प्रमाणावर लोक मनाच्या आणि इंद्रियांच्या अधीन झालेले आहेत. आपल्यावर मनाने आणि इंद्रियांनी सत्ता गाजविणे ही खऱ्या अर्थाने आपली हार आहे. आपण भगवंताचे भक्त असूनही काम, क्रोध, अहंकार, लोभ, ईर्षा, द्वेष आदि मन आणि इंद्रियांच्या माध्यमातून आपल्यावर सत्ता गाजवतात. यात भगवंता तुला काय मोठेपण मिळणार आहे ?, आम्हांवरी सत्ता व्हावी आणिकांची । थोरीव तुमची काय मग ?।। असा प्रश्न सेनाजींनी भगवंताला केला आहे. या प्रश्नातच सेनाजींचा मन आणि इंद्रियावर विजय मिळवण्याचा विश्वास लपला आहे. आपणालाही असा प्रश्न स्वत:शी करता आला पाहीजे. असा प्रश्न करता येणे म्हणजे योग्य मार्गावर पाऊल टाकणे होय, असे आम्हास वाटते. संसारात अडकलेला जीव आणि संत, महात्मे यांच्यात फार मोठा फरक असतो. संसारात अडकलेल्या जीवाकडे ईर्षा, द्वेष, मत्सर, अहंकार, काम, क्रोध, मीपणा, स्वार्थ, लोभ आदिचे प्रचंड भांडार असते. तर संत महात्म्याकडे शांती, सुख, समाधान, नि:स्वार्थ प्रेम, समता, बंधुता, कर्तव्य आदिचे भांडार असते. या भांडाराच्या पायाजवळ जाण्यासाठी संसारात अडकलेल्या जीवाने त्याच्याकडे असलेले ईर्षा, द्वेष, मत्सर, आदिचे भांडार पूर्णत: रिकामे केले पाहिजे. आपल्याकडील भांडार रिक्त न करता संताकडील भांडार आपल्या भांडारात सामावून घेऊ म्हटले तर चालणार नाही. याची आपणाला जाणीव असल्याने आपण आपल्या भांडाराला पूर्णत: रिक्त केले आहे. त्यामुळे भगवंतानी आता कसलीच टाळाटाळ न करता त्यांचा कृपाशिर्वाद देऊन आपले पूर्णत: रिक्त झालेले भांडार आत्मज्ञानाने भरून द्यावे. आला सेना न्हावी पायाचे जवळी । आता टाळाटाळी नका करू ।।, असे सेनाजींना वाटते. चोखोबारायही असेच म्हणतात, चोखा म्हणे मज घ्यावें पदरांत । ठेवा माझें चित्त तुमचे पायीं ।।. सर्व संतांचा भाव पांडुरंग चरणी असून तो लडिवाळ असतो. असो, समता, बंधुता, नि:स्वार्थ प्रेम, कर्तव्य हे आत्मज्ञानाला पुष्टी देणारे विषय आहेत. या विषयाची आत्मज्ञानीला जेवढी गरज आहे, तेवढी गरज समाजालाही आहे. आपली व समाजाची ही गरज भागवण्यात आपण यशस्वी झालो तर आपल्यासारखे आपणच भाग्यशाली असू.

**जय जय राम कृष्ण हरी।**

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : शनिवार** | **दिनविशेष - चांगला दिवस** |
| **दि. १९ ऑक्टोबर २०२४** | **पंत महाराज बाळेकुंद्री** |
| **विक्रम संवत् २०८०,** | **....राहू काल....** |
| **शके - १९४६** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **मास - अश्विन** | **मंगळवार : दु. ३ ते ४.३०** |
| **कृ. द्वितीया (०९.४८)** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **ऋतु - वसंत** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **नक्षत्र - भरणी (१०.४६)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **योग - सिध्दी (१७.४१)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |
| **करण - वणिज (२०.१४)** | |

### राशीभविष्य

**मेष** : आपण फार कार्यरत व व्यस्त रहाल. व्यापार नौकरीमध्ये हितचिंतकांची मदत मिळेल. कोणतेही काम विचारपूर्वक करा. कुटुंबातील वातावरण आनंदी

**वृषभ** : आध्यात्मिक अंगीकरल्यामुळे मन शांत राहील. आर्थिक स्थिती सुधारल्यामुळे मनोधैर्य वाढेल. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल.

**मिथुन** : नवीन कामाच्या संधी मिळतील. बुद्धी किंवा तर्काने आपल्या कामात यश मिळेल. घरातील व्यक्तिंचे आपणास सहकार्य मिळेल. कायद्याच्या प्रकरणात बेजबाबदारपणा दाखवू

**कर्क** : व्यापारासाठी केलेला प्रवास फायदेशीर राहील. आर्थिक समस्या दूर होईल. शत्रू आपली प्रतिमा खराब करण्याचा प्रयत्न करतील.

**सिंह** :व्यापारात यश मिळेल. गृहपयोगी वस्तुंची खरेदी कराल. कुटुंबात, समाजात आपली प्रतिष्ठा वाढणार आहे. नवीन योजनेमुळे फायदा होईल.

**कन्या** : पराक्रमात वाढ होईल. शुभ कार्यासाठी पैसा खर्च होईल. नवीन संबंध फायदेशीर ठरतील. कौटुंबिक समस्येकडे विशेष लक्ष द्या.

**तुळ** : मनोबल वाढल्याने तणाव कमी होईल. मुलांकडून शुभ बातमी मिळेल. मोठा व प्रतिष्ठीत व्यक्तिंचा संप येईल. व्यापारीक निर्णय घेण्यास उशीर करू नका.

**वृश्चिक** : प्रेम संबंधाात यश मिळेल. राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. बऱ्याच दिवसापासून अडकलेले काम पूर्ण होईल.

**धनु** : कर्ज काढावे लागेल. मितभाषी बना. कुटुंबात किंवा कामाच्या ठिकाणी निष्कारण वाद होण्याची शक्यता आहे.

**मकर** : आज आपल्याला रागावर नियंत्रण ठेवावे लागेल. आज अचानक पैसा आल्यामुळे खर्चात वाढ होईल. व्यापार विस्तारासाठी प्रयत्न यशस्वी होतील.

**कुंभ** : आपल्या योजना असफल होतील. मान प्रतिष्ठेला देखील धक्का पोहचू शकतो. निष्कारण कोणत्याही गोष्टीवर वाद करू नका.

**मीन** : आत्मविश्वासामुळे कठीण काम देखील पार पडणार आहे. घरगुती समस्या आज दूर होतील. व्यवसायात विशेष फायदा होईल. बोलण्यावर नियंत्रण ठेवा. नवीन योजना आमलात आणण्याचा प्रयत्न कराल.

# ७७ हजार ५३० मिळकतदारांकडून महापालिका तिजोरीत ७८ कोटीचा कर भरणा

### सवलतीची मुदत संपल्यानंतर साडे सहा लाखावर कर जमा

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

गेल्या २० दिवसात महापालिका मिळकत कर भरणावर तत्पर आणि ऑनलाईन अशा सहा टक्के सूटची मुदत संपल्यानंतर महापालिकेकडे ६ कोटी ८४ लाखाचा मिळकत कर जमा झाला. आतापर्यंत महापालिकेकडे ७७ हजार ५३० मिळकतदारांनी कर जमा केला आहे. पण अद्यापही तब्बल १ लाख ५२ हजार ५०० वर मिळकतदारांनी आपला कर भरला नाही.

शहरात २ लाख ६० हजार मिळकती आहेत. यंदाच्या वर्षी मिळकत करांची बिले तयार होण्यास संगणकीय विभागाकडून उशीर झाल्याने प्रशासनाने सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील मिळकतकर भरण्यासाठी महापालिकेत आणि अन्य ठिकाणी ऑनलाइन बिले पाठवून कर जमा करून घेण्याची प्रक्रिया राबविली. मिळकतदारांना ऑनलाइन पद्धतीने कर भरण्याची सुविधा देखील उपलब्ध करून दिली होती. प्रथम ऑगस्ट अखेर तत्पर भरणावर ५ टक्के तर ऑनलाइनद्वारे भरणावर १ टक्का अशी सुट मिळकतदारांना दिली होती यामध्ये पुन्हा २६ सप्टेंबरपर्यंत मुदत वाढवून दिली होती. यानंतर महापालिकेत कडून तब्बल ९ हजार ५०० मिळकतदारांना दंडात सूट मिळविण्यासाठी दि. २८ सप्टेंबर रोजी आयोजित राष्ट्रीय लोक अदालतीची संधी उपलब्ध करून देण्यात आली होती. सबंधित मिळकत दारांनी आपला मिळकत कर भरावा, असे आवाहन महापालिका प्रशासनाने केले आहे.



### दीड लाखावर मिळकतदारांनी भरला नाही कर

महापालिकेकडे आजतागायत ६ हजार १५५ मिळकतदारांनी ६ कोटी ८४ लाखाचा कर जमा केला आहे. यासह आतापर्यंत ७७ हजार ५३० मिळकतदारांनी महापालिकेकडे ७८ कोटी ५३ लाखाचा कर जमा केला आहे. पण अद्यापही तब्बल १ लाख ५२ हजार ५०० वर मिळकतदारांनी आपला कर जमा केला नाही.

## आचार्य विद्यासागर या काळातील सर्वश्रेष्ठ संत : जैन मुनी सारस्वतसागर महाराज

**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**



संत शिरोमणी आचार्य विद्यासागर महाराज हे या काळातील सर्वश्रेष्ठ संत होते, असे प्रतिपादन जैन मुनी सारस्वसागर महाराज यांनी धर्म सभेला आपल्या प्रवचनाच्या माध्यमातून सांगितले. वसंतविहार येथे दोन दिवसांच्या आपल्या पावन सान्निध्यात ते प्रवचन देत होते. यावेळी मुनी सौम्यसागर महाराज, मुनी जयंतसागर महाराज यांचेही प्रवचन झाले. आचार्य विद्यासागर महाराज व आर्यिका ज्ञानमती माताजी यांच्या शरद पौर्णिमा या त्यांच्या अवतरण दिनानिमित्त आयोजित सभेत ते बोलत होते. आचार्य विद्यासागर महाराजांच्या त्याग, तपस्या, करुणा, दया व परोपकार या गुणांचा उल्लेख करून महाराजांनी संपूर्ण भारतात हजारो गो शाळा उघडण्यासाठी मार्गदर्शन केले.

तसेच स्वदेशी खादीचा वापर वाढून लोकांना रोजगार मिळावा यासाठी जागोजागी खादी उत्पादन केंद्रे सुरू केली. जैन मंदिरे, धर्म शाळा, निवासी गुरुकुले निर्माण कार्यासाठी समाजाला प्रबोधन केले. त्यांनी हिंदी भाषेत अनेक उत्तम साहित्य कृती निर्माण केल्या. त्यांच्या मूकमाटी या महाकाव्यावर अनेकांनी पी.एच. डी केली, असेही महाराजांनी उपदेशात सांगितले.



## एमबीबीएससाठी प्रवेश मिळाल्याबद्दल आर्यन निंबाळकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

आर्यन चंद्रशेखर निंबाळकर याने नीट परीक्षेमध्ये ७२० पैकी ६६५ टक्के मार्क घेत एमबीबीएस अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाल्याबद्दल त्यांचा कामगार संघटना संघर्ष समितीचे जनरल सेक्रेटरी चांगदेव सोनवणे व अग्निशामक दलाचे माजी अधीक्षक केदार आवटे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, पत्रकार विजय गायकवाड, मनपा चतुर्थश्रेणी पतसंस्थेचे माजी चेअरमन भालचंद्र साखरे, सिद्धेश्वर मुनाळे, केरबा माने, डॉ. हिराकांत जाधव, श्रावण भंडारे, रमेश जाधव,नितीन कांबळे, समाधान जाधव, प्रमोद सोनवणे आदी उपस्थित होते.

## पायाभुत सुविधा, विमानसेवा, बांधकाम व्यावसायिकाच्या अडचणी मांडल्या

### चेंबर ऑफ कॉमर्सचे राज्यपाल राधाकृष्णन यांना निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**



शहरातील आवश्यक पायाभुत सुविधा उपलब्ध करून द्या, कुंभारी तसेच होटगी रोडवरील नागरी विमान सेवा लवकर सुरु करा, बोरामणी कार्गो विमानतळ बाबतीत निर्णय घ्या, वर्ल्ड क्लास एक्जिबिशनची उभारणी करा, सोलापुरात उद्योग आणणे आणि बांधकाम व्यावसयिकांच्या समस्यबाबत सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चरच्या वतीने राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांना निवेदन देण्यात आले.

राज्यपाल सोलापूर दौऱ्यावर आल्यावर चेंबरच्या वतीने हे निवेदन देण्यात आले. व त्यांच्याशी विविध विषायवर चर्चा करण्यात आली. राज्यपालांनी सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विषयांवर शासकीय विश्रामगृहात साधक बाधक चर्चा करुन सर्व शासकीय, प्रशासकीय यंत्रणेला याबाबत आवश्यक ते प्रयत्न करण्याबाबत निर्देश दिले. बैठक संपल्यानंतर सोलापूर चेंबर ऑफ कॉमर्स व व्यापारी, उद्योजक संघटनांच्या वतीने राज्यपालांचा सोलापूर चादर, सोलापूर टॉवेल, सोलापूर नॅपकीन बुके व शाल, श्रीफळ देऊन सन्मान केला. यावेळी चेंबरचे अध्यक्ष राजू राठी, उपाध्यक्ष किशोर चंडक, सचिव धवल शहा, खजिनदार निलेश पटेल, संचालक शैलेश बच्चुवार, उद्योजक जयेश पटेल, यंत्रमाग धारक संघाचे अध्यक्ष पेंटप्पा गड्डम, उद्योजक अंबादास बिंगी, उद्योजिका डॉ. सुहासिनी शहा, उद्योजक दिपक पाटील, नितिन बिज्जरगी, उल्हास सोनी, अमित जैन, मोहन डांगरे, श्री सिध्देश्वर देवस्थान पंचकमिटीचे उपाध्यक्ष सिध्देश्वर बमणी, पंढरपूर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी देवस्थान समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, बार असोसिएशनचे पदाधिकारी ॲड. मिलींद थोबडे, ॲड.मनोज पामुल, ॲड.विजय शिंदे, चेअरमन डॉ. किरण सारडा, सचिव डॉ. मधुरा बुरटे, जलतरणपटू किर्ती भराडीया व चित्रकार श्रावणी अन्नलदास आदी उपस्थित होते.

## शेकडो तरुणींना मिळाले स्वसंरक्षणाचे धडे

### 'शिवस्मारक' चा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

जागर स्त्रीशक्तीचा या कार्यशाळेत शेकडो तरुणींनी स्वसंरक्षणाचे धडे गिरवले. श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक मंडळ (शिवस्मारक) तर्फे शिवस्मारक येथे ही कार्यशाळा उत्साहात झाली.

कार्यशाळेचे उद्घाटन उद्योगवर्धिनी संस्थेच्या अध्यक्षा चंद्रिका चौहान यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी व्यासपीठावर सोलापूर जनता सहकारी बँकेचे माजी अध्यक्ष व संचालक वरदराज बंग, शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर, सचिव गंगाधर गवसने, सनातन संस्थेचे जिल्हा समन्वयक हिरालाल तिवारी, राजन बुणगे, शिवस्मारकचे संचालक प्रसाद जिरांकलगीकर, संचालिका माधवी कुलकर्णी उपस्थित होत्या.




या कार्यशाळेत विविध शाळा आणि महाविद्यालयातील तरुणींना हिंदू जनजागृती समितीच्या कार्यकर्त्यांनी स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे धडे दिले. समाजात वाढणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर तरुणींनी सजग राहण्याबाबत प्रबोधन आणि प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या चंद्रिका चौहान म्हणाल्या, महिलांना अनेकदा छेडछाडीच्या प्रसंगांनाही सामोरे जावे लागते. दरवेळी कोणीतरी आपल्या मदतीला येईल अशी अपेक्षा न ठेवता मुलींनी रणरागिणी बनवून स्वसंरक्षण करणे काळाची गरज बनली आहे. तसेच अशावेळी पालकांना शिक्षकांना आणि पोलिसांना संबंधित समाजकंटकांबद्दल माहिती देणे आवश्यक आहे, असेही चंद्रिका चौहान यांनी सांगितले. या कार्यशाळेत अनेक शाळा आणि महाविद्यालयांतील विद्यार्थिनींनी सहभाग घेतला. या विद्यार्थिनींना रोहन कलशेट्टी, श्रद्धा सगर, धनंजय बोकडे यांनी प्रशिक्षण दिले. शिवस्मारकचे अध्यक्ष रंगनाथ बंकापूर यांनी प्रास्ताविक केले. श्रद्धा कुलकर्णी-पारखी यांनी सूत्रसंचालन तर संचालिका माधवी कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

## शिक्षकांनी तंत्रस्नेही व्हावे : डॉ. प्रधान

### सेवासदन शाळेत संगणक प्रशिक्षण कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

एकविसाव्या शतकात जगणाऱ्या प्रत्येकाला संगणक विषयक माहिती असणे गरजेचे आहे करण संगणक साक्षरता नसेल, तर पदवीधर सुशिक्षित देखील निरक्षर ठरेल. यासाठी सर्व शिक्षकांनी तंत्रस्नेही होऊन नवीन तंत्रज्ञान आत्मसात करावे. आज शिक्षकांनी नवीन तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर करून शिक्षण देणे गरजेचे आहे, असे मत सेवासदन संस्थेचे कार्यकारिणी सदस्य डॉ. राजीव प्रधान यांनी व्यक्त केले.

येथील सेवासदन संस्था पुणे, शाखा सोलापूरच्या वतीने शाळेतील शिक्षकांसाठी संगणक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्याच्या उद्घाटनाप्रसंगी शिक्षकांना मार्गदर्शन करताना डॉ. प्रधान बोलत होते.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिवा सौ. वीणा पत्की होत्या. प्रारंभी सरस्वती मूर्तीचे पूजन सर्व प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेच्या अध्यक्षा शीला मिस्त्री यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे निमंत्रित सदस्य पद्माकर कुलकर्णी, सेवासदन प्रशालेच्या मुख्याध्यापिका सौ.राजेश्री रणपिसे, उपमुख्याध्यापिका नंदिनी बारभाई, पर्यवेक्षिका स्वाती पोतदार, शिक्षक प्रतिनिधी सतीश घंटेनवरू यांच्यासह शिक्षक बंधू भगिनी प्रशिक्षणार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन आणि आभार अश्विनी वाघमोडे यांनी मानले.



## प्रभाग २६ मध्ये पिण्याच्या जलवाहिनी कामाचे उद्घाटन

### नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील प्रभाग क्र २६ मधील विष्णूपुरी येथे गेल्या अनेक वर्षांपासून स्थानिक नागरिकांना अनेक यातना सहन कराव्या लागत आहेत. यापूर्वीच्या लोकप्रतिनिधींनी येथे कोणतीच विकासकामे केले नाहीत. केवळ मत मागण्यासाठी नगरात यायचे, खोटे नाटे आश्वासन देऊन निघून जायचे. असा प्रकार वारंवार घडल्याने तेथील नागरिक वैतागले होते.

दरम्यान २०१७ साली सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत माजी नगरसेविका राजश्री चव्हाण ह्या निवडून आल्यानंतर प्रथम विष्णूपुरी सोसायटीतील पाण्याची पाईपलाईन, ड्रेनेज लाईन, प्रमुख रस्ता, अंतर्गत रस्ते प्राधान्याने करून दिले होते. तसेच विष्णूपुरी नगरातील गणेश मंदिर यांचे सुशोभीकरण करून देण्यात आले होते. उर्वरित नऊ ते दहा घरांसाठी पाण्याची पाईपलाईन नसल्यामुळे तेथील नागरिकांनी सातत्याने नगरसेविका राजश्री चव्हाण यांच्याकडे निवेदने दिले होते.

दरम्यान त्याची दखल घेत सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांना निवेदन दिले होते. ल शासनाच्या मूलभूत सुविधा योजनेअंतर्गत पाण्याची पाईपलाईन काम मंजूर होऊन प्रत्यक्ष कामाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी तेथील नागरिक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आम्ही गेल्या अनेक वर्षापासून सदर नगरामध्ये राहत असून आम्हाला कुठल्याच सुविधा मिळत नव्हत्या. कर भरूनही सोयीसुविधा मिळत नसल्याने अनेक अडचणींना सामोरे जावे लागत होते. परंतु नगरसेविका राजश्री चव्हाण यांनी निवडून आल्यानंतर प्राध्यान्याने आमचे नगरातील पाण्याची पाईपलाईन, ड्रेनेज, प्रमुख रस्ते, अंतर्गत डांबरी रस्ते, दिवाबत्ती, गणेश मंदिराचे सुशोभीकरण आदीं विकासकामे करून आमच्या नगराचा कायापालट केला आहे.

याप्रसंगी विश्वास जाहागीरदार, सुहास कुलकर्णी, बाळासाहेब खटाळ, शुभम चिकोळी, शिवानंद पाटील, सिद्धाराम बिराजदार, गुरु आवटगी, पोतणीस काका, रोहित रुपनर, सचिन शिंदे, शुभम बिराजदार, कुंभार काका, दुबे, कुंभार, कुलकर्णी, सौ.चीकाळी तसेच भाजपचे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अनिल भीमराव चव्हाण, ठेकेदार सोनी उपस्थित होते.

## सकल ओबीसी समाजाचा उद्याचा मेळावा रद्द

**सोलापूर दि. १८ ऑक्टोबर-**

सकल ओबीसी, दलित, भटके, अल्पसंख्यांक समाजाच्या मार्गदर्शक मेळाव्याचे आयोजन प्रमुख वक्ते प्रा. लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली रविवारी (दि.२०) रोजी सकाळी ११ वाजता सात रस्ता येथील अब्दुलपुरकर मंगल कार्यालयात होणार होता. परंतु राज्यातून ओबीसी उमेदवाराची चाचपणी करून उमेदवार निवडायच्या कामात प्रा. हाके हे व्यस्त असल्याने हा मेळावा रद्द करण्यात आला आहे. या मेळाव्याची तारीख नंतर कळविण्यात येणार आहे. सकल ओबीसी बांधवानी याची नोंद घ्यावी, असे सिद्राम चोपडे व अप्पाराव हाके यांनी कळविले आहे.




## नु.म.वि. शाळेत वाचन प्रेरणा दिन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

नु.म.वि. मराठी शाळेत वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. मुख्याध्यापिका श्रीमती वर्षा जेधे यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या कार्याविषयी सहशिक्षिका रेणुका हिरेमठ यांनी माहिती सांगितली. यावेळी मुख्याध्यापिका यांच्या हस्ते पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी त्यांनी वाचनाने मन समृद्ध होते, अनुभव विश्व संपन्न होते, असे वाचनाचे फायदे सांगत विद्यार्थ्यांनी वाचन करावे असा संदेश दिला. याप्रसंगी रोज एक तास वाचनाचा, चला वाचू वर्तमानपत्र, पालकांसाठी वाचन कट्टा इत्यादी उपक्रम घेण्यात आले. सूत्रसंचालन रोहिणी चौधरी यांनी केले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## संक्षिप्त वृत्त



### वाचनाने तणावमुक्त होऊन मन प्रसन्न राहते : प्रा. अशोक पाचकुडवे

**मोहोळ, दि. १८ ऑक्टोबर-**
सध्याच्या पिढीने वाचन संस्कृती जपली पाहिजे. वाचन केल्याने जीवनाला योग्य दिशा मिळते. सध्याच्या धावपळीच्या युगात वेळ काढून सतत वाचन केले तर मनावरील ताणतणाव कमी होऊन मन प्रसन्न व आनंदी राहते असे प्रतिपादन प्रा. अशोक पाचकुडवे यांनी केले. येथील व्यापारी मोफत वाचनालय मोहोळ या तालुका अ वर्ग वाचनालयामध्ये डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी व्यापारी मोफत वाचनालय मोहोळचे अध्यक्ष डॉ. सुधीर जोशी होते. यावेळी ग्रंथपाल दिलीप देशपांडे, माजी प्राचार्य दिलीप देशपांडे, राजाभाऊ देशमुख, मोहोळ नपाचे ब्रँड अँबेसिडर राजन घाडगे, ज्योत्स्ना जोशी, पूनम शिंदे, शहाजहान बागवान, भाजयुमोचे अजय कुरडे, पठाण, दिगंबर होनमाने, अविनाश वाघमारे, अभिजीत गवळी, नागनाथ मोरे, प्रा. सचिन निस्ताने उपस्थित होते. सूत्रसंचालन ग्रंथपाल दिलीप देशपांडे यांनी केले. यावेळी वाचनालयाचे संचालक चेतन शहा व विश्वनाथ नारायण कुलकर्णी यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. मराठी भाषेस अभिजात दर्जा मिळाल्याबद्दल केंद्र शासन, महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करण्याचा ठराव करण्यात आला.



### दहिगावच्या आयटीआयमध्ये खंडे महानवमी उत्साहात साजरी

**नातेपुते, दि. १८ ऑक्टोबर-**
खंडेमहानवमी म्हणजे या दिवशी शिल्पकार आणि कारागीर आपआपल्या पारंपरिक कौशल्याच्या अवजारांची पूजा करतात. औद्योगिक प्रशिक्षण संस्था मध्ये असणाऱ्या सर्व मशिनरी, साधनसामग्री हे मुलांना तंत्र शिक्षणाचे धडे शिकवत असतात. त्या मशिनरी ची पूजा केली जाते. अशाप्रकारे विलासचंद्र एम. मेहता औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये खंडे महानवमी उत्साहात संपन्न झाली. मान्यवरांच्या उपस्थितीत ऑफिस व सर्व ट्रेडच्या मशनरी चे पूजन केले. याप्रसंगी रत्नत्रय एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष अनंतलाल दोशी, नातेपुते प्री स्कूलचे चेअरपर्सन वैभव शहा, आयटीआयचे प्राचार्य गजेश जगताप सर व स्पर्धा परीक्षा अ‍ॅकॅडमीचे मुख्याध्यापक सतीश हांगे उपस्थित होते. एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक अध्यक्ष अनंतलाल दोशी, संस्थेचे खजिनदार अमृत गांधी, संस्थेचे ट्रस्टी बाहुबली चंकेश्वरा, रत्नत्रय एज्युकेशन सोसायटीचे सचिव व विलासचंद्र एम. मेहता आयटीआयचे मार्गदर्शक प्रमोद दोशी, विलासचंद्र एम. मेहता, आयटीआयचे चेअरपर्सन विशाल गांधी, रत्नत्रय स्पर्धा परीक्षा अ‍ॅकॅडमीचेअरपर्सन श रोनक चंकेश्वरा, वैभव शहा, रत्नत्रय एज्युकेशन सोसायटीचे तज्ज्ञ संचालक निश्चल होरा, अमित गांधी यांनी महाखंडे नवमीनिमित्त शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमासाठी शिवराम नाळे, निलेश शेंडे, गणेश खंडागळे, स्नेहल थोरात, पूजा चव्हाण, सुभाष शिरतोडे, आगतराव किर्दक यांनी परिश्रम घेतले.



### पिलीव जिल्हा परिषद केंद्रशाळेचे व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेत यश

**पिलीव, दि. १८ ऑक्टोबर-**
माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेच्या विद्यार्थिनी केंद्रस्तरावर आयोजित करण्यात आलेल्या व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धेत दैदिप्यमान यश संपादन केले. या स्पर्धेत केंद्रातील सर्वच शाळांनी सहभाग घेतला होता.यामध्ये पिलीव येथील केंद्र शाळेच्या विद्यार्थिनी निबंध स्पर्धेत इयत्ता चौथी मधील आरोही श्रीकांत सपाटे प्रथम क्रमांक, विघ्नेश विनोद तावरे दुसरा क्रमांक, स्वरा महेश शिंदे तिसरा क्रमांक तर चित्रकला स्पर्धेत आयुध अमोल धर्माधिकारी याने दुसरा क्रमांक पटकाविला, समूह गीत गायन स्पर्धेत प्रथम क्रमांक, समूह नृत्य स्पर्धेत वारकरी नृत्य यामध्ये प्रथम क्रमांक, तर कोळी नृत्यात तिसरा क्रमांक पटकाविला. या यशाबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे केंद्रप्रमुख राजकुमार फासे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल गांधी, उपाध्यक्ष प्रिया रजपूत, सर्व सदस्य,पालक ,मार्गदर्शक शिक्षक, मुख्याध्यापक विजय साळुंखे, सांस्कृतिक विभाग प्रमुख सावित्री करमाळकर, सहशिक्षिका सुप्रिया पांगे, मयुरा देशमुख, महादेवी पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

### न्याय आपल्या दारी : पंढरीत फिरते लोक अदालत, कायदेविषयक शिबीर

**पंढरपूर, दि.१८ ऑक्टोबर-**
सर्वोच्च न्यायालयाच्या 'न्याय आपल्या दारी' या संकल्पनेतून सुरू केलेल्या फिरते लोक अदालत व कायदेविषयक शिबिराचे आयोजन राज्य विधी सेवा प्राधिकरण यांच्या आदेशान्वये गोपाळपूर, वाखरी व गुरसाळे या गावांमध्य २५ ऑक्टोबर ते ४ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत करण्यात आलेले आहे. फिरते लोक आदालत तालुक्यातील गोपाळपुर, वाखरी व गुरसाळे गावात फिरून न्यायालयात प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात येणार आहेत. फिरते लोक अदालत यशस्वी करण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे व जास्तीत जास्त लाभ घेवून तडजोड योग्य प्रकरणे आपसात मिटवावी असे आवाहन. तालुका विधी सेवा अध्यक्ष समिती, तथा जिल्हा व सत्र न्यायाधीश डी. एन. सुरवसे यांनी केले आहे.

# करमाळा, कुर्डूवाडीचे रुपडे पालटणार

**करमाळ्याला सात कोटी, कुर्डूवाडी नगरपरिषदेला ८ कोटी निधी; सीसीटीव्ही बसविणे, इलेक्ट्रिक पंप बसविण्यासह विविध कामांचा समावेश**

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १८ ऑक्टोबर-**
निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वीच आ. संजयमामा शिंदे यांनी करमाळा मतदारसंघात अंतर्भूत असलेल्या करमाळा व कुर्डूवाडी या दोन नगरपरिषदेला १५ कोटी निधी मंजूर करून घेतला आहे.

करमाळा येथे चांदगुडे गल्ली परिसर रस्ता काँक्रीट करणे व गटार बांधणे ५० लाख, दत्त मंदिर (विकास नगर) ते शासकीय विश्रामगृह (सात विहीर) रस्ता डांबरीकरण करणे -५० लक्ष,रंभापुरा गल्ली येथे अंतर्गत गटारी बांधणे- २५ लक्ष, रंभापुरा गल्ली करिता बोअर घेणे व पाण्याची टाकी बांधणे २५ लक्ष, रंभापुरा गल्ली भुईकोट किल्ला शेजारील बाग सुधारणा करणे १० लक्ष,घोलप हॉस्पिटल ते यशवंतराव चव्हाण महाविद्यालय पाठीमागील बाजूपर्यंत रस्ता काँक्रीट करणे ३५ लक्ष, भवानी पेठ मारुती मंदिर बाजू ते डॉ. लावंड हॉस्पिटल जवळील पुलापर्यंत रस्ता काँक्रिट करणे १० लक्ष, करमाळा शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे ३० लक्ष, गणेश नगर आनंद बाग मुस्लिम स्मशानभूमी (कब्रस्तान) येथे सुशोभिकरण करणे, पाणीपुरवठा सोय करणे १० लक्ष, शिंपी समाजासाठी सभागृह बांधणे २५ लक्ष, ईदगाह मैदानावर फरसी बांधणे व सुशोभिकरण करणे १० लक्ष, गवंडी गल्ली येथे समाज मंदिर बांधणे १० लक्ष, रमेश कांबळे घर ते घोडके घर गटार बांधकाम करणे १० लक्ष, देविदास कांबळे घर ते नगरपरिषद नाला येथे गटार काम करणे १० लक्ष, प्रशांत कांबळे घर ते अविनाश कांबळे घरापासून पुढे सुहास कांबळे घर येथे गटार काम करणे १५ लक्ष, सिद्धार्थ भोसले घर ते दशरथ बाबुराव कांबळे घर गटार बांधणे १५ लक्ष, सिद्धार्थ भोसले घर ते मधुकर थोरात घर रस्ता काँक्रीट करणे १५ लक्ष, सिद्धार्थनगर येथील अंगणवाडी क्र.२ ते जीवन कांबळे घर गटार काम करणे १० लक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशाला कोपरा ते बाळासाहेब कांबळे घर रस्ता काँक्रीट करणे - १० लक्ष,रहिष कांबळे घर ते नाला गटार काम करणे - १० लक्ष,शितोळे घर ते गणपती मंदिर रस्ता गटार करणे १० लक्ष, वाचनालयासमोर सांस्कृतिक भवन बांधणे १५ लक्ष, संताजीनगर प्लॉटिंगमधील नगरपालिका खुल्या जागेत बगीचा विकसित करणे १० लक्ष, संताजीनगर मधील अंतर्गत रस्ते काँक्रीट करणे २० लक्ष, संत सेना महाराज सांस्कृतिक भवन बांधणे २० लक्ष, मंगळवार पेठ काझीबोळ ते बारामती सहकारी बँक बोळ रस्ता काँक्रीट करणे गटार बांधणे, पेव्हिंग ब्लॉक बसविणे १५ लक्ष, करमाळा शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी दोन इलेक्ट्रिक मोटर (पंप) बसविणे १ कोटी ४० लक्ष, सटवाई मंदिर पूल ते जामखेड रोड पूल (गोरख पवार यांचे दुकानापर्यंत) नाला ट्रेंचिंग करणे ५० लक्ष, कै. नामदेवराव जगताप नगरपालिका उर्दू शाळा नवीन वर्गखोली बांधणे ३५ लक्ष याप्रमाणे करमाळा नगरपरिषदेसाठी ७ कोटी निधी प्राप्त झाला आहे.

कुर्डूवाडी नगरपरिषद (ता. माढा) यांच्यासाठी ८ कोटी निधी प्राप्त असून त्यामधून टेंभुर्णी रोड येथील बेंद ओढ्यावर पूल बांधणे २ कोटी, रेल्वे गेट ते करमाळा रोड चौक रस्ता करणे १ कोटी, छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसर सुशोभिकरण करणे १ कोटी, कुर्डूवाडी शहरांतर्गत रस्ते तयार करणे २ कोटी ५० लक्ष, माढा रोड वरील घाण पाण्यावरील पूल बांधणे ५० लक्ष, कुर्डूवाडी नगरपालिका अग्निशामक दल संरक्षक भिंत बांधणे ६० लक्ष, नेहरुनगर येथे गटार बांधकाम करणे ४० लक्ष असा एकूण ८ कोटी निधी कुर्डूवाडी नगरपरिषदेला प्राप्त झाला आहे.





> करमाळा नगरपरिषदेच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आ. शिंदे यांना समजल्यानंतर त्यांनी तात्काळ दोन नवीन इलेक्ट्रिक पंप खरेदीसाठी निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन दिले होते. त्याचबरोबर करमाळा शहरातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही बसविणे ही मागणी त्यांच्याकडे आली असता त्यासाठीही त्यांनी नगरविकास विभागाकडून निधी उपलब्ध करून दिला आहे.
>
> **- प्रवीण जाधव,** माजी नगरसेवक, करमाळा

# वाहन चालकांचा बेजबाबदारपणा अपघातास कारणीभूत

**पो. नि. बालाजी कुकडे : श्री शिवाजी शिक्षण संस्थेतर्फे जागतिक टरामा दिवसानिमित्त बेसिक लाईफ सपोर्ट कार्यशाळा**

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर-**
जगभरात १७ ऑक्टोबर हा 'जागतिक ट्रॉमा डे' म्हणून साजरा केला जातो. जगभरात अपघातामुळे होणाऱ्या मृत्यूची संख्या प्रचंड आहे. शासकीय आकडेवारीनुसार आपल्या देशात दरवर्षी चार लाख मृत्यू अपघातामुळे होतात. दर पाच मिनिटाला एका व्यक्तीचा मृत्यू होत असल्याचे शासकीय अहवालात नमूद करण्यात आले आहे. या दिवसाच्या प्रसंगी जगदाळे मामा हॉस्पिटल व बी.पी. सुलाखे कॉमर्स कॉलेज बार्शी (राष्ट्रीय सेवा योजना विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक ट्रॉमा दिन आणि बेसिक लाईफ सपोर्ट कार्यशाळा या कार्यक्रमाचे आयोजन जगदाळे मामा हॉस्पिटल येथे करण्यात आले होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या मूर्तींना पुष्प अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. मान्यवरांचा परिचय प्रा. एन.आर सरपाळे यांनी करुन दिला तर जगदाळे मामा हॉस्पिटलचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. आर .व्ही जगताप यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना केली.

उद्घाटन बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे यांच्या हस्ते करण्यात आले. जमलेल्या सर्व उपस्थितांना ट्रॉमा दिनाचे महत्व सांगून, एक नागरिकाचे रोड ट्रॅफिकबद्दलचे नियम कसे पाळावे याबद्दल मार्गदर्शन केले. यावेळी बोलताना कुकडे म्हणाले की, अपघातास वाहनांची प्रचंड संख्या, वाहनचालकांचा बेजाबदारपणा, मद्यपान आदी विविध कारणे कारणीभूत मानली जातात. परंतु वाहनचालकांनी काही खबरदारी घेतल्यास अपघात टळून मोठी हानी टळू शकते. दरम्यान अपघात झाल्यानंतर अपघातग्रस्त नागरिकाला तातडीने प्राथमिक उपचार मिळाल्यास, वाहतुकीच्या नियमांचे पालन केल्यास, मोठी जीवितहानी टळू शकते व मदत करणाऱ्यास पोलीस विभागकडून कोणत्याही चौकशीकरीता बोलविले जाणार नाही हे देखील सांगितले. वाहन चालकांनी दुचाकी वाहनावर हेल्मेट वापरण्याचे देखील आवाहन केले. प्रमुख पाहुणे उद्योजक विनयजी संघवी यांनी देखील त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील काही प्रसंग सांगून सर्वांना रोड सेफ्टीबद्दल जागरुक राहण्याचे आव्हान केले.

या कार्यक्रमातील एक प्रमुख भाग म्हणजे बेसिक लाईफ सपोर्ट कार्यशाळा याचे प्रशिक्षण जगदाळे मामा हॉस्पिटलचे कन्सलटन्ट डॉ. धीरज जाधव यांनी सर्व जमलेल्या सर्व राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विद्यार्थ्यांना एक प्रात्यक्षिक दाखवून सीपीआर कसा देऊन रुग्णाचा जीव वाचवावा याचे अचूक प्रशिक्षण दिले व सोबतच मिळालेले प्रशिक्षण आपल्या जवळच्या लोकांना पण शिकवावे, असे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी.वाय. यादव यांनी ट्रॉमा युनिटची माहिती देत अध्यक्षीय भाषण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. महादेव ढगे व प्रा.कविता वरडे यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. एस. बी. करंडे यांनी मानले. याप्रसंगी मंडळाचे सचिव पी. टी. पाटील, कोषध्यक्ष जयकुमार शितोळे, विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी, शिक्षक, विध्यार्थी व हॉस्पिटलचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## हिळ्ळी येथे श्री गुरु गंगलिंग महाराज यात्रा भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ ऑक्टोबर-**
अक्कलकोट तालुक्यातील सुक्षेत्र हिळ्ळी येथे श्री गुरु गंगलिंग महाराज यात्रा महोत्सव मोठ्या थाटामाटात संपन्न झाली. पंचक्रोशीतील जनसागर लोटला होता.

गुरु गंगलिंग महाराजांच्या ३४ व्या पुण्यस्मरणानिमित्त धनगरी ओव्या झाल्या. सकाळ सत्रात हरनाळ संघाच्या मुख्य गायिका रेखा व हिळ्ळीचे सुपुत्र सोमनाथ जेऊर मास्तर यांच्यात जुगलबंदी रंगली. रात्री मुत्तुर अक्षता व बसनाळ सुचित्रा यांच्यात गायनाची स्पर्धा झाली. यावेळी माळप्पा मास्तर व बिरू मास्तर यांनी अपेक्षा आणि निरपेक्ष या विषयावर चर्चा घडवून आणली. श्री गुरु गंगलिंग महाराज व श्री बीर लिंगेश्वर महाराजांची पालखी मिरवणूक काढण्यात आली. यावेळी संजय पुजारी, जय मल्हार तरुण मंडळ, मल्लिनाथ रामचंद्र बाके, राजशेखर सावळगी, अशोक शिवशरण, वसंत पुजारी, ट्रस्टचे अध्यक्ष संजय सिद्धप्पा पुजारी, गुरु गंगलिंग यात्रा कमिटीचे अध्यक्ष आशपाक मुजावर, उपाध्यक्ष संगप्पा बाके, कार्याध्यक्ष भीमाशंकर शटगार, खजिनदार तुकाराम पुजारी, सचिव गोविंदराज कुलकर्णी, शंकरेप्पा शटगार, हणमंत हेगोंडे, भिमशा सावळे, उपाध्यक्ष जगदीश बाके, सचिव दिलीपराव शिवशरण, सहसचिव

# कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेच्या जिल्हाध्यक्षांच्या निवडी

**दीपक शिंत्रे, प्रा. डॉ. मैजोद्दीन मुतवल्ली, प्रा. मीनाक्षी काळे-पाटील, सुधा बटगेरी, लता माने, डॉ. संध्या अणवेकर यांची वर्णी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**
कर्नाटक राज्य मराठी साहित्य परिषदेच्या विजयपूर, बेळगांव, बागलकोट, बिदर आणि चिक्कोडी जिल्हाध्यक्षांच्या निवडी जाहीर करण्यात आल्या.

विजयपूर जिल्हाध्यक्षपदी जेष्ठ पत्रकार दीपक शिंत्रे, बेळगाव जिल्हाध्यक्षपदी प्रा. डॉ. मैजोद्दीन मैनोद्दीन मुतवल्ली, बिदर जिल्हाध्यक्षपदी कवियत्री प्रा. मीनाक्षी काळे-पाटील, बागलकोट जिल्हाध्यक्षपदी लेखिका सुधा बटगेरी तर चिक्कोडी जिल्हाध्यक्षपदी कवियत्री लता माने-संकेश्वर, बेंगळूरूच्या माजी अध्यक्षा डॉ.संध्या राजन अणवेकर यांची राज्य कार्यकारणीवर वर्णी लागली आहे. नूतन सर्व जिल्हाध्यक्षांचा १० नोव्हेंबर रोजी बेंगळूरू येथे महाराष्ट्र मंडळात होणाऱ्या एका कार्यक्रमात सन्मान करण्यात येणार आहे.

जिल्हाध्यक्ष हे आपला जिल्हा, तालुका कार्यकारणी जाहीर करणार आहेत. कराम साप अध्यक्ष गुरय्या रे. स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत सरकार्यवाह प्रा. विजयकुमार चौधरी, कार्यवाह प्रभाकर सलगरे, बी. ए. कांबळे, मिलिंद उमाळकर, प्रमोद शहा, अभिषेक वळसंगकर, दयानंद सुरवसे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.


दीपक शिंत्रे


सुधा बटगेरी


मैजोद्दीन मुतवल्ली


मीनाक्षी काळे


लता माने


संध्या राजन

# नागणसूरमध्ये बसवलिंगेश्वर महास्वामींची १७ तास मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १८ ऑक्टोबर-**
नागणसूरच्या (ता. अक्कलकोट) तुप्पीन मठाचे योगीपुरुष, गावासाठी जीव अर्पण केलेले जगद्गुरु श्री बसवलिंगेश्वर महास्वामीजींच्या ९२ व्या पुण्यस्मरणोत्सवा निमित्त त्यांच्या भावचित्राचे व धर्मग्रंथाचे उत्साहात मिरवणूक काढण्यात आली.

डॉ. अभिनव बसवलिंगेश्वर महास्वामीजींच्या नेतृत्वाखाली मंगळाआरती करुन सायंकाळी ७.०० वाजता मिरवणुकीस सुरुवात झाली. ही मिरवणूक गावच्या मुख्य रस्त्याने निघाली. गावभर प्रत्येक घरोघरी सुवासिनींनी पंचारतीने औक्षण केले जलार्पण केले. पुष्पहार अर्पण केले. नारळ वाढविले. इच्छापूर्तीसाठी नवस मागून घेतलेल्या हजारो भाविकांनी देणगी स्वरूपात पैशांच्या नोटांचे हारं करून देणगी अर्पण केली. श्री बसवलिंगेश्वर महास्वामीजींच्या भावचित्रास अर्पण करून नवस फेडले. सायंकाळी सात वाजता निघालेली मिरवणूक दुसऱ्या दिवशी दुपारी बारा वाजून ३५ मिनिटानी जय बसवा, जय जय बसवाच्या जयघोषात श्री मठात दाखल झाली. १७ तास ३५ मिनिटे चाललेल्या या मिरवणुकीच्या दरम्यान सर्व भक्त भाविकांना श्री बसवलिंगेश्वर गल्ली व जोड हनुमान गल्ली येथे दूधखीर वाटप करण्यात आले. पंचकट्टा येथे चहा-चिवड्याची व्यवस्था केली होती. श्री मल्लिकार्जुन गल्लीत चहा व उप्पीटची सोय केली होते. सदर मिरवणुकीत टिपरी संघ, लेझीम संघ, लहान मुलींचे नृत्य व वीरभद्रेश्वर भजना मंडळी यांच्या उपस्थितीत सहवाद्य मिरवणूक काढण्यात आले. ही मिरवणूक दर वर्षाप्रमाणे बैलगाडीत भावचित्र व धर्मग्रंथ ठेवून मिरवणूक काढली गेली. दरवर्षी प्रमाणे गावातील बैलजोडीचे चिठ्ठी उचलून बैल गाडीला जुंपले जातात. यावर्षी बसवराज प्रचंडे व अप्पाशा दरगोंडा यांच्या बैल जोडीना गाडी ओढण्याचे भाग्य लाभले. भाविकांनी मोठी गर्दी केली होती.



# लोकमाता अहिल्यादेवींचे प्रशानकार्य प्रेरणादायी

**डॉ. सुवर्णा गुंड : पंढरपुरातील उमा महाविद्यालयात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ ऑक्टोबर-**
लोकमाता ही अहिल्यादेवी होळकर यांना प्रजेनं दिलेली पदवी अतिशय सार्थ ठरली आहे. अहिल्यादेवींनी आपल्या कार्यक्षेत्रातील प्रजेलाच नव्हे तर अखंड हिंदुस्थानला एक राजनैतिक वारसा दिला आहे. प्रजेला आपल्या मुलाप्रमाणे कसं सांभाळायला हवं तसेच प्रजाहितदक्ष कसं असावं तसंच धमपरायनतेसाठी राष्ट्राच्या हितासाठी, पुर्ण राष्ट्रात मंदिरांचं संवर्धन, दानधर्म, धर्मशाळा उभारल्या, धर्मरक्षणही केलं. यासाठी शस्त्रापेक्षा शास्त्राचा कौशल्याने उपयोग केला. यासाठी आपल्या प्रजेकडून जादाचा कर न घेता त्यांनी आपल्या खासगीतून जो पैसा मिळे त्यातून त्यांनी हे सर्व पुण्यकर्म केले होते. त्यामुळं त्यांना पुण्यश्लोक, धर्मरक्षक, लोकमाता या पदव्या लोकांनी बहाल केल्या असे प्रतिपादन उदाहरणासह प्रोफेसर डॉ सुवर्णा गुंड-चव्हाण यांनी केले.



श्री पांडुरंग प्रसारक मंडळ संचालित, उमा शिक्षणशास्त्र महाविद्यालय, पंढरपूर यांच्यावतीने आयोजित केलेल्या आभासी पटलाद्वारे समस्त विद्यार्थ्यांना प्रबोधित करताना त्या बोलत होत्या. यावेळी उपस्थित आयोजिका व कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विद्युल्लता पांढरे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. अहिल्यादेवी यांचे कार्यावर प्रो. डॉ.सुवर्णा गुंड यांनी सर्वच स्तरातून व पातळीवर लोकमाता अहिल्यादेवी यांच्या केलेल्या कार्याची जी मांडणी केली. त्यामुळे अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे महत्त्व लक्षात घेता. ते कसे आपणास कसे उपयुक्त ठरते यास दुजोरा दिला.

याप्रसंगी उमा शिक्षण संकुलाचे कार्यवाह डॉ.मिलिंद परिचारक, जनसंपर्क अधिकारी सूर्यकांत पारखे, प्रा. विलास बंडगर, प्रा. सविता दुधभाते, बीएड प्रथम व द्वितीय वर्षाचे विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक तनुजा सुपले यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. जे. एस. बागवान यांनी करुन दिला. सूत्रसंचालन स्मिता जाधव यांनी केले. आभार प्रथमेश शेटे यांनी मानले.

> **यावर केले मार्गदर्शन**
>
> पुढं त्यांनी सैन्याला कुमक पुरविणे, टपाल व्यवस्था, भिल्ल समाज व गोंड समाजासाठीची ध्येय धोरणे. राज्य व्यवस्था, न्यायव्यवस्था इत्यादीची उदाहरणांसह मांडणी केली. आजच्या सर्व महिलांनी याचा आपल्या जीवनात व कामकाजात आदर्श घ्यावा याचे मार्गदर्शन डॉ. गुंड यांनी केले.

# मतदान केंद्रांवर वेब कॅमेरे

**मोहोळच्या निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांची माहिती**

**मोहोळ, दि. १८ ऑक्टोबर-**
निवडणुकीसाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज असून आचारसंहिता भंग करणाऱ्यांवर थेट कारवाई करण्यात येईल. संवेदनशील मतदान केंद्रात वेब कॅमेरे बसवण्यात येतील, असे मोहोळ मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी सीमा होळकर यांनी सांगितले.

दरम्यान निवडणुकीच्या प्रक्रियेतील उमेदवाराने त्यांच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्याचे तीन वेळा प्रसिद्धीकरण करणे गरजेचे आहे असेही त्यांनी सांगितले. मोहोळ विधानसभा मतदारसंघात एकूण १४६ गावांचा समावेश असून, ३३६ मतदान केंद्रे आहेत. ३ लाख २९ हजार एकूण मतदार आहेत. तालुक्यातील भैरववाडी, मनगोळी व अनगर ही संवेदनशील मतदान केंद्रे असून, मतदानावेळी या ठिकाणी वेब कॅमेरे बसविले जाणार आहेत. तर उर्वरित मतदान केंद्रावर ही वेब कॅमेरे बसविले जाणार आहेत. ४ फ्लाईंग स्कॉड तयार केले असून, सावळेश्वर व होनसळ या ठिकाणी चेक नाके तयार केले आहेत. ५० हजारापेक्षा जादा रक्कम घेऊन जाता येणार नाही. तसे आढळून आल्यास त्याचा पुरावा द्यावा लागणार आहे. उमेदवारांच्या हालचाली, प्रचार, भाषणावर लक्ष ठेवण्यासाठी तीन व्हिडिओ टीम नेमल्या असल्याचेही निवडणूक निर्णय अधिकारी श्रीमती होळकर यांनी सांगितले. यावेळी तहसीलदार सचिन मुळीक उपस्थित होते.

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## कर्नाटक सीमेवरील चेकपोस्टवर वाहनांची कसून तपासणी होणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -**

निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. अवैध पध्दतीने दारूची वाहतूक, विक्री निर्मिती होणार नाही याबाबत प्रतिबंध करण्याकरता महाराष्ट्र- कर्नाटक राज्यातील उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेवून काम करावे, अशी सूचना विभागीय अधिकाऱ्यांनी दिली.

सीमावर्ती भागातील चेकपोस्ट द्वारे आंतरराज्यीय माल व प्रवासी वाहतूक करणाऱ्या सर्व वाहनांची तपासणी करावी. दोन्ही राज्यांच्या राज्य उत्पादन शुल्क पोलिस विभागांनी अवैध दारू तस्करी करणाऱ्यां आरोपींच्या माहितीचे संकलन करून परस्परांना द्यावी. गोपनीय माहितीद्वारे कारवाई करावी अशा अशा सूचना विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांनी दिल्या आहेत. त्यांनी सोलापूर नियोजन भवन येथे बैठक घेतली. या बैठकीस राज्य उत्पादन शुल्कच्या अधीक्षक भाग्यश्री जाधव, उपअधीक्षक एस. आर. पाटील, कर्नाटक राज्यातील विजयपुरा जिल्ह्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे उपायुक्त डॉ. संगनगौडा होसळ्ळी व कलबुर्गी जिल्ह्याचे राज्य उत्पादन शुल्क विभागाचे अधीक्षक हनमंतराय वज्रमड्डी, उपअधीक्षक दोडाप्पा हेबळे उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### अल्पसंख्यांक समाजाच्या सर्वांगिण विकासासाठी कटिबद्ध : आ. संजयमामा शिंदे

**करमाळा, दि. १८ ऑक्टोबर-**

करमाळा मतदारसंघातील अल्पसंख्याक समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव कटिबद्ध राहू, असे आश्वासन आ. संजयमामा शिंदे यांनी दिले. करमाळा शहरातील ईदगाह मैदान परिसर सुशोभिकरण व वॉल कंपाउंड बांधणे, सुलेमानी मस्जिद (आनंदबाग रोड) समोरील रस्ता कॉंक्रीटीकरण करणे, मुलाणवाडा दफनभूमी वॉल कंपाऊंड व पोहोच रस्ता करणे, बेग-फकीर दफनभूमी वॉल कंपाउंड बांधणे, फारूक जमादार घर परिसरात कॉंक्रीटीकरण व पेव्हिंग ब्लॉक्स बसविणे या विविध विकासकामांचे भूमिपूजन आमदार शिंदे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते विवेक येवले, माजी पं. स. सदस्य ॲड. राहुल सावंत, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भरत आवताडे, माजी नगरसेवक प्रविण जाधव, बापू तांबे, देवा लोंढे, संतोष सापते, माजी उपनगराध्यक्ष अहमद कुरेशी, माजी नगरसेवक नजीर अहमद कुरेशी, अर्बन बँकेचे माजी संचालक कलिम काझी, अर्बन बँकेचे माजी व्हा.चेअरमन फारूकभाई जमादार, भोसे माजी सरपंच भोजराज सुरवसे, संभाजी ब्रिगेडचे राज्य प्रवक्ते हर्षल बागल, रावगावचे माजी सरपंच दादासाहेब जाधव, एकलव्य आश्रमशाळेचे अध्यक्ष राम कृष्ण माने, गुळसडीचे माजी सरपंच मानसिंग खंडागळे, देवळालीचे संतोष गायकवाड, उदयोजक संतोष कुलकर्णी, सकल मुस्लिम समाजाचे शहराध्यक्ष जमीर सय्यद, विशाल कुभांर, सोहेल पठाण, ईस्माइल मुलाणी, तौफीक शेख, आझाद शेख, सूरज शेख, हाजी महमदआली शेख, समीर शेख, पिंटू बेग, गुळसडीचे इक्बाल शेख, जहॉगीर बेग, सोहेल पठाण, हाजी उस्मान सय्यद, हाजी इस्माइल मुलाणी, अलीम खान, पत्रकार राजू सय्यद, उमर मदारी, चाँद बेग, जावेद शेख, आलीम पठाण, जिलानी खान, राजू बेग, चॉंद बेग, शाहिद बेग, आरबाज बेग, शाहरुख शेख आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष आशपाक जमादार यांनी केले.



### रयत क्रांती संघटनेच्या सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी जाहीर


**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर-**

रयत क्रांती संघटनेच्या सोलापूर जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या निवडी रयत क्रांती संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष दीपक भोसले यांनी जाहीर केल्या. त्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र ओबीसी सेल अध्यक्ष हनुमंत गिरी , सोलापूर जिल्हाध्यक्ष नामदेव पवार, सोलापूर जिल्हा युवा अध्यक्ष अमोल वेदपाठक सोलापूर जिल्हा कार्याध्यक्ष बाबासाहेब ननवरे सोलापूर जिल्हा उपाध्यक्ष लक्ष्मण बिराजदार सोलापूर जिल्हा सरचिटणीस रमेश भंगे माढा तालुका अध्यक्ष नागेश गायकवाड तसेच महिला आघाडी पदाधिकाऱ्यांच्याही निवडी करण्यात आल्या सोलापूर जिल्हा महिला कार्याध्यक्ष तनुजा मुळे अक्कलकोट तालुका महिला अध्यक्ष शीला बारोळे दक्षिण तालुका महिला अध्यक्ष सुनंदा हक्के रयत क्रांती संघटनेचे राज्य कार्याध्यक्ष दीपक भोसले व राज्य प्रवक्ते तसेच सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख प्रा . सुहास पाटील जिल्हा प्रसिद्धी प्रमुख प्रा. डॉ. भीम ाशंकर बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली निवडी पार पडल्या.

### नागणसूर मठात समर्थ बिराजदार यांचा सत्कार

**अक्कलकोट, दि. १८ ऑक्टोबर-**

नागणसूरचे श्री जगद्गुरु बसवलिंगेश्वर महास्वामीजी यांच्या ९२ व्या पुण्यतिथीनिमित्त अक्कलकोट माहिती अधिकार शहराध्यक्ष समर्थ गुरुलिंगप्पा बिराजदार यांनी महास्वामीजी आशीर्वाद घेतले. यावेळी माहिती अधिकार शहर अध्यक्ष समर्थ गुरुलिंगप्पा बिराजदार यांचा मठाधिपती डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामी यांनी शाल, हार, श्रीफळ व महास्वामींची प्रतिमा देऊन त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी अक्कलकोट तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष शंकर म्हेत्रे यांची उपस्थिती होती.



### काळभैरव नागरी सहकारी पतसंस्थेचे चेअरमन देविदास बारंगुळे यांचे निधन

**बार्शी, दि. १८ ऑक्टोबर-**

येथील कालभैरव नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन देविदास बापू बारंगुळे (वय ६७) यांचे आज शुक्रवारी दुपारी हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. ट्रॅक ड्रायव्हर ते चेअरमन असा खूप मोठा प्रवास त्यांनी अतिशय जिद्दीने पूर्ण करुन २३ वर्षांपासून सतत अ वर्ग मिळणाऱ्या कालभैरव पतसंस्थेच्या माध्यमातून त्यांनी असंख्य गरजू व बेरोजगार तरुणांना आर्थिक पाठबळ दिले. चार दिवसांपासून त्यांच्यावर बार्शीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरु असताना त्यांची प्राणज्योत मावळली. त्यांच्यावर मंगळवार पेठेतील मोक्षधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



## बापूंचा थेट फडणवीसांना फोन अन् सुटले उपोषण

**दहा दिवसांत दुबदुबी तलावात पाणी येणार; उपमुख्यमंत्र्यांचे आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑक्टोंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील शिरवळ येथे काही दिवसांपासून ग्रामस्थ उपोषणास बसले होते त्यांची मागणी अशी होती की, दुबदुबी तलावात लवकरात लवकर पाणी सोडण्यात यावे. त्याच अनुषंगाने शिरवळ येथील उपोषणकर्त्यांची आ. सुभाष देशमुख यांनी भेट घेऊन त्यांची समजूत घालून त्यांना उपोषण सोडण्यास विनंती केली आणि त्यांनी बापूंच्या शब्दाला मान देवून उपोषण देखील स्थगित केले.



याच प्रसंगी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कॉल करून संबंधितांना आदेश देऊन येणाऱ्या दहा दिवसात दुबदुबी तलावात पाणी सोडण्याचे आदेश देण्यासाठी सांगावे, अशी विनंती आमदारांनी थेट केल्याने उपोषणकर्ते जामच खुश झाले. जिल्ह्यामध्ये यावर्षी पावसाळ्यात खूप चांगला पाऊस पडला परंतु दक्षिण सोलापूर व अक्कलकोट तालुक्याच्या सरहद्दीवर शिरवळ परिसरात कसलाच पाऊस पडला नाही. त्यामुळे मागच्या आठवड्यापर्यंत पाण्याचा टँकर चालू होता. उजनी धरण पूर्ण भरल्याने एकरूख उपसा सिंचन योजनेच्या कालव्यातून बोरी कुरनूर तालुका अक्कलकोट या धरणात पाणी सोडण्यात आलं. दरम्यान, बोरी धरणाच्या वरच्या पाणलोटक्षेत्रात चांगला पाऊस पडला; त्यामुळे कुरनूर धरण भरलं. उजनी धरणाचा सांडवा चालूच होता त्यामुळे उजनीतून पाणी एकरूख तलावात घेऊन एकरूख उपसा सिंचन योजनेमार्फत दक्षिण तालुक्यातील अक्कलकोट मतदार संघातील रामपूर व हणमगाव तलावांत पाणी सोडण्यात येत आहे. याच धर्तीवर तलावाच्या ओढ्यावर असणाऱ्या धुबधुबी तलावात एकरूख उपसा सिंचन योजनेच्या कालव्याद्वारे पाणी सोडावे अशी मागणी करत उपोषण सुरू केलं होतं. या तलावाचा अक्कलकोट व दक्षिण सोलापूर या दोन्ही तालुक्यातील शेतकऱ्यांना पिण्याचे पाणी व शेतीसाठी उपयोग होतो. या महत्वाच्या प्रश्नाचा निकाल लावण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी उपोषण स्थळी भेट देऊन दहा दिवसात शिरवळला पाणी पोहोचण्याची व्यवस्था करू आणि जर दहा दिवसात पाणी नाही पोहोचलं तर मी स्वतःही तुमच्यासोबत उपोषणाला बसतो. अशा प्रकारे लोकांना आश्वासित केल्याने शिरवळ व गावातील ऊेषणास बसलेल्या नागरिकांनी उपोषण मागे घेतले.

## आधी तुम्ही काय केले हे तपासा, मग मला विचारा

**● आ. शहाजीबापू पाटील**
**● सांगोला येथे युवासेनेची रॅली, मेळावा**

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.१८ ऑक्टोबर-**

१९९० पासून राजकीय जीवनाला सुरुवात झाली.माझी आमदारकी ही तालुक्याचा दुष्काळी कलंक पुसण्यासाठी व तालुक्याचा विकास करण्यासाठी सार्थकी लावत आहे. विरोधकांनी अनेक वर्ष आमदारकी भोगली. आधी तुम्ही काय केले हे तपासा? मग मी काय केले हे विचारा असा सवाल आ. शहाजीबापू पाटील यांनी व्यक्त केला.युवा सेनेच्यावतीने गुरुवारी आयोजित केलेल्या मोटरसायकल रॅली व मेळाव्याप्रसंगी अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

यावेळी शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी पूर्वेश सरनाईक, राहुल लोंढे, सुभाष इंगवले, विजय शिंदे, दादासाहेब लवटे, दादासाहेब वाघमोडे, अजिंक्य पवार, दीपक दिघे, शंकर दुधाळ यांनी आपल्या मनोगतात येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत आ. शहाजीबापू यांना निवडून आणण्यासाठी युवाशक्ती पुढे आली आहे. एकनाथ शिंदे हे पाच वर्षे मुख्यमंत्री असते तर सांगोला तालुक्याला १० हजार कोटी रुपयांचा निधी बापूंनी आणला असता बापूंच्या नेतृत्वामुळे शिवसेनेला ताकद मिळाली आहे.२३ नोव्हेंबरच्या मतमोजणीत बापू हे आमदार होतील पुढे नामदार होतील यासाठी सर्वांनी ताकद व शक्ती पणाला लावूया. ३५ वर्षात आ.शहाजीबापू पाटील यांनी कुटुंबाकडे लक्ष दिले नाही परंतु सांगोल्याच्या विकासाकडे लक्ष दिले असे मत व्यक्त केले. या कार्यक्रमासाठी माजी नगराध्यक्ष रफिकभाई नदाफ यांच्यासह शिवसेना व युवासेनेचे पदाधिकारी किरण साळी, सागरदादा पाटील, प्रा. संजय देशमुख, दिग्विजयदादा पाटील, अभिजीत नलवडे, शिवाजी घेरडे, जगदीश पाटील, दीपक खटकाळे, माऊली तेली, समीर पाटील, दीपक ऐवळे, छोटू दौंडे, महेश साठे, अमोल शिंदे, महेश चिवटे, बालाजी बागल, नाना मोरे, प्रियांका परंडे, स्नेहा चवरे, आनंद घोंगडे, सुनील पाटील यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### मी दमणारा नेता नाही

माझे राजकारण हे जनतेच्या जीवावर आहे.मागच्या निवडणुकीला दीपकआबा साळुंखे पाटील यांनी शेवटच्या क्षणाला साथ दिली. विरोधक म्हणतात बापू दमले, पण मी दमणारा नेता नाही. स्व.गणपतराव देशमुख यांच्या विरोधात सात लढाया केलेला माणूस आहे. महाराष्ट्रातील जनतेचे प्रश्न व समस्या दूर करण्यासाठी मुख्यमंत्री १८ तास वेळ देतात. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सरकारमध्ये गेलो नसतो तर तालुक्याच्या विकासासाठी ५ हजार पाचशे कोटी रुपये निधी येऊ शकला नसता. मी तालुक्याचा विकास सोडून एक क्षणभर ही थांबलो नाही.तालुक्यातील प्रत्येक समाजाला प्रामाणिकपणे न्याय दिला आहे. तसेच तालुक्यात टेंभू, म्हैसाळ, उजनी यासह इतर योजनांचे पाणी आणून शेतीच्या सिंचनाचा प्रश्न मार्गी लावला असे आ.पाटील म्हणाले.

### होलार समाजाच्या वतीने आ. पाटील यांचा सत्कार

होलार समाजासाठी आ. शहाजीबापू पाटील यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या माध्यमातून होलार समाज आर्थिक विकास महामंडळ स्थापन करून जीआर समाजाच्या हाती दिला. त्याबद्दल होलार समाजाच्या वतीने आ.पाटील यांचा भव्य असा सत्कार यावेळी करण्यात आला.

## पिलीव येथे भक्तनिवासाच्या कामाला सुरुवात

**● महालक्ष्मी मंदिर परिसरात विविध विकासकामांचे उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १८ ऑक्टोबर-**

माळशिरस तालुक्याचे आराध्य दैवत पिलीव येथील महालक्ष्मी मंदिर परिसर या ठिकाणी भाविक भक्तांना सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात म्हणून आ. राम सातपुते यांच्या विशेष प्रयत्नातून यापूर्वी मंजूर असणाऱ्या भक्तनिवास व पुलाच्या कामाचा शुभारंभ नुकताच करण्यात आला.



महालक्ष्मी मंदिरालगत भक्तनिवास बांधकामासाठी तिरथक्षेत्र विकास आराखड्यातून भक्त निवास बांधकामासाठी ३६ लाख रुपये, पुरुषांच्या शौचालयासाठी १५ लाख रुपये, महिलांच्या शौचालयासाठी १५ लाख रुपये तर भक्त निवास परिसरात पेव्हर ब्लॉक बसविण्यासाठी ३० लाख रुपये तर महालक्ष्मी मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाचे बांधकाम यासाठी १ कोटी रुपयांचा निधी गेल्या सहा महिन्यापूर्वीच यापूर्वीच मंजूर करण्यात आला होता .त्या काम ाचे नुकताच भूमिपूजन व शुभारंभ करण्यात आला. आमदार रामभाऊ सातपुते यांच्या विशेष प्रयत्नातून महालक्ष्मी परिसरातील कामासाठी तब्बल १ कोटी ९६ लाखाचा निधी मंजूर करण्यात आला होता.यामुळे सोलापूर जिल्ह्यासह आसपासच्या जिल्ह्यातून तसेच बाहेरील राज्यातून महालक्ष्मी देवीला येणाऱ्या भाविक भक्तांना चांगल्या सोयीसुविधा मिळणार आहेत.माळशिरस तालुक्यातील सर्वात जुने व लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या महालक्ष्मी मंदिराचा तिरथक्षेत्र विकास आराखड्यात समावेश होऊन या ठिकाणी भाविक भक्तांना सर्व सोयी सुविधा उपलब्ध होणे आवश्यक होते मात्र लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष न दिल्यामुळेच मंदिर परिसराचा गेल्या पन्नास वर्षापासून विकास व सुशोभिकरण झाले नाही. आमदार रामभाऊ सातपुते यांच्या रुपाने पहिला लोकप्रतिनिधी ज्यांनी भरपूर निधी उपलब्ध करुन दिला यामुळे भाविक भक्तांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

## विधानसभेच्या पार्श्वभूमीवर रेकॉर्डवरील गुन्हेगारांची यादी तयार

**● शहर-जिल्ह्यातील आठ हजार गुन्हेगारांवर होणार कारवाई**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ ऑक्टोबर -**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहर व ग्रामीण पोलिसांनी शहर व जिल्ह्यातील रेकॉर्डवरील जवळपास आठ हजार सराईत गुन्हेगारांची पोलिस ठाणेनिहाय यादी तयार केली आहे. या सर्व गुन्हेगारांवर प्रतिबंधात्मक कारवाई, तडीपारी, एमपीडीए यासारखी कारवाई करण्यात येणार आहे.

सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलिसांकडून रेकॉर्डवरील गुन्हेगारांची यादी तयार करण्यात आली असून त्यातील सुमारे ५००० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई, १४० जणांविरुध्द तडीपारी, ४० जणांवर एमपीडीएची कारवाई प्रस्तावीत करण्यात येणार आहे. तसेच सोलापूर शहर पोलिसांनी रेकॉर्डवरील २८०० गुन्हेगारांची यादी तयार केली असून त्यातील २७५० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई, ६० जणांविरुध्द तडीपारी तर ५ जणांविरुध्द एमपीडीएची कारवाई प्रस्तावीत करण्यात येणार आहे. विधानसभा निवडणुकीसाठी २२ ते २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरता येणार आहेत. ३० ऑक्टोबरला अर्जाची छाननी होवून अंतिम उमेदवारांची यादी जाहीर होईल. त्याानंतर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत. त्याा दिवसापासून उमेदवारांना पुढे १८ नोव्हेंबरपर्यंत प्रचार करता येईल. २० नोव्हेंबरला म तदान तर २३ नोव्हेंबरला मतमोजणी होणार आहे. या काळात पोलिसांचे त्यांच्या रेकॉर्डवरील गुन्हेगारांवर लक्ष राहणार आहे. प्रतिबंधात्मक कारवाई करूनही गुन्हा केल्यास पुढे त्यांच्यावर स्थानबद्धतेची किंवा तडीपारीची कारवाई होवू शकते. त्यामुळे सर्वांनी शांतता पाळावी, लोकशाहीचा उत्सव आनंदात साजरा करावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.




निवडणूक काळात सामाजिक शांतता व सुव्यवस्थेला बाधा। होईल, असे कृत्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई होईल. रेकॉर्डवरील गुन्हेगारांच्या प्रत्येक हालचालींवर पोलिसांचे नेहमीच लक्ष असते, पण निवडणूक काळात विशेष लक्ष राहणार आहे.

## क्रांतिवीर वसंत दादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार सोलापूरचे संजय साळुंखे यांना जाहीर

**पंढरपूरचे भूषण, स्वातंत्र्य सैनिक थोर हिंदुत्वनिष्ठ तथा समाजसुधारक क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या नावाने प्रतिवर्षी हा पुरस्कार दिला जातोय**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ ऑक्टोबर-**

महाराष्ट्रातील नामांकित असा क्रांतिवीर वसंतदादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार हा सोलापूरचे समाजसेवक संजय साळुंखे यांना यापूर्वीच जाहीर झाला असून शनिवारी १९ ऑक्टोबर रोजी पंढरपूर येथे एका खास कार्यक्रम ात संतमहात्म्यांच्या उपस्थितीमध्ये संजय साळुंखे यांना तो प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती क्रांतिवीर वसंतदादा बडवे ट्रस्टचे अध्यक्ष अभयसिंह ईचंगावकर यांनी दिली.



इचगावकर यांनी सांगितले की, हिंदू तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून फसवणूक करून त्यांचे आयुष्य बरबाद करण्याचे कुटिलकारस्थान काही धर्मांध शक्ती कडून अलीकडे मोठ्या प्रमाणात होत आहे. त्याविषयी शासनाला व न्यायालयाला पण याचे गांभीर्य जाणवले आहे. अशा प्रकरणात युवतीचे मानसिक समुपदेशन करून हा नाजूक प्रश्न हळुवार पणे सोडवावा लागतो. प्रसंगी अशा वेळी स्वतःच्या जीवावर बेतन्याचे देखील प्रयत्न होतात. मात्र गेली अनेक वर्षे सोलापूर शहर व जिल्ह्यातील अशा अनेक प्रसंगी आपल्या धर्म महिलांना सावध करून त्यांना पुन्हा भ्रममुक्त करून संकटापासून वाचविण्याचे कार्य सोलापूर येथील संजय साळुंखे यांनी केले आहे. ही संख्या शेकडोनी आहे. शेकडो हिंदू कुटुंबाचा त्यांना दुवा मिळाला आहे. ते जिल्हा मजूर संघाचे संचालक म्हणून देखील कार्यरत आहेत. पुरस्कार वितरण कार्यक्रमासाठी शहर हिंदू महासभेचे अध्यक्ष विकास म ोरे, विवेक बेणारे, महेश खिस्ते, ओंकार वाटाणे, महेश क्षीरसागर, गणेश बडवे महाजन आदीं परिश्रम घेत आहेत. या पुरस्कार वितरण सम ारंभास नागरिकांनी मोठ्या संख्येने अवश्य उपस्थित राहावे असे आवाहन क्रांतिवीर वसंत दादा बडवे ट्रस्टचे अध्यक्ष अभयसिंह ईचंगावकर यांनी केले आहे. क्रांतिवीर वसंतदादा बडवे हे भारतीय स्वतंत्र संग्रामातील, हैदराबाद मुक्तिसंग्राम, गोवा लढा आदी लढ्यात सशस्त्र क्रांतिकारक होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या विचाराने प्रेरित होऊन आजन्म हिंदूत्व कार्य त्यांनी स्वीकारले. त्यांच्या जीवनातील अनेक साहसी घटनांन मुळे ते पंढरपूर व महाराष्ट्रातून एक आदर्श बनले होते. प्रसिध्द गायक आणि संगीतकार सुधीर फडके, शिवशाहीर बाबासाहेब पुरंदरे, पुण्याचे गणपतराव नलावडे, भालजी पेंढारकर यांचे ते खास मित्र. १९५६ च्या महापूरातील दादांचे कार्य याबरोबरच हिंदू महासभेचे तसेच हिंदू महिला बचावसाठीच्या दादांच्या कार्याच्या अनेक कथा सांगितल्या जातात. वसंतदादांच्या मृत्यू नंतर त्यांनी आपली सर्व मालमत्ता पंढरपूरात सावरकर पुतळा तयार करण्यासाठी व हिंदुत्ववादी कार्य करण्यासाठी हिंदू महासभेला अर्पण केली. त्यांच्यासारखे धाडसी कार्य करणाऱ्या व्यक्तीला सन्मान देण्यासाठी व प्रोत्साहन म्हणून प्रतिवर्षी क्रांतिवीर वसंतदादा बडवे ट्रस्टच्या वतीने क्रांतिवीर वसंत दादा बडवे हिंदुत्व शौर्य पुरस्कार दिला जातो.

### ● लढाऊ कार्यकर्त्यांस पुरस्कार देण्याची प्रथा

क्रांतिवीर वसंतदादा बडवे यांच्या पुण्यतिथी दिनी त्यांचा पुतळा विराजमान असणाऱ्या येथील रुक्मिणी पटांगण व्हीआयपी गेट समोर शनिवारी (दि.१९ ) सायंकाळी सात वाजता मान्यवर साधू संतांच्या आशीर्वादात हा पुरस्कार साळुंखे यांना दिला जाणार आहे. मानचिन्ह, मानाचा हार, शाल, श्रीफळ आणि कुंडलिनी कृपानांकित भगवा ध्वज व रोख अकरा सहस्त्र रुपये मात्र अशा स्वरूपाचा हा पुरस्कार असून प्रतिवर्षी एका लढाऊ कार्यकर्त्यास हा दिला जातो.

### ● यापूर्वीचे पुरस्काराचे मानकरी

यापूर्वी हा पुरस्कार मिलिंद एकबोटे, शिवशंकर स्वामी गोरक्षक, सनातनचे अभय वर्तक, अँड.पुनळकर, धुळ्याचे हिरामण गवळी, मिरजचे सूर्यवंशी, थोर कलाकार शरदजी पोंक्षे, हिंदू राष्ट्र सेनेचे धनंजय भाई देसाई, श्रीराम सेना कर्नाटकचे प्रमोद मुतालिक, थोर साहित्यिक एस. एल. भैरप्पा आदी मान्यवरांना देण्यात आलेले आहेत.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## छबिना जोगवा विधी उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ ऑक्टोबर -**

तुळजाभवानीचा अश्विनी पौर्णिमेचा रात्री छबिना काढण्यात आल्यानंतर महंत तुकोजीबुवांनी गुरुवारी (दि१७) रात्रो जोगवा मागितल्यानंतर गेली पंधरा दिवसापासुन सुरु असलेल्या मंगलमय सोहळ्याचा समारोप झाला.



या शारदीय नवरात्र उत्सव सोहळ्याचा सांगता झाला. तुळजाभवानी मंदिरात गुरुवारी रात्री आठ वाजता सोलापूरच्या मानाच्या काठ्यांसह छबिना मिरवणूक काढण्यात आली. नंतर तुळजाभवानीचे महंत तुकोजीबुवा यांनी अश्विनी पौर्णिमे दिनी आपल्या उपरण्यात जोगवा मागितला.

यावेळी जिल्हाअधिकारी डॉ. सचिन, ओम्बासे तहसिलदार तथा व्यवस्थापक प्रशासन माया माने सह प्रक्षाळ पुजेचे सेवेकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## संक्षिप्त वृत्त...



### सचिन पाटील यांची सदस्यपदी नियुक्ती

**येरमाळा, दि.१८ ऑक्टोबर -**

विद्यानिकेतन विद्यालयाचे संस्थापक सचिन पाटील यांची विभागीय शिक्षण मंडळ लातूर विभाग व्यवस्थापन समिती सदस्य पदी निवड झाली आहे. विभागीय माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ लातूर यांच्या कार्यकारणी समितीवर अशासकीय सदस्याचे नामनिर्देशन करण्यात आले. हे नामनिर्देशन लातूर विभागीय मंडळाच्या कार्यकारी समितीच्या रिक्त पदावर मंत्री, शालेय शिक्षण यांनी केलेल्या शिफारशीने नामनिर्देशनाने अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये व्यवस्थापन समिती सदस्यपदी (कनिष्ठ महाविद्यालय) येरमाळ्याचे सचिन दत्तात्रय पाटील संस्थापक विद्यानिकेतन माध्यमिक व जुनियर कॉलेज यांची व्यवस्थापन समिती कनिष्ठ महाविद्यालय सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली. शैक्षणिक क्षेत्रात सचिन पाटील यांचे योगदान चांगले आहे. त्यांच्या निवडीमुळे परिसरातील गावच्या पालकांतुन सचिन पाटील यांचे अभिनंदन होत आहे.

### १९ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघाची सोमवारी निवड चाचणी

**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या वतीने घेण्यात येणाऱ्या आंतरजिल्हा इन्वीटेशन क्रिकेट स्पर्धा-२०२४



करिता १९ वर्षाखालील राज्य संघ निवडीसाठी धाराशिव जिल्ह्याच्या १९ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघाची निवड चाचणी सोमवार, दि.२१ ऑक्टोंबर रोजी सकाळी १० वाजता येरमाळा-बार्शी रोडवरील सहारा क्रिकेट मैदान शिराळा येथे होणार आहे. निवड चाचणीकरिता जन्म तारखेचा दाखला, अपडेट केलेले आधारकार्ड, खेळाचे संपूर्ण किटसह हजर रहावे. निवड चाचणीकरिता ५०० रुपये शुल्क ठेवण्यात आलेले आहे. जास्तीत जास्त खेळाडूंनी या निवड चाचणीसाठी सहभाग नोंदवावा असे आवाहन धाराशिव जिल्हा क्रिकेट असोसिएशन धाराशिवचे अध्यक्ष विजय दंडनाईक व सचिव दत्ता बंडगर यांनी केले आहे.



### नवरात्र महोत्सवाची छबिण्याने सांगता

**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**

शहरातील ठाकरेनगर नवरात्र महोत्सव मंडळाच्यावतीने गुरुवार दि.३ ऑक्टोबर रोजी श्रीक्षेत्र येरमाळा येथील श्री येडेश्वरी मंदिरातून भवानी ज्योत आणून देवी मातेची प्रतिष्ठापना करण्यात आली होती. या दरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करीत नारीशक्तीचा सन्मान करण्यात आला. दि.१७ ऑक्टोबर रोजी भव्य छबीना मिरवणुकीने या महोत्सवाची सांगता अतिशय आनंदी, उत्साही व भक्तिमय वातावरणात गुरुवार दि.१७ ऑक्टोबर रोजी रात्री करण्यात आली.

## धाराशिव विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादीला सोडावा



### आमदार विक्रम काळे यांची मागणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**

धाराशिव-कळंब विधानसभा मतदारसंघात २०१९ च्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला दुसऱ्या क्रमांकाची मते मिळाली असल्यामुळे या मतदारसंघावर राष्ट्रवादी काँग्रेसचा दावा आमदार विक्रम काळे यांनी केला आहे.

तसेच या मतदारसंघातून आपण निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याची माहिती ही त्यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या पत्रकार परिषदेला राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे, शहराध्यक्ष सचिन तावडे, नंदकुमार गवारे, अतुल जगताप, मनोज मुदगल, खलील पठाण, सुहास मेटे, बालाजी शिंदे, राजाभाऊ जानराव आर्दीची याप्रसंगी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार विक्रम काळे पुढे म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला धाराशिव विधानसभा मतदार संघ सोडण्यासंदर्भात जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा ठराव पाठवला असून आपण जरी शिक्षक आमदार असलो तरीही अनेक प्रश्नांवर आपण मागील अनेक वर्षांपासून लढत आहोत राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीने स्थानिक उमेदवारालाच प्राधान्य द्यावे आपण जिल्ह्यातील आणि विशेषतः या मतदारसंघातीलच रहिवासी असल्यामुळे आपल्याला या भागात काम करायचे आहे.

त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आपण पक्षश्रेष्ठींना उमेदवारी देऊन या मतदारसंघाचा विकास करण्याची संधी देण्याची विनंती केली असल्याचेही ते यावेळी आमदार विक्रम काळे यावेळी म्हणाले.

## निवडणुकीसाठी मी इच्छूक असून मला आ. काळे यांनी मदत करावी : सुरेश पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**

माहितीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर धाराशिव विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी मी इच्छूक आहे. मागच्या निवडणुकीसाठी आ. विक्रम काळे यांच्या प्रचाराचे काम केले आहे. तसेच लोकसभेमध्ये महायुतीच्या उमेदवार असलेल्या अर्चना पाटील यांच्या देखील प्रचारासाठी वेगवेगळ्या ठिकाणी ७० सभा घेतलेले आहेत. या निवडणुकीमध्ये धाराशिव विधानसभा निवडणुकीसाठी महायुतीच्या माध्यमातून राष्ट्रवादी काँग्रेसच्या तिकिटावर निवडणूक लढविण्यासाठी मी इच्छूक आहे. यासंदर्भात पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे या मतदारसंघाच्या उमेदवारीचा दावा देखील केला असून विजय निश्चित आहे. त्यामुळे आमदार विक्रम काळे यांनी मला पाठिंबा देऊन सहकार्य करावे, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस सुरेश पाटील यांनी दि.१८ ऑक्टोबर रोजी केले.



धाराशिव विधानसभा मतदारसंघातून मी निवडणूक लढणार असल्याचे आमदार विक्रम काळे यांनी सांगितल्यानंतर माझ्यासह जिल्हाध्यक्ष महेंद्र धुरगुडे व प्रदेश उपाध्यक्ष सुरेश बिराजदार तिघेजण आ. काळे यांच्या घरी जाऊन त्यांना तुम्ही निवडणूक लढू नये असे सांगितले. तर आ काळे यांचा असा जनसंपर्क नसल्यामुळे त्यांनी विधानसभेची निवडणूक न लढविता मला पाठिंबा देऊन सहकार्य करावे, असे आवाहन पाटील यांनी केले.

## भाजप ओबीसी मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी सोनटक्के

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**

भारतीय जनता पक्षाच्या ओबीसी मोर्चा प्रदेश उपाध्यक्षपदी भाजपाचे माजी तालुकाध्यक्ष दत्ता सोनटक्के यांची निवड करण्यात आली आहे.

भारतीय जनता पक्षामध्ये काम करून पक्षाची धोरणे सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी यांनी काम केले आहे. त्याच्या कामाची दखल घेऊन उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोनटक्के यांची भारतीय जनता पार्टीच्या ओबीसी मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षपदी निवड केली आहे. या निवडीचे नियुक्ती पत्र प्रदेशाध्यक्ष संजय गाते यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी आ राणादादा पाटील, सुजितसिंह ठाकूर, जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य उपस्थित होते.

## तुळजापूर विधानसभा मतदार संघ महाविकास आघाडीकडुन उमेदवारीबाबत उत्सूकता!

### काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट), शिवसेना (उबाठा), तिन्ही पक्षाचा दावा!

### इच्छुक दोन महिन्यापासुन मतदारांच्या दारात....!

**तभा वृत्तसेवा / सतिश फत्तेपुरे**
**तुळजापूर, दि.१८ ऑक्टोबर -**

तुळजापूर विधानसभा मतदार संघा बाबतीत निर्णय महाविकास आघाडी समन्वय समिती घेईल असे वक्तव्य काँग्रेसचे नेते अमित देशमुख यांनी शनिवारी महानवमी दिनी श्री तुळजाभवानी दर्शनार्थ आले असता दिल्याने या वक्तव्या मागे काय अर्थ दडलय याचा उत्सुकता निर्माण झाली आहे. यामुळे ही जागा कुणाकडे जाणार कोन उमेदवार असणार या बाबतीत आता प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे.

तुळजापूर विधानसभा मतदार संघ तसा काँग्रेसचा बालेकिल्ला पण मागील निवडणुकीत ही जागा काँग्रेसकडुन भाजपकडे गेल्यामुळे व लोकसभेत येथुन शिवसेनेला ५२ हजारची लीड मिळाल्याने व शरद पवार ही जागा आपल्या घेण्यासाठी तयारीत असल्याने या विधानसभा निवडणुक बाबतीत महाविकास आघाडीतील पक्ष व उमेदवार बाबतीत प्रचंड अनिश्चितता वाढली आहे. सध्या महाविकास आघाडी तील तिन्ही घटक पक्षांनी आपआपल्या वरिष्ट नेत्यांकडे जागे बाबतीत आग्रही मागणी केली आहे. तिन्ही पक्षात इच्छुक संख्या मोठी असुन त्यांनी मागील काही महिन्यापासुन मतदारांमध्ये जावुन प्रचार ही सुरु केला आहे. तिन्ही घटक पक्षातील इच्छुक जागा आमच्याकडे राहणार व वरिष्टांनी कामाला लागा अशा सुचना दिल्याने आम्ही प्रचार करीत आहोत. त्यामुळे तुळजापूर विधानसभा मतदार संघा महाविकास कडे कुणाचा वाटेला जाणार कुणाला उमेदवारी मिळणार या बाबतीत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. काँग्रेस नंतर ही जागा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) कडे जाणार असल्याची चर्चा सध्या वेगाने होत आहे.

पुण्यातील एक उधोगपती हाती तुतारी घेणार असुन त्याचा एकमेव्य जावयाला ही जागा दिली जाणार असल्याची चर्चा राजकिय पटलावर चर्चली जात आहे. पुणे येथील उद्योजक प्रवेशानंतर मात्र येथील जागे बाबतीत मोठी राजकिय घडामोड घडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या या जावयाचे भाजप मधील समर्थक भाजप संबधितांचा ग्रुपवर जिथे किंमत नाही तिथे थांबायचे नसते, आपण संयमी आहोत, म्हणून आपली दखल घेत नाही. यासह अनेक नाराजीचा पोस्ट अचानक पडणे सुरु झाल्याने विधानसभा मतदार संघात मोठी राजकिय घडामोड शक्यता वर्तवली जात आहे

एकंदरीत तुळजापूर विधानसभा मतदार संघ पक्ष उमेदवार निवडीबाबतीत शरद पवारांची भूमिका महत्त्वाची असणार असल्याची चर्चा महाविकास आघाडीतील नेते मंडळीत चर्चिली जात आहे.

## मुकबधिर शाळेतील २५ विद्यार्थ्यांना दिवाळीनिमित्त कपड्यांचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ ऑक्टोबर -**


युनिटी मल्टीकॉन्स कंपनीचे कार्यकारी संचालक कफिल मौलवी यांच्या वाढदिवसा निमित्त दि.१७ ऑक्टोबर रोजी नळदुर्ग येथे चैतन्य मुक बधिर शाळेतील २५ विद्यार्थ्यांना दिवाळीसाठी नवीन कपड्यांचे वाटप करण्यात आले.

प्रसिद्ध उद्योगपती आणि युनिटी मल्टीकॉन्स कंपनीचे कार्यकारी संचालक कफिल मौलवी यांचा वाढदिवस दि.१७ ऑक्टोबर रोजी नळदुर्ग येथे युनिटीच्या वतीने साजरा करण्यात आला.

यावेळी चैतन्य मुकबधिर शाळेतील २५ विद्यार्थी आणि विद्यार्थीनीना दिवाळी साठी भेट म्हणुन नवीन कपड्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी सर्व मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहण्यासारखा होता.

या कार्यक्रमास पत्रकार विलास येडगे, माजी नगरसेवक सुधीर हजारे, डॉ. आंबेडकर इंग्लिश स्कुलचे अध्यक्ष मारुती खारवे, भाजपाचे माजी शहराध्यक्ष पद्माकर घोडके, जेष्ठ नागरीक बंडप्पा कसेकर, सामाजिक कार्यकर्ते अमर भाळे, पत्रकार उत्तम बनजगोळे, दिशा पतसंस्थेचे व्यवस्थापक उमेश जाधव युनिटी मल्टीकॉन्स कंपानीचे व्यवस्थापक जुबेर काझी, जनसंपर्क अधिकारी विनायक अहंकारी, प्रदीप गायकवाड आदीजण उपस्थित होते.

## राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत सृष्टी जामदाडेला सिल्वर पदक




**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१८ ऑक्टोबर -**

येथील ज्ञानोद्योग विद्यालयातीची कुस्तीपटु विद्यार्थीनी सृष्टी जामदाडे हिने नगर जिल्ह्यातील पाथर्डी येथे झालेल्या राज्यस्तरीय फ्रिस्टाईल कुस्तीस्पर्धेत उपविजेते पद पटकावून राज्यस्तरीय कुस्तीस्पर्धेत सिल्वर पदक पटकावले. तिची लातुर येथील विभागीय स्पर्धेतून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली होती.

धाराशिव येथील झालेल्या जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत तीची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली होती. येरमाळा येथील ज्ञानोद्योग माध्यमिक, उच्च माध्यमिक विद्यालयातील बारावीत शिकत असलेल्या सृष्टी जामदाडे हीने १९ वर्षाखालील वयोगटातील ६२ किलो वजन गटामध्ये कुस्तीत प्रथम क्रमांक मिळवून ती विभागीय स्पर्धे साठी पात्र ठरली होती. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद अहिल्यानगर व अहमदनगर जिल्हा कुस्ती संघ आणि बाबूजी आव्हाड महाविद्यालय पाथर्डी जिल्हा अहिल्यानगर यांच्या विद्यमानाने आयोजित ता.१५ झालेल्या राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा २०२४-२५ फ्रीस्टाइल महिला कुस्ती स्पर्धेत ज्ञानोद्योग विद्यालय येरमाळा विद्यार्थ्यांनी, श्री येडेश्वरी स्पोर्ट्स क्लबच्या सृष्टी जमदाडे हिने १९ वर्षाखालील ६२ किलो वजन गटात सिल्वर मेडल मिळवले.

स्पर्धेत अंतिम फेरीत झालेल्या कोल्हापूरच्या अपेक्षा पाटील हिच्या सोबत ती पराभूत झाल्याने उपविजेत्या सिल्व्हर पदाची मानकरी ठरली.

## रोजगार निर्मिती कार्यशाळेस प्रारंभ

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ ऑक्टोबर -**

श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मशी, महिंद्रा प्राईड क्लासरूम व नांदी फाऊंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि.१४ ऑक्टोबरपासून येथील श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मशीमध्ये रोजगार निर्मिती कार्यशाळेस मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे.

औषधी निर्माण शास्त्राचे शिक्षण घेणाऱ्या मुलीना नौकरीची व स्वयं रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी यासाठी मुंबई येथील महिंद्रा प्राईड क्लासरूम, नांदी फाऊंडेशन व श्रमजीवी कॉलेज ऑफ फार्मसीच्या संयुक्त विद्यमाने १४ ऑक्टोबर ते १९ ऑक्टोबर या कालावधी दरम्यान खास औषध निर्माण शास्त्र विभागात शिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी रोजगार निर्मिती कार्यशाळा घेण्यात येत आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर यांच्या हस्ते करण्यात आले. उपप्राचार्या ज्योति आरसुडे-पेठकर मुंबई येथील नांदी फाऊंडेशनच्या अपूर्वा ओक यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यशाळेत रोजगार निर्मिती कौशल्य, संवाद-संभाषण कौशल्य, मुलाखत कौशल्य, आत्मविश्वास दृढीकरण, रोजगार निर्मिती समोरील अवाहने, व्यक्तीमत्व विकास, रोजगार निर्मितीची ठिकाणे, सादरीकरण या विविध विषयावर मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जीवनात यशस्वी होण्यासाठी या कार्यशाळेचा मोठया संख्येनि लाभ घेण्याचे अवाहन प्राचार्य डॉ. श्रीराम पेठकर यांनी केले आहे.

## धाराशिव शहरात रस्त्यावरील खड्डयाने घेतला तरुणाचा बळी

### आक्रमक ठाकरे सेनेचा सा.बां विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना घेराव

### एका बळीनंतर सा.बां. विभागाला आली जाग; डागडुजीला सुरुवात





### रस्त्याची दुरवस्था झाल्याची अभियंत्यांकडून कबुली

शिवसैनिकांनी थेट घटनास्थळी आणून खड्डयांमुळे झालेली दुरवस्था निदर्शनास आणून दिल्यानंतर रस्त्याची दुरवस्था झाली असल्याची कबुली सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता चव्हाण यांनी दिली. पावसामुळे खडी वाहून गेल्याने दुरवस्था झाली असल्याचे सांगून खड्डयामुळे तरुणाचा जीव गेल्याच्या घटनेला जबाबदार कोण? याबाबत मात्र भाष्य करणे त्यांनी टाळले.

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ ऑक्टोबर -**

रस्त्यांवरील खड्डयांकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने केलेली डोळेझाक एका तरुणाचा बळी घेऊन गेली आहे. गुरुवारी रात्री साडेअकरा वाजण्याच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज चौक ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक या मार्गावर ही दुर्घटना घडली. ओंकार जाधवर असे मयत तरुणाचे नाव आहे. या घटनेनंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने आक्रमक भूमिका घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना घेराव घालून रस्त्यावरील खड्डयांबाबत जाब विचारुन धारेवर धरले.

रस्त्याची डागडुजी करण्यासाठी कार्यारंभ आदेश निघालेला असताना अधिकार्यांकडून दखल घेतली न गेल्यामुळे एका तरुणाला जीव गमवावा लागला. आणखी किती बळी तुम्ही घेणार आहात? असा सवाल करुन कार्यकारी अभियंत्यावर मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी यावेळी या घटनेनंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने करण्यात आली. एकजणाचा बळी गेल्यानंतर खडबडून जाग आलेल्या सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्काळ रस्त्याच्या डागडुजीला सुरुवात केली आहे. या दुर्घटनेला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना जबाबदार धरत शिवसैनिकांनी घेराव घालून रस्त्यावरील खड्डयांबाबत जाब विचारला. तसेच कार्यकारी अभियंत्यांना दुचाकी वाहनावर बसवून रस्त्यांची झालेली दुरवस्था निदर्शनास आणून दिली. तसेच रस्त्यावरील खड्डे बुजविण्याच्या कामाला प्रत्यक्षात सुरुवात होईपर्यंत कार्यकारी अभियंत्यांना जागेवरुन हलू देणार नाही, असा आक्रमक पवित्रा घेत अभियंत्यांना खड्डयामध्ये बसवून ठेवण्याचा इशारा शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे शहरप्रमुख सोमनाथ गुरव यांनी दिला.

यावेळी माजी शहरप्रमुख प्रवीण कोकाटे, नितीन शेरखाने, बाळासाहेब काकडे, राणा बनसोडे, पंकज पाटील, अमित उंबरे, सह्याद्री राजेनिंबाळकर, गणेश साळुंके, अजिंक्य राजेनिंबाळकर, गणेश राजेनिंबाळकर, सतीश लोंढे, संदीप शिंदे, जगदीश शिंदे, हनुमंत देवकते, गणेश आसलेकर, महेंद्र शिंदे, मुन्ना पाटील, हर्षद ठवरे, संकेत सूर्यवंशी, लक्ष्मण जाधव, मुकेश चौगुले, आश्रुबा मुंडे व इतर शिवसैनिक उपस्थित होते.

## स्वीप अंतर्गत मतदान जनजागृतीसाठी विविध कार्यक्रम



**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१८ ऑक्टोबर -**

वसंतदादा पाटील हायस्कूल संलग्न नेताजी सुभाषचंद्र बोस कनिष्ठ महाविद्यालय लोहारा येथे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने स्वीप अंतर्गत मतदान जनजागृती साठी विविध कार्यक्रम घेण्यात आले. शाळा कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये मोठ्या गटात प्रथम क्रमांक आदटराव निकीता धोंडीराम ११ विज्ञान, द्वितीय क्रमांक मोरे गायत्री किसन ११ विज्ञान, यांनी पटकावला.

लहान गटात रांगोळी स्पर्धेत प्रथम क्रमांक कांबळे अनुष्का तानाजी इयत्ता ९ वी, द्वितीय क्रमांक गोरे कोमल परमेश्वर इयत्ता ८ वी, यांनी पटकावला. दि.१६ ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी लोहारा शहरामध्ये मतदान जनजागृती रॅली काढण्यात आली. यामध्ये मतदान जनजागृतीसाठी विद्यार्थ्यांनी घोषणा दिल्या.

यामध्ये सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी सहभागी झाले होते.

# इच्छुकांची भाऊगर्दी; सोशल मीडिया हाऊसफुल्ल

**यतभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ ऑक्टोबर**

नांदेड- विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगानें नांदेड जिल्ह्यात रजाकीय वातावरण तापत चालले आहे. उमेदवारी जाहीर होण्यापिर्वीच भेटी गाठीवर भर देण्यात येत आहे. परंतु यापेक्षा अधिक जोरदार प्रचार सोशल मिडीयावर सुरु असल्याचे दिसून येत आहे. उमेदवारी निश्चित झाली नसली तरी अनेकजण गुढघ्याला बाशींग बांधून भावी आमदारांची उपमा देत उमेदवारी जाहिर होण्यापुर्वीच निवडून देण्याचे आवाहन करत आहेत.

इच्छूकांच्या सोशल मिडीयावरील या भाऊगर्दीमुळे व्हॉट्स अप, फेसबु आदी समाजमाध्यमे हाऊसफुल झाले आहेत. विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहिर होताच प्रत्येकजण निवडणुक लढविण्यासाठी गुढघ्याला वाशींग बांधून तयार झाला आहे. प्रचारासाठी सोशल मिडीया है परिणामकारक साधन असल्याचे दाखवत अनकांनी उमेदवारी जाहिर होण्यापुर्वीच संबंधीत पक्षाचे निवडणूक चिन्ह, पक्षाच्या नावाखाली समर्थकामार्फत स्वतःला भावी आमदार उपमा देत व्हॅट्सअॅप, फेसबुक व अन्य सोशल मिडीयावर जाहिरातबाजी सुरु केली आहे. मतदारसंघाचा विकास केवळ आपणच करू शकतो हा विश्वास दाखवत शक्ती प्रदर्शनासाठीही सोशल मिडीयाचा वापर करण्यात येत आहे. अनेक इच्छूक उमेदवारांनी फेसबुक, व्हॉट्सअॅड वर निवडणुकीच्या अनुषंगाने नवीन ग्रुप तयार केले असून उमेदवारी जाहिर होण्यापुर्वीच प्रचारही सुरु केला आहे. गत काही

दिवसापासूनच इच्छुकांच्या सोशल मिडीयावरील भाऊगदीमुळे व्हॉट्स अप, फेसबुक आदी हाऊस फुल झाले आहेत. फेसबुक खाते उघडताच शहरातील एखाद्या इच्छूक उमेदवाराची विविध विकासाचे आश्वासन असलेली जाहिरात पहावसास मिळत आहे. तर या जाहिराती संबंधीत इच्छूक उमेदवार समर्थक टॅग करत येत असल्याने सर्व सामान्य नागरिक मात्र वैतागल्याचे दिसून येत आहे.

# किनवट ते माहूर पदयात्रेचे आ.केराम यांच्याकडून जंगी स्वागत

**तभा वृत्तसेवा**
**किनवट,दि. १८ ऑक्टोबर**

श्रीराम पदयात्रा समिती किनवटद्वारा श्री हभपसभ दिनेशगुरु कुलकर्णी महाराज यांच्या किनवट ते माहूर पदयात्रेस १८ ऑक्टोबर रोजी पासून प्रारंभ होताच पहाटे ५ वा. छत्रपती शिवाजी महाराज चौकात आमदार भीमराव केराम यांनी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करत या पदयात्रेचे जंगी स्वागत केले.



श्रीराम पदयात्रा समिती किनवट च्या वतीने संभाजीनगर येथील श्री ह भ प स भ दिनेशगुरु कुलकर्णी यांनी नियोजित किनवट ते दत्तशिखर संस्थान माहूरपर्यंतच्या पदयात्रेस प्रारंभ केला असून १८ ऑक्टोबर २०२४ रोजी रोजी पहाटे ५ वा.श्री संत गजानन महाराज मंदिरातून पदयात्रेस प्रारंभ झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकात आमदार भीमराव केराम यांनी ध्वजारोहण केले व छत्रपतीं शिवरायांच्या प्रतिमेला अभिवादन करून फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करत या पदयात्रेचे जंगी स्वागत केले.

यावेळी आ. केराम यांनी दिनेश गुरु कुलकर्णी महाराज व त्यांच्या समवेत पदयात्रेत सहभागी झालेल्यांना पदयात्रेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. किनवट ते श्रीक्षेत्र माहूर पदयात्रेचे हे चौथे वर्ष असून या पदयात्रेत किनवट तालुक्यातील भाविक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

## संक्षिप्त वृत्त



### विजयादशमीनिमित्त राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सघोष पथसंचलन व शस्त्र पूजन

**बिलोली**-विजयादशमीनिमित्त बिलोली शहरात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सघोष पथसंचलन व शस्त्र पूजन संपन्न झाले बिलोली शहर येथिल महाशक्तीशाली दुर्गा माता मंदिर लघुळ रोड बिलोली येथून संचलन सुरु होऊन शहरातील मुख्य मार्गावरुन चालत जाऊन बागेतील हनुमान मंदीर येथे विजयादशमी उत्सव संपन्न झाला. या संचलनात तालुक्यातील स्वयंसेवक मोठ्या संख्येने गणवेशात सहभागी झाले. संचलनाच्या मार्गावर नागरिकांनी फुल टाकून स्वागत केले. या उत्सवास तालुका संघचालक विश्वनाथअण्णा दाचावर, अॅड. मनोज आरलीकर, संघ पूर्व प्रचारक राजेश कोंडिबा मेहत्रे यांनी मार्गदर्शन केले. डॉ. केशव बळीराम हेडगेवार आणि त्यांच्या १७ सहकाऱ्यांनी १९२५ च्या विजयादशमीला नागपुरातील महाल भागात या संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. शिस्तबद्धता आणि सेवाकार्यासाठी जगभर ओळखल्या जाणाऱ्या या संघटनेकडे मार्च २०२४ च्या प्रतिनिधी सभेनुसार - राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ९२२ जिल्ह्यांमधील ६५९७ खंड आणि २७,७२० मंडळांमध्ये ७३,११७ दैनिक शाखा आहेत. प्रत्येक मंडळात १२ ते १५ गावांचा समावेश आहे. समाजाच्या प्रत्येक क्षेत्रातून संघाच्या प्रेरणेने विविध संघटना कार्यरत आहेत, ज्या राष्ट्र उभारणीत आणि हिंदू समाजाला संघटित करण्यात योगदान देत असुन भारत मातेला परम वैभवापर्यंत घेऊन जाण्यासाठी हिंदु समाजाने संघटित झाले पाहिजे असे आवाहन यावेळी करण्यात आले.

### रब्बी हंगामातील पिकांसाठी १५ नोव्हेंबरपर्यत पाणी अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड**-शंकररावजी चव्हाण विष्णुपुरी प्रकल्पाच्या धरणामध्ये उपलब्ध पाणीसाठा विचारात घेता चालू रब्बी हंगाम सन २०२४-२५ मध्ये अटीच्या अधीन राहून नमुना नंबर ७ वर पाणी अर्ज पुरवठा करण्यात येणार आहे. ज्या लाभधारकांना रब्बी हंगामात नमुना नं. ७ वर भुसार पिके, चारा पिके इत्यादी पिकांना पाणी घ्यावयाचे आहे, त्यांनी आपले नमुना नंबर ७ चे पाणी अर्ज जवळच्या शाखा कार्यालयात १५ नोव्हेंबर २०२४ पर्यत आवश्यक त्या कागदपत्रासह भरुन द्यावेत. मुदतीनंतर येणारे अर्ज स्विकारले जाणार नाहीत, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग उत्तरचे कार्यकारी अभियंता यांनी केले आहे. रब्बी हंगामी पिकांसाठी कालव्याचे प्रवाही/मंजूर उपसा सिंचनासाठी ज्यांना पाणी घ्यावयाचे आहे त्यांनी आपले पाणी मागणी अर्ज विहित नमुन्यात १५ नोव्हेंबर २०२४ पूर्वी संबंधित शाखा कार्यालयात माहिती भरुन सादर करावेत. मुदतीनंतर आलेले पाणी अर्ज स्विकारले जाणार नाहीत. पाणी अर्ज दिला म्हणजे परवानगी मिळाली असे गृहीत धरु नये याची नोंद घेण्यात यावी. नमुना नं. ७ चे कोरे पाणी मागणी अर्ज शाखेत विनामुल्य उपलब्ध आहेत. पिकाचे मागणी क्षेत्र २० आर च्या पटीत असावे. कालवा संचलन कार्यक्रमानुसारच पाणी घेणे बंधनकारक राहील. पाणीपट्टी न भरणाऱ्या व पाणी अर्ज नामंजूर असलेल्या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे कार्यालयास बंधनकारक राहणार नाही. काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा करणे शक्य न झाल्यास होणाऱ्या नुकसानीस कार्यालय जबाबदार असणार नाही. लाभधारकांनी दिवस व रात्रीच्या वेळेस पाणी घेणे बंधनकारक आहे. रात्रीच्या वेळेस पाणी न घेतल्यामूळे पाणी नदीनाल्यास वाया जावून ठराविक मुदतीत पाणी न मिळाल्यास कार्यालय जबाबदार राहणार नाही. शासन निर्णयात नमूद दरानुसार सन २०२४-२५ साठीचे पाणीपट्टीचे दर आकारण्यात येतील. थकीत व चालू पाणीपट्टी वेळेत भरणे आवश्यक आहे. पाणी पाळी सुरु असताना जबरदस्तीने अथवा विनापरवानगी विद्युत मोटारी, ट्रॅक्टरद्वारे पाणी उपसा करणे अथवा गेट उघडल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. जे लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करण्यात आले आहे त्या लाभक्षेत्रावर नियमानुसार पाणी मागणी, वसुली आणि सिंचनाचे नियंत्रण पाणी वापर संस्थेने करावे अन्यथा पाणी पुरवठा केला जाणार नाही असे पाटबंधारे विभागाने कळविले आहे.

# सहशिक्षक राधाजी कौठकर यांचा आज सेवापूर्ती सोहळा

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील मौजे खतगांव येथील सौ.मंजुळाबाई माध्यमिक विद्यालयातील कार्यरत मराठी विषयाचे सहशिक्षक कौठकर राधाजी ब्रह्मानंद हे नियत वयोमानानुसार आज दि.१९ ऑक्टोबर रोजी ३१ वर्ष ४ महिने सेवा देऊन सेवानिवृत्त होत आहेत. त्यांचा सेवापूर्ती सोहळा खतगांव संस्थेत सकाळी ११:३० वाजता होणार आहे. सहशिक्षक कौठकर राधाजी हे मूळचे शेवाळा,ता. देगलूर येथील रहिवासी आहेत.

# राज्यस्तरीय शालेय स्पोर्टडान्स स्पर्धेसाठी क्रीडा विभागाची तयारी

## जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या अध्यक्षतेखाली बैठक

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ ऑक्टोबर**

राज्यस्तरीय राष्ट्रीय क्रीडा स्पर्धे साठी जिल्हा क्रीडा कार्यालयामार्फत नुकतीच पूर्वतयारीची बैठक जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली. या वेळी वेळेत व नियमानुसार सर्व स्पर्धांचे आयोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी दिले.

आयुक्त क्रीडा विभाग सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्यावतीने व जिल्हा क्रीडा परिषद नांदेड अंतर्गत सन २०२४-२५ मधील स्पोर्टडान्स क्रीडा स्पर्धा आयोजन व नियोजना संदर्भात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सन २०२४- २५ मधील राज्यस्तरीय क्रीडा राज्यस्तरीय खेळ स्पोर्टडान्स तसेच इतर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा वयोगट १९ वर्षे मुले मुली स्पर्धेचे आयोजन करण्याची जबाबदारी नांदेड जिल्ह्याकडे आहे. त्याअनुषंगाने या स्पर्धेमध्ये स्पोर्ट्स डान्स कामाचा आढावा घेण्यात आला. राज्यस्तरीय स्पोर्ट डान्स संदर्भात स्पर्धेमध्ये १ (क्लासिकल डान्स) शास्त्रीय नृत्य, २ (फोक डान्स) लोकनृत्य, ३ (वेस्टर्न डान्स) पाशात्य नृत्य, ४ (हिप हॉप), ५ (बॅटल) या नृत्य प्रकारांचा स्पोर्टडांस स्पर्धेत समावेश आहे. तसेच विविध स्तरावर या स्पर्धा होणार आहेत. तरी नांदेड जिल्ह्यातील सर्व तालुका व शहरातील शाळांनी जास्तीत जास्त सहभाग नोंदवावा व स्पर्धकांना विद्यार्थी मुले व मुलींना शाळेमार्फत संधी उपलब्ध करावी असे निर्देश देण्यात आले. या बैठकीस कृषी उपसंचालक एच. एम. नागरगोजे, उपशिक्षणाधिकारी माध्यमिक रामचंद्र पाचंगे, जिल्हा समन्वयक शिक्षण विभाग प्राथमिक डॉ. डी. टी शिरसाट, जिल्हा युवा अधिकारी नेहरू युवा केंद्र चंदा रावळकर, संचालक, राष्ट्रीयसेवा विभागाचे समन्वयक डॉ. मल्लिकार्जुन काराजगी, जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे , क्रीडा अधिकारी संजय बेतीवार, राहुल श्रीरामवार, बालाजी शिरसीकर, राज्य क्रीडा मार्गदर्शक बाळासाहेब डोंगरे व विविध खेळ संघटनेचे पदाधिकारी वर्षा पाटील जोगदंड, बालाजी जोगदंड, विष्णु शिंदे, आनंदा कांबळे उपस्थित होते.

हे आदेश १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी अंमलात आला असून हे आदेश २५ नोव्हेंबर, २०२४ पर्यंत अंमलात राहतील.

# पाच वर्षाच्या मुलीवर नराधमाने केला बलात्कार;आरोपी अटक

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. १८ ऑक्टोबर**

सोनखेड येथून जवळच असलेल्या दापशेड येथे एका पाच वर्षाच्या मुलीवर बलात्कार केल्याच्या घटनेने गाव हादरले असून पोलिसांनी नराधमाच्या तात्काळ मुसक्या आवळल्या. सदरील घटनेने पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.


दापशेड येथील उमेश रावसाहेब टोणगे या वीस वर्षाच्या नराधमने गावातील एका पाच वर्षिय चिमुकलीवर बलात्कार केल्याची घटना दि १७ ऑक्टोबर रोजी ११ ते दिड च्या दरम्यान घडली. पीडित मुलीच्या आईस समजताच घडलेला सर्व प्रकार नातेवाईकांना सांगितल्यावर सर्वांनी सोनखेड पोलीस ठाण्यात धाव घेतली. पीडित मुलीच्या आईच्या फिर्यादीवरून उमेश रावसाहेब टोणगे वय २० याला अटक करून त्याच्यावर भारतीय न्याय संहिता कलम ६४ (क्ष), ६५ (२) व सह कलम ४, ६, १२, बाल लैंगिक अत्याचार कायदा २०१२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक वैशाली कांबळे या करीत आहेत.

# 'मुख्यमंत्री माझी शुळा सुंदर शाळा' स्पर्धेत विष्णुपूरी जि.प. शाळेला विभागातुन प्रथम पारितोषीक

**तभा वृत्तसेवा**
**नविन नांदेड,दि. १८ ऑक्टोबर**

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत नांदेड तालुक्यातील विष्णुपुरी जिल्हा परिषद शाळेने लातूर विभागांत प्रथम क्रमांक पटकावला असुन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, शालेय शिक्षण मंत्री दिपक केसरकर, शिक्षण आयुक्त सुरेश मांढरे, प्रधान सचिव आय.ए. कुंदन यांच्या प्रमुख उपस्थितीत शाळेला २१ लाख रुपये पारितोषक जमशेद भाभा थिएटर नरिमन पॉइंट मुंबई येथे पारितोषक वितरीत करण्यात आले.

माझी शाळा सुंदर शाळा स्पर्धेत जिल्हा परिषद विष्णुपुरी लातूर विभागांतुन स्पर्धेत सहभागी झाली होती. या स्पर्धेत शाळेने दुसऱ्या टप्प्यात अभियानाच्या माध्यमातून पायाभुत सुविधा, शासन अंमलबजावणी, शैक्षणिक गुणवत्ता, विध्यार्थी शैक्षणिक गुणवत्ता विकसीत करण्यासोबतच अध्ययन व अध्यापनात आधुनिक तंत्रज्ञान वापर, पर्यावरण संवर्धन जाणीव,सार्वजनिक व वैयक्तिक स्वच्छता, चांगले आरोग्य, राष्ट्रीय एकात्मता भावना व्दृगिंत करण्यासाठी प्रयत्न, व्यवसाय शिक्षण तोंड ओळख, अंगभूत कला क्रीडा गुणांचा विकास, शासकीय योजना लाभ, इत्यादी घटक व उदिष्ट काम केल्याने हे यश मिळाले.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत १४ ऑक्टोबर रोजी मुंबई येथे पारितोषक वितरण करण्यात आले. २१ लाख रुपये, सन्मान चिन्ह ,सन्मान पत्र पारीतोषीकाचे स्वरूप आहे. शिक्षण अधिकारी प्राथमिक सविता बिरगे, शालेय समिती अध्यक्ष विलास देशमुख, मुख्याध्यापक उज्वला जाधव, पर्यवेक्षक शिवाजी वेदपाठक, माजी जिल्हा परिषद सदस्य साहेबराव हंबर्डे, शंकरराव हंबर्डे, विश्वनाथ हंबर्डे, माणिकराव हंबर्डे, राजेश हंबर्डे व शिक्षक उदय हंबर्डे, कृष्णा बिरादार, डि. के.केद्रे, एम.ए.खदीर, कांचन माला पटवे, चंद्रकला इदलगावे, संतोष देशमुख, अर्चना देशमुख यांनी हा पुरस्कार स्वीकारला. प्रथम विभागीय पारितोषिक मिळाल्या बद्दल नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल करनवाल, शिक्षणाधिकारी माध्यमिक माधव सलगर, शिक्षणाधिकारी योजना बनसोडे, गटविकास अधिकारी अमित राठोड, सहाय्यक गटविकास अधिकारी पांडुरंग नारवटकर, गटशिक्षणाधिकारीनागराजबनसोडे, विस्तार अधिकारी बालाजी शिंदे, ग्रामविकास अधिकारी संजय कानोडे, पोलीस पाटील प्रविण हंबर्डे यांनी अभिनंदन केले आहे.

तसेच नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघ आमदार मोहन हंबर्डे, सरपंच संध्या हंबर्डे, उपसरपंच अर्चना हंबर्डे, ग्रामपंचायत सदस्य, शालेय व्यवस्थापन समिती सर्व सदस्य व शाळेतील शिक्षक व शिक्षेकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# माणिक नगर नायगांव येथे कोजागिरी महोत्सव संपन्न


## भजन सम्राट भोगले यांच्या गायनाने, कवी वर्याच्या काव्य चंद्रमाने रंगत भरली

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. १८ ऑक्टोबर**

कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून नायगांव येथील माणिक नगरातील रुद्र मुखी दुर्गा मंडळाच्या वतीने दि.१६ ऑक्टो रोज बुधवारी रात्री ९ वाजता भजन सम्राट विश्वनाथ भोगले व संस्कृती भेदेकर,कविवर्य चंद्रमाने यांच्या काव्य गायनाने कोजागिरी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

नायगांव येथील माणिक नगरातील रुद्र मुखी दूर्गा मंडळ कमिटीच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी कोजागिरी पौर्णिमेचे औचित्य साधून दिनांक १६ ऑक्टोबर रोज बुधवारी रात्री ९ वा. येथील नगरातील भव्य प्रांगणात प्रसिध्द कलाकार रेडीओस्टार ,भजन सम्राट विश्वनाथ भोगले, संस्कृती भेदेकर, कविवर्य चंद्रमाने यांचे काव्य गायन,व भक्तीसंगीत, लोकसंगीत, पोवाडे भजन संध्याचा कार्यक्रम घेण्यात आला आहे.

या वेळी कार्यक्रमांचे नियोजन व सुत्रसंचलन बाळासाहेब पांडे यांनी केले,स्वर



दिनाची साथ संगीत शिक्षक शंकर बिरादार यांनी केले तर तबला वादनाची साथ नामदेव पांचाळ,यांची लाभली आहे

कोजागिरी पौर्णिमेच्या आयोजित केलेल्या कार्यक्रमात चंद्र पुनवेचा या अंतर्गत गायिका कुमारी.संस्कृती भेदेकर,वैष्णवी सांगवे, माधव भेदेकर शंकर बिरादार सर सह या कलावंतांनी एकापेक्षा एक सरस अशी बहारदार सुगम गीते,गझल,भक्ति गीतांचे सादरी करण करण्यात आले.ढोलकीची साथ चिरंजीव विवेक भोगले यांनी दिली. तर महाराष्ट्रराज्याने तुर्तास मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाल्याच्या प्रित्यार्थ मराठ कवीचा काव्यचंद्रमा चा गौरव कार्यक्रम घेण्यात आला तर कविवर्य ज्ञानेश्वर शिंदे, बालाजी पेटेकर सर,वेंकट आणेराये ,भा.ग.मोरे, व अन्य कवि मंडळीच्या या वेळी कविता सादर करण्यात आल्या.

या वेळी च्या कोजागिरी महोत्सव हा माणिक नगर नायगांव येथील प्रतिष्ठित नागरिक, रुद्र मुखी दुर्गा महोत्सव समिती व युवा माणिक मोती मित्रमंडळ माणिक नगर नायगाव बाजार यांनी परिश्रम घेऊन हा महोत्सव यशस्वी केला. तद्नंतर दुधाच्या प्रसादाच महिला प्रतिनिधी यांच्या हस्ते पूजन व आरती करून प्रसाद वाटप करून कार्यक्रमाची सांगता ही विश्वनाथ भोगले यांनी गायीलेल्या गोंधळाने करण्यात आली.

# लोकनेते चिखलीकर यांच्या जीवास धोका करण्याची भाषा करणाऱ्या शरद कोळीला बेड्या ठोका : साहेबराव गायकवाड

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ ऑक्टोबर**

जिल्ह्यातील कणखर राजकीय नेतृत्व तथा माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या बद्दल अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत त्यांच्या जीवितास धोका करण्याची भाषा करणाऱ्या शिवसेनेचा उपनेता शरद कोळी याला तात्काळ अटक करा अशी मागणी भाजपाचे नांदेड जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांनी आज पोलीस अधीक्षकांकडे केली आहे . नांदेड जिल्ह्यातील स्वाभिमानी आणि स्वकर्तुत्वावर जनसामान्यांच्या मनात कायम रुजलेली नेतृत्व म्हणून माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्याकडे पाहिले जाते. तळागळातील आणि शेवटच्या घटकातील प्रत्येकाला न्याय मिळवून देण्यासाठी माजी खासदार चिखलीकर यांनी मोठी भूमिका बजावली आहे. त्यामुळे त्यांच्या लोकप्रियतेत प्रचंड वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत ते पुन्हा एकदा लोहा - कंधार विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढणार आहेत. या निवडणुकीच्या तयारीमुळे त्यांच्या लोकप्रियता अधिकाधिक वाढ होत असल्याने राजकीय विरोधकांना आता पोटशूळ उठला आहे. त्यामुळे चिखलीकर यांना अश्लील भाषेत शिवीगाळ करणे किंवा त्यांच्या जीवितास धोका निर्माण करण्याची भाषा केली जात आहे . याच प्रकारानुसार शिवसेनेचे उपनेते शरद कोळी यांनी नुकतीच एक पत्रकार परिषद घेऊन चिखलीकर यांच्या जीवतास धोका आणि इजा पोहोचण्याचे अनुषंगाने धमकी दिली आहे. अश्लील भाषेत शिवीगाळ केली होती. सदर पत्रकार परिषदेचा व्हिडिओ फेसबुकवर त्यांनी अपलोड केला होता. याप्रकरणी शरद कोळी याच्याविरुद्ध लोहा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शरद कोळी याच्यावर केवळ गुन्हा दाखल करून भागणार नाही तर त्याला तात्काळ अटक करा अन्यथा नाईलाजाणे आपल्या कार्यालयासमोर आंदोलन करावे लागेल असा इशाराही जिल्हा सरचिटणीस साहेबराव गायकवाड यांनी पोलिस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

# नांदेड उत्तरच्या उमेदवारावरून वंचितमध्ये नाराजी

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ ऑक्टोबर**

वंचित बहुजन आघाडीने नांदेड उत्तर मतदार संघातील उमेदवार जाहीर केला आहे. परंतु या उमेदवारावरून समाजमाध्यमावर नाराजी व्यक्त होत आहे. नांदेड उत्तर मतदारसंघात अन्य पक्षाच्या तुल्यबळ वंचितचा उमेदवार असावा अशी भावना व्यक्त होत आहे. निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच वंचित बहुजन आघाडीने नांदेड दक्षिण व लोहा- कंधार मतदारसंघासाठी उमेदवार जाहीर केले होते. आता नुकतेच नांदेड लोकसभा मतदारसंघातील तीन विधानसभेचे उमेदवार जाहीर केले आहेत. परंतु नांदेड उत्तर मतदारसंघात सक्षम इच्छुकांची संख्या लक्षणीय असतानाही वंचित बहुजन आघाडीने शैक्षणिक क्षेत्रातील उमेदवार पुन्हा दिला आहे. वंचितने दिलेला उमेदवार अनेकांना रुचला नाही. समाजमाध्यमावर या उमेदवाराविषयी तसेच वंचित बहुजन आघाडीने घेतलेल्या निर्णयाविरोधात नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. नांदेड उत्तर मतदार संघातून सर्व बाबींनी सक्षम असलेल्या तसेच दांडगा जनसंपर्क असलेल्या अनेकांनी वंचित बहुजन आघाडीकडे उमेदवारीची मागणी केली होती. नांदेड उत्तर मतदार संघात प्रमुख राजकीय पक्षांचे उमेदवार ठरले नसले तरी वंचितने दिलेल्या उमेदवारामुळे मात्र जनतेमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. तर ही नाराजी सोशल माध्यमावर देखील पसरू लागली आहे.

मागील विधानसभा निवडणुकीत वंचीत बहुजन आघाडीला मते मिळविण्यात यश मिळाले होते. परंतु विजय मात्र मिळवता आला नाही. त्यामुळे पुन्हा तोच प्रकार वंचित बहुजन आघाडीकडून करण्यात आला आहे. त्यामुळे या उमेदवाराचा पुन्हा अप्रत्यक्षरीत्या अन्य उमेदवारांनाच फायदा होणार असल्याचेही बोलल्या जात आहे.

# 'ज्ञानतीर्थ-२०२४' युवक महोत्सवाच्या शोभा यात्रेतून मराठवाड्याच्या कला आणि संस्कृतीचे दर्शन

**तभा वृत्तसेवा**
**नविन नांदेड,दि. १८ ऑक्टोबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्था कॉलेज ऑफ एज्युकेशन विष्णुपुरी नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'ज्ञानतीर्थ-२०२४' आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाच्या दि. १८ ऑक्टोबर रोजी सकाळी शोभा यात्रेस प्रारंभ झाला. या शोभा यात्रेत विविध महाविद्यालयातून सहभागी स्पर्धक कलावंतानी सहभाग घेतला.

या शोभा यात्रेत नांदेड, हिंगोली, परभणी व लातूर जिल्ह्यातील महाविद्यालयाने सहभाग नोंदविला. शोभायात्रेमध्ये मराठवाड्याची लोककला, लोकसंस्कृती, दिंडी, ढोल-ताशांचा गजर, लेझीम पथक या बरोबरच मतदान जनजागृती करीत 'मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो' असा संदेश शोभा यात्रेतून दिला. शोभा यात्रेची सुरुवात विष्णूपुरी गावातील मारुती मंदिरापासून



करण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते झेंडी दाखवून सुरुवात करण्यात आली. यावेळी विद्यापीठाचे प्र.कुलसचिव डॉ. डी. डी. पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. सूर्यकांत जोगदंड, डॉ. डी. एन. मोरे, ईंजि. नारायण चौधरी, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, प्राचार्य डॉ. बालाजी गिरगावकर, प्राचार्य सुनील हंबर्डे, आदींची उपस्थिती होती. शोभायात्रेत वै. धुंडा महाराज देगलूर महाविद्यालयाच्या संघांनी 'पंढरीची दिंडी' देखावा सादर करत टाळ मृदुंगाच्या जय घोषात अभंग सादर केले. तर इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी विष्णुपुरी च्य संघाने 'माळेगाव यात्रेच्या देखाव्यातून माळेगाव दक्षिण भारतातील यात्रेची ओळख शोभा यात्रेतून करून दिली. येळकोट येळकोट जय मल्हारच्या घोषात पारंपारिक वेशभूषा धारण करून गावकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले. पारंपारिक ढोल ताशांच्या गजरात विष्णुपुरी चा परिसर दुमदुमून गेला. जळकोट येथील संभाजी केंद्रे महाविद्यालय संघाने मराठवाड्याची कला आणि संस्कृती देखावा शोभायात्रेतून सादर केला. तर वसरणी येथील वसंतराव नाईक महाविद्यालयाने 'मतदान जनजागृती' करत मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करत लोकशाहीला मजबूत करण्याचे आवाहन केले. शोभा यात्रेचे परीक्षण डॉ. विजया साखरे, डॉ. सुनील व्यवहारे, डॉ. एम. आर. जाधव, डॉ. राजपाल चिखलीकर, डॉ. शिल्पा शेंडगे यांनी केले.

# कंधारमध्ये अनोळखी इसमाविरुद्ध भेटवस्तू वाटल्याचा गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १८ ऑक्टोबर**

१५ ऑक्टोबरला जिल्ह्यामध्ये विधानसभा व लोकसभा पोटनिवडणुकीची आचारसंहिता लागू झाली असताना कंधार शहरात भेटवस्तू वाटप करतानाचे एक छायाचित्र व्हायरल झाले.व्हायरल झालेल्या या छायाचित्रावरून कंधार येथे आचारसंहिता भंग करण्याचा अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंधार येथील संभाजी नगर परिसरात पिकअप व्हॅन क्रमांक नंबर एमएच १४ जीयू ७७५१ मधील अनोळखी इसमाने कंधार येथील संभाजीनगर कंधार येथे आदर्श आचारसंहिता आदेशाचे उल्लंघन करून नागरिकांना भेटवस्तू वाटप करीत असल्याचे फोटो व्हाट्सअपवर व्हायरल झाला. सकाळी साडेआठ ते नऊच्या सुमारास समाज माध्यमावर या संदर्भातील फोटो व्हायरल झाला. त्यानंतर या परिसरात शासनाच्या वतीने फिर्यादीने प्रत्यक्ष भरारी पथकाद्वारे पाहणी केली असता सदर पिकअप व्हॅन आढळून आली नाही. मात्र या संदर्भातील छायाचित्र समाज माध्यमांवर प्रसारित झाल्यानुसार कंधार पोलीस ठाण्यात शासनाच्या वतीने श्री. राम ज्ञानोबा वारकड वय ४० वर्षे व्यवसाय नोकरी कृषी पर्यवेक्षक तालुका कृषी अधिकारी कार्यालय कंधार राहणार संगुचीवाडी तालुका कंधार यांनी दुपारी तीनच्या सुमारास गुन्हा दाखल केला.

CMYK

# लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

## ३ नोव्हेंबरला वीरशैव लिंगायत समाजाचा वधू-वर परिचय मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १८ ऑक्टोबर-**

वीरशैव लिंगायत समाज बांधव लातूरच्या वतीने रविवार, दि.३ नोव्हेंबर रोजी लातुरात राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

प्रतिवर्षी वीरशैव लिंगायत समाजाच्या वतीने लातुरात अशा प्रकारच्या निःशुल्क वधू -वर परिचय मेळाव्याचे आयोजन केले जाते. हा मेळावा वीरशैव समाज सांस्कृतिक भवन, खंडोबा गल्ली, लातूर याठिकाणी दि. ३ नोव्हेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होणार आहे. या मेळाव्यात वीरशैव समाजातील जास्तीत जास्त उप वधू-वरांनी आपली नावे नोंदवून मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन मेळाव्याचे मुख्य संयोजक उमाकांत कोरे, नागेश कानडे, अध्यक्ष अभिषेक चौंडा, कार्याध्यक्ष महादेवप्पा लामतुरे, राजाभाऊ हालकुडे, स्वागताध्यक्ष दिलीप सुल्लाळीकर, सतीश कानडे, कार्यवाहक बालाजी पिंपळे, बाबुराव राचट्टे, संयोजक विजय चितकोटे, शिवानंद जवळे यांसह सर्व पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



## संक्षिप्त वृत्त



### महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या खो-खो संघाला विजेतेपद

**उदगीर, दि. १८ ऑक्टोबर-**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत संजीवनी महाविद्यालय, चापोली येथे आंतर महाविद्यालयीन ब- विभाग खो - खो (पुरुष) स्पर्धा दिनांक १० ऑक्टोंबर, २०२४ रोजी संपन्न झाल्या. या स्पर्धेत महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयाच्या खेळाडूंनी चुरशीचा खेळ दाखवीत संघाने विजेतेपद (प्रथम क्रमांक) पटकाविला आहे. विजेत्या संघामध्ये संतोष मोतीपवळे, शुभम शिगवण, संकेत सुपेकर, कौशिक जोईल, शुभम मोतीपवळे, सचिन जाधव, सचिन चव्हाण, किरण चव्हाण, अशोक राठोड, अंशुमन गायकवाड, मनोज भंडे, मल्लिकार्जुन भंडे, काशिनाथ ईडगे, गजानन जाधव, अजिंक्य होळंबे या खेळाडूंचा समावेश होता. विजयी खेळाडूंना क्रीडा संचालक प्रा. सतिश मुंढे, प्रा. रोहन येनाडले यांनी मार्गदर्शन केले. त्याबद्दल प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी.पाटील आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले आहे.



### शिवाजी महाविद्यालयात आद्यकवी महर्षी वाल्मिकी जयंती साजरी

**उदगीर, दि. १८ ऑक्टोबर-**

शिवाजी महाविद्यालयात आद्यकवी रामायण रचनाकार महर्षी वाल्मिकी यांची जयंती साजरी करण्यात आली. किसान शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव पी. टी. शिंदे यांनी प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण केला.यावेळी डॉ.ए.एम. नवले, डॉ.एल. एच.पाटील, डॉ. व्ही.के.भालेराव, डॉ.सी.जे. देशमुख, डॉ.एस.डी.निटुरे,प्रा.एम. के.मोरे,प्रबंधक बी.के.पाटील, अधीक्षक व्ही.डी.गुरनाळे, मुख्य लिपिक आर.एम. लाडके, सूर्यकांत गुंगेवाड, प्राध्यापक, कार्यालयीन कर्मचारी, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रास्ताविक जयंती समिती प्रमुख डॉ.सुरेश शिंदे यांनी तर आभार डॉ. डी. बी. मुळे यांनी मानले.



### शिवनेरीत वाचन प्रेरणादिन साजरा

**शिरूर अनंतपाळ, दि. १८ ऑक्टोबर-**

येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व ग्रंथालयाच्यावतीने राष्ट्रपती डॉ. ए पी.जे.अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली.प्रारंभी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. धालगडे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. बी. धालगडे हे होते. यावेळी ग्रंथपाल डॉ. के.ए. सूर्यवंशी, डॉ. एन. बी. सूर्यवंशी यांनी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याविषयी माहिती दिली. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ धालगडे यांनी केले. यावेळी महाविद्यालयातील ग्रंथालया मध्ये पुस्तकाचे प्रदर्शन भरवण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी दिवसभर पुस्तक वाचन करून वाचन प्रेरणा दिन साजरा केले .यावेळी कार्यक्रमाधिकारी डॉ. अमोल इंगळे डॉ.पांडूरंग मुठ्ठे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षक इतर कर्मचारी विद्यार्थी व राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक उपस्थित होते.

### नामनिर्देशपत्र दाखल करण्यासाठी येणाऱ्या उमेदवारांसाठी मार्गदर्शक सूचना जारी

**लातूर, दि. १८ ऑक्टोबर-**

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी घोषित करण्यात आला आहे. या दिवसापासून आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. त्यामुळे लातूर जिल्ह्यात विधानसभा निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टिकोनातून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. निवडणुकीच्या कालावधीत लातूर जिल्ह्यात विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटारगाड्या वाहने यांचा ताफ्यात समावेश नसावा. तसेच उमेदवारांनी नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयाचे १०० मीटरच्या परिसरात तसेच दालनात पाच व्यक्ती व्यतिरिक्त कोणालाही प्रवेश दिला जाणार नाही. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशनपत्र दाखल करते वेळेस कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणने आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. हे आदेश दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीपासून दिनांक २५ नोव्हेंबर रोजीपर्यंत संपूर्ण लातूर जिल्ह्यात लागू राहतील , असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# आचारसंहितेची प्रभावीपणे अंमलबजावणी करा

## क्षेत्रीय अधिकारी, नोडल अधिकाऱ्यांच्या कामकाजाचा जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला आढावा

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १८ ऑक्टोबर-**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी लातूर शहर विधानसभा मतदारसंघ आणि लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघ अंतर्गत नियुक्त करण्यात आलेले सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि विविध पथकांचे नोडल अधिकारी यांच्या काम काजाचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी आढावा घेतला. तसेच निवडणूक प्रक्रिया शांततामय वातावरणात पार पाडण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्याच्या सूचना दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन समिती सभागृहात झालेल्या या बैठकीला लातूर ग्रामीण मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी संदीप कुलकर्णी, लातूर शहर विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी रोहिणी नऱ्हे, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी सौदागर तांदळे, डी.एम. काळे, गणेश सरोदे, लातूर ग्रामीण मतदारसंघाच्या सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी मंजुषा भगत यांच्यासह पोलीस प्रशासन व इतर विभागाचे अधिकारी, सर्व क्षेत्रीय अधिकारी सर्व नौदल अधिकारी यावेळी उपस्थित होते.

लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आलेल्या अडचणी लक्षात घेऊन सर्व नोडल अधिकारी व क्षेत्रीय अधिकारी यांनी आपल्या कामकाजाचे सूक्ष्म नियोजन करावे. विधानसभा सार्वत्रिक निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी सतर्क राहून काम करावे. तसेच आदर्श आचारसंहितेच्या अंमलबजावणीसाठी स्थापन करण्यात आलेल्या विविध पथकांनी आपल्यावर सोपविलेली जबाबदारी काटेकोरपणे पार पाडावी. विशेषतः स्थिर निगराणी पथके आणि भरारी पथकांनी निवडणूक काळात कोणतेही गैरप्रकार घडू नयेत, यासाठी दक्ष रहावे. कोणताही गैरप्रकार आढळून आल्यास तातडीने कार्यवाही करून, त्याबाबतचा अहवाल संबंधित नोडल अधिकारी यांना सादर करावा, अशा सूचना जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

निवडणूक हा लोकशाहीचा उत्सव असून या निवडणुकीमध्ये सर्वांनी मतदानाचा हक्क बजावावा, यासाठी मतदार जागृतीवर भर देण्यात यावा. तसेच मतदानासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांनीही आपले मतदानाचे कर्तव्य बजावावे, असे आवाहनही जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले. तसेच मतदान केंद्रांवर मतदारांसाठी किमान आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. मतदान केंद्रांवर मतदारांची गैरसोय होवू नये, यासाठी सर्व संबंधितांनी सम न्वय ठेवून काम करावे, असे त्यांनी सांगितले. विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी नियुक्त करण्यात आलेले सर्व क्षेत्रीय अधिकारी आणि विविध पथकांचे नोडल अधिकारी यांच्या कामकाजाचा यावेळी सविस्तर आढावा घेण्यात आला. तसेच त्यांना अनुषंगिक सूचना देण्यात आल्या.

## येरोळ विद्युत केंद्रातून विजपुरवठा खंडित; नागरिकांची कोजागिरी अंधारात

**शिरूर अनंतपाळ, दि.१८ ऑक्टोबर-**

शिरूर अनंतपाळ गेल्या अनेक दिवसांपासून येरोळ येथील ३३ के. व्हि. विद्युत केंद्रातुन दिवसाआड विद्युत पुरवठा खंडित होत आहे आणि हा वीज पुरवठा फक्त एक दोन तास नव्हे तर तब्बल चार ते सहा तास खंडित होत आहे. येरोळ येथे मोठी बाजारपेठ असुन सध्या सणासुध्दीचे दिवस आहेत. तर येथे दोन बँक, महाईसेवा केंद्र असल्यामूळे बहुतांश परिसरातील व्यवहार याच गावातून चालतात. शासकीय कार्यालयांमध्ये जनरेटरची सुविधा असली तरी त्या लाईट खात्यावर विविध लोकांचे छोटे मोठे व्यवसाय चालतात.

महावितरणचे कर्मचारी नेहमी येरोळ विद्युतकेंद्राला चाकुरहुन येणारा वीजपुरवठा बंद असल्याचे सांगून विषय टाळून नेतात. परंतु विद्युत कामे करण्यासाठी इतके दिवस लागतात का ? असा प्रश्न आता निर्माण होतो. विद्युत पुरवठा वेळेवर जरी भेटत नसला तरी बिले मात्र वेळेवर येतात आणि एक दिवस जरी बिल भरण्यास उशीर झाला तरी दंड मागितला जातो. मग एवढं सगळं होऊन सुद्धा लाईट वेळेवर का भेटत नाही असा प्रश्न येरोळ व पंचक्रोशीत असलेलेल्या नऊ गावातील नागरिक विचारत आहेत. येरोळ येथील ३३ के.व्ही विद्युत केंद्रातुन येरोळसह नऊ गावाला विजपुरवठा केला जातो. परंतु या विद्युत केंद्राकडे कोणाचेही लक्ष नाही. साकोळ येथील कनिष्ट अभियंत्याला लाईट का गेली असे विचारले असता उडवा उडवीचे उत्तर देण्यात आले. सध्या सणासुध्दीचे दिवस असुन लाईट नसल्याने व्यापारी नागरिक यांना संध्याकाळी त्रास होत आहे. विद्युत पुरवठा व्यवस्थित करावा अन्यथा महावितरणच्या विरोधात आंदोलन करण्यात येईल, असा इशारा भीमशक्ती संघटनेचे ता. अध्यक्ष प्रकाश बनसोडे यांनी सांगितले.

## निलंगा विधानसभेसाठी २,६१० अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १८ ऑक्टोबर-**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीसाठी मोठया प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता असून त्यादृष्टीने निवडणूक विषयक कामे विहित वेळेत पार पाडण्यासाठी व प्रत्यक्ष निवडणूकीसाठी विविध विभागाच्या २६१० अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांचे पहिले प्रशिक्षण निलंगा येथे रविवार दिनांक २७ ऑक्टोबर रोजी होणार आहे.निवडणुका सुरळीत व व्यवस्थित पार पाडण्यासाठी २३८-निलंगा विधानसभा मतदारसंघासाठी मनुष्यबळ व्यवस्थापन विभाग सज्ज ठेवण्यात आली असल्याची माहिती

निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांनी दिली आहे.

आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ चा कार्यक्रम जाहिर झाला असून प्रत्यक्ष निवडणूक दि.२० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. २३८-निलंगा विधानसभा मतदार संघासाठी एकूण २६१० एवढे अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली असून त्यापैकी २०७५ पुरुष व ५३४ महिला आहेत. नियुक्त अधिकारी कर्मचाऱ्यांचे पहिले प्रशिक्षण रविवार दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ रोजी दोन सत्रामध्ये केतकी संगमेश्वर मंगल कार्यालय, उदगीर मोड, निलंगा येथे होणार असल्याची माहिती म नुष्यबळ व्यवस्थापन विभागाचे नोडल अधिकारी तथा नायब तहसीलदार प्रविण आळंदकर यांनी दिली आहे.



सदर निवडणूकीसाठी सुक्ष्म निरीक्षक यांची देखील नियुक्ती करण्यात येणार असून त्यासाठी राष्ट्रीयकृत बँक, एल.आय.सी., पोस्ट ऑफीस इ. केंद्रीय कार्यालयातील अधिकारी घेण्यात येणार असल्याची म हितीही नोडल अधिकारी यांनी दिली. निवडणूकीसाठी प्रथमच मतदान केंद्रावर नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांना आयोगामार्फतच ओळखपत्र व पोस्टल बॅलेट ची सुविधा देण्यात येणार असून सर्व कार्यालय प्रमुख यांना त्यांचे अधिनस्त अधिकारी व कर्मचारी यांचे १०० टक्के फोटो व मतदान ओळखपत्र मनुष्यबळ व्यवस्थापन प्रणालीमध्ये अपलोड करण्याच्या सुचना निवडणूक निर्णय अधिकारी शरद झाडके व सहा. निवडणूक निर्णयअधिकारी तहसीलदार प्रसाद कुलकर्णी यांनी दिल्या आहेत. तसेच जे कार्यालय प्रमुख वरील बाबींची पुर्तता विहित वेळेत करणार नाहीत त्यांचेविरुध्द लोकप्रतिनिधित्व अधिनियमातील तरतूदीनुसार गुन्हे नोंद करण्यात येणार असल्याची निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिली आहे.

## कोजागिरीनिमित्त औराद येथे संगीत, कवितांची मैफल

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १८ ऑक्टोबर-**

तालुक्यातील औराद शहाजनी येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी कोजागिरी पौर्णिमाच्या निमित्ताने औराद येथील आर्य समाज मंदिरात गीत, संगीत आणि कवितांची मैफल आयोजित करून कोजागिरी उत्साहात साजरी करण्यात आली.



माजी प्राचार्य डॉ. रामेश्वर मिश्रा यांनी कृष्णावरील 'कान्हा छेडोना मुरली की तान रे' हे स्वतःच्या चालीतील स्वरचित भजन गाऊन कार्यक्रमाचे रीतसर उदघाटन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ कवी गोपाळराव शिंदे गुरुजी यांनी 'जगा माझी धर्म माझा एक मानवता, ना हिंदू- मुसलमान मी पांथिक कोणता'?असा कर्मकांडावर हल्ला चढवून समाज व्यवस्थेला प्रश्न केला. प्रा. अनंत गोदरे यांनी हिंदीतील एका कवीच्या गीताला स्वरचित चाल बसवून 'अरुण मधुमय देश हमारा' या गाण्याने देशभक्तीपर भावना जागवल्या. मादीम महाविद्यालयातील संगीत विभागप्रमुख प्रा. दुर्गादास सबनीस यांनी सिंधूताई सपकाळ यांच्यावर लिहिलेली सतीश हानेगावे यांची 'भूक' नावाची कविता गाऊन सर्वांना अस्वस्थ केले. डॉ. प्रकाशसिंह कच्छवा यांनी 'सृष्टी के पहिले' या गीताने सर्वांना प्रभावित केले. अशोक शिंदे यांनी जहाँ डाल डाल पर, सोनेकी चिडीया करती है बसेरा या गाण्याने भारताचा भूतकाळ जागवला. काशिनाथ सजनशेट्टी गुरुजी यांनी सामाजिक आशयाचे भावगीत सादर केले. निवेदक व कवी सतीश हाणेगावे यांनी जाती-धर्माच्या नावावरती रोज रचले जातात मढे, समाजकारण राजकारणाच्या नावावरती रक्त म ासांचे सडे' ही सामाजिक आत्मभान आणून देणारी विद्रोह कविता सादर केली. बस्वराज सज्जनशेट्टी यांनी बाबा आमटे यांची माणूस माझे नाव ही कविता गाऊन सर्वांना मंत्र मुक्त केले. अमरदीप पाटील यांनी चलते चलते मेरे ये गीत याद रखना, मुझे अलविदा ना कहना या गाण्याने कोजागिरी पौर्णिमेची सांगता झाली. रात्री साडेनऊ वाजता सुरू झालेला हा कार्यक्रम बारा वाजता संपला. प्रस्ताविक विजयकुमार रावजादे यांनी केले. आभार प्रकाशसिंह कच्छवा यांनी मानले. कार्यक्रमांमध्ये विशेष निमंत्रित म्हणून डॉ. विजयकुमार राठी, एम. आर. बिरादार, तातेराव लांडगे, प्रा. भगवानराव पेठकर, बालाजी बोरुळे, व्यंकटराव कानेगावे, मुख्याध्यापक सोनाळे, विजयकुमार मोरे, सुधाकर मुळे, विद्यासागर पाटील, राघो त्र्यंबक, शिवाजी शिंदे, शितल कच्छवा इत्यादींची उपस्थिती होती.

## चाकूर येथे महर्षी वाल्मिकी जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**चाकूर, दि. १८ ऑक्टोबर-**

चाकूर येथे आद्यकवी महर्षी वाल्मिकी ऋषी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.यावेळी ऋषी वाल्मिकी यांच्या प्रतिमेचे पूजन करून विविध मान्यवर व समाजबांधवांच्या उपस्थितीत जयंती साजरी करण्यात आली.



यावेळी मा.राज्यमंत्री विनायकरावपाटील,युवासेनाजिल्हा प्रमुख लक्ष्मण पेटकर, शिवसेना तालुकाप्रमुख नंदकुमार पवार, जेष्ठ नेते बालाजी सूर्यवंशी,सावता परिषद तालुकाध्यक्ष आत्माराम डाके,माधव जाधव, सिद्धेश्वर पवार, नगरसेवक अभिमन्यू धोंडगे,पपन कांबळे, युवा कार्यकर्ते सागर होळदांडगे, साजिद लखनगावे,बाबूभाई दापकेवाले, अमोल शेटे, अशोक शेळके,चाकूर अर्बन बँकेचे संचालक युनुस मासुलदार, कृष्णा धोंडगे,राम डाके, वाल्मिक बडेवार, शिवानंद जमादार, लक्ष्मण पल्लेवाड आदी मान्यवरांच्या उपस्थितीत आद्यकवी महर्षी वाल्मिकी ऋषी यांची जयंती साजरी करण्यात आली. वाल्मिकी ऋषी जयंती साजरी करण्यासाठी रमेश कोळी, किशोर कोळी, गुंडेवार महात्मे, दत्तात्रय कोळी, नागेश कोंबडे, गणेश घाटे, कृष्णा कोळी, प्रकाश कोळी, नागेश कोळी, संगमेश्वर कोळी, कृष्णा शिंगरूपे, गणेश हंकाराले, सुनील कोळी आदींनी आद्यकवी महर्षी वाल्मिकी ऋषी यांची जयंती साजरी करण्यासाठी परीश्रम घेतले.

## विदर्भातील झाडीपट्टीचं नाटक 'गद्दार' होणार लातूरच्या मंचावर सादर

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १८ ऑक्टोबर-**

मराठी माणूस नाट्यप्रेमी म्हणून ओळखला जातो. नाटक मराठी म ाणसाच्या नसा नसात भिनलेलं आहे. महाराष्ट्राच्या विविध भागात वेगवेगळ्या पद्धतीने, निरनिराळ्या नाट्य परंपरांच्या माध्यमातून नाटक सादर केलं जातं. त्यातलच विदर्भातील झाडीपट्टी रंगमंच व त्या मंचावरील नाटक 'गद्दार' लातूरच्या रंगमंचावर सादर होणार आहे.

अशाच झाडीपट्टी रंगमंचावरील आनंद भिमटे लिखीत व नरेश गडेकर दिग्दर्शीत गद्दार या नाटकाच्या प्रयोगाचे आयोजन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्यावतीने दि. २० ऑक्टोबर २०२४ रोजी सायं. ६ वाजता दयानंद सभागृह, दयानंद कॉलेज बार्शी रोड, लातूर येथे केले आहे.

प्रयोग विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्रथम आसन मिळणार आहे. विदर्भातील लोकजीवनाशी नाळ जोडणाऱ्या या अनोख्या पण मनोरंजक नाट्यप्रयोगाचा लाभ लातूरकरांनी घ्यावा. नाटक पाहण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन नाट्य परिषदेचे ॲड. शैलेश गोजमगुंडे, प्रदीप पाटील खंडापूरकर, धनंजय बेंबडे, प्रा. दिपक वेदपाठक, डॉ. मुकुंद भिसे, अजय गोजमगुंडे, सुमती बिडवे, अम ोल नानजकर, ॲड. बालाजी म्हेत्रे आदींनी केले आहे.

## विधानसभेसाठी रासप देणार तुल्यबळ उमेदवार : प्रा. विष्णू गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १८ ऑक्टोबर-**

राष्ट्रीय समाज पक्ष आगामी विधानसभा निवडणूक स्वतंत्रपणे लढणार असून मराठवाड्यातील सर्व जागांवर पक्षाकडून तुल्यबळ उमेदवार दिले जाणार आहेत.इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या असून उमेदवारांची पहिली यादी जाहीर झाली असल्याची माहिती रासपचे मराठवाडा अध्यक्ष प्रा.

विष्णू गोरे यांनी पत्रकार परिषदेत बोलताना दिली. पत्रकारांशी वार्तालाप करताना प्रा.गोरे म्हणाले की,राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी विधानसभा निवडणुका स्वतंत्रपणे लढण्याची घोषणा केली आहे.कुठल्याही युती किंवा आघाडीत सहभागी न होता सर्व २८८ जागांवर पक्षाकडून उमेदवार उभे केले जाणार असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. प्रा.गोरे यांनी सांगितले की, मराठवाड्यातील ४६ जागांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती पार पडल्या आहेत. त्यापैकी ८ ठिकाणचे उमेदवार जाहीर झाले आहेत.यात निलंगा मतदारसंघासाठी




नागनाथ बोडके यांच्या नावाचा समावेश आहे.आगामी कांही दिवसात उमेदवारांची दुसरी यादी पक्षाध्यक्ष जाहीर करणार आहेत. ते म्हणाले की,उमेदवारी देताना पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्याला प्राधान्य दिले जाणार आहे.पहिल्या यादीवरूनच हे स्पष्ट होते. इतर पक्षातील अनेक तुल्यबळ इच्छुक उमेदवार संपर्कात आहेत.माजी मंत्री,माजी आमदार तसेच सामाजिक क्षेत्रातील वजनदार व्यक्तिम त्वांनी उमेदवारीची मागणी केलेली आहे. दि.२२ रोजी उमेदवारी अर्ज भरण्यास प्रारंभ होणार असून तत्पूर्वीच उमेदवारांची यादी जाहीर होईल. बहुतांश उमेदवार पहिल्याच दिवशी उमेदवारी अर्ज दाखल करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी पक्षाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष नागनाथ बोडके शहर जिल्हाध्यक्ष दादासाहेब करपे,यांची उपस्थिती होती.